
# हाकारा

वर्ष : दहावे । अंक : तिसरा व चौथा ।
जुलै - डिसेंबर १९८९



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै.प्रा.गं.बा.सरदार

### कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : जनार्दन पोहऱ्या वळवी |
| उपाध्यक्ष | : शरद कुलकर्णी |
| सचिव | : रा.के.मुटाटकर |
| सहसचिव | : लक्ष्मण कुलकर्णी |
| खजिनदार | : बाबुल पठाण |
| सदस्य | : श्रीमती मीराबाई तडवी |
| | : श्रीमती छायाताई सुरतवंती |
| | : के.सी.पाडवी ( आमदार ) |
| | : श.गो.देवगावकर |
| | : उल्हास राजज्ञ |

### हार्दिक अभिनंदन

श्री.के.सी.पाडवी व श्री.नेताजी राजगडकर हे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी झाले; त्याबद्दल महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## व्यवसाय मार्गदर्शन विशेषांक

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ: आनंदराव सूर्यवंशी | ३ |
| २) | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ-विकास योजना : | ६ |
| ३) | रोजगार हमी योजनेद्वारे फळलागवडीची महत्त्वाकांक्षी योजना: रमेश जोशी | १२ |
| ४) | कुक्कुटपालन- शेतीस पूरक व्यवसाय: ग.शां.पंडित | १७ |
| ५) | मधमाशापालन व रेशीम उद्योग: ग.शां.पंडित | २२ |
| ६) | विविध स्पर्धा परीक्षा---: | २४ |
| ७) | केंद्रीय लोकसेवा आयोग ( यु.पी.एस.सी. ) | ३१ |
| ८) | महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( एम.पी.एस.सी. ) | ३३ |
| ९) | सेनादलातील नोकऱ्या: मदन दामले | ४२ |
| १०) | सैन्यात नोकरी कशी मिळते ?: मेजर विनायक तांबेकर | ५२ |
| ११) | लष्करी सेवा म्हणजे होतकरू तरूणांसाठी उज्ज्वल भवितव्य | ५५ |
| १२) | विविध अभ्यासक्रमांची ( कोर्सेसची ) माहिती | ६० |
| १३) | स्वयंस्फूर्त संस्थाचालकांच्या सभेचे इतिवृत्त: जनार्दन वळवी | ७४ |
| १४) | पुस्तक परीक्षण: जॉन गायकवाड | ७७ |
| १५) | संवाद | ७९ |



वर्ष दहावे: अंक तिसरा-चौथा
जुलै-डिसेंबर १९८९
पत्र व्यवहाराचा पत्ता:
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे-४११००७

संपादक
रामचंद्र मुटाटकर
संपादन सहाय्य
ग.शां.पंडित
मुखपृष्ठ
डॉ.विजय भानू

प्रकाशक- रा.के.मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
संजीव मुद्रणालय
४६९,सदाशिव पेठ
पुणे=४११०३० फोन-४४५०८२
येथून छापून प्रसिध्द केले.

'हाकारांस' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे

# संपादकीय

'हाकारा' चा हा व्यवसाय मार्गदर्शन विशेषांक आमच्या आतापर्यंतच्या परंपरेप्रमाणे एक वेगळा अंक म्हणावा लागेल. कारण इतर समाजाची परिस्थिती आणि आदिवासी परिस्थिती यांमध्ये शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दृष्ट्या खूपच फरक आहे. आदिवासींमध्ये शेतमजूर व (अल्प) भूधारक असे दोनच प्रकार प्रामुख्याने आढळत असल्यामुळे व शिक्षणाचे प्रमाणही अत्यल्प असल्यामुळे त्यांना निरनिराळ्या व्यवसायांसंबंधी माहिती देण्याची गरज कधी कोणाला वाटलीच नाही.

१९८० पासून आमचे महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे काम आदिवासी भागात सुरू झाले. या दहा वर्षांच्या काळात आम्हाला असे जाणवले की आदिवासींमध्ये काही प्रमाणात का होईना जागृतीची चिन्हे दिसू लागली आहेत. सध्या बरेच आदिवासी युवक-युवती शाळा महाविद्यालयांमधून शिक्षण घेताना दिसताहेत. अनेक शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा आदिवासी भागात उभ्या रहात आहेत. सरकारनेही विशेष सवलती दिल्यामुळे शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. तेव्हा अशा साक्षर व सुशिक्षित तरूणांना शिक्षणानंतर पुढे काय करावे, नोकरी-व्यवसायासाठी कोणते क्षेत्र निवडावे याचे मार्गदर्शन व्हावे या हेतुनेच हा अंक काढण्यात आला आहे.

'हाकारा' चा हा अंक परिपूर्ण आहे, असे मात्र नाही; परंतु बऱ्याच प्रमाणात मार्गदर्शक ठरेल हे निश्चित. या अंकात शेतकरी व अल्पशिक्षितांना घरच्या घरी करता येणाऱ्या उद्योगांविषयीची माहिती म.रा.खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाची फळलागवडीची योजना आदिवासी व शेतकऱ्यांना किफायतशीर ठरणारी आहे. शेती व्यवसायास पूरक व सुशिक्षित बेकारांना आर्थिक बाबतीत स्वावलंबी करणाऱ्या कुक्कुटपालन व मधमाशापालन, रेशीम उद्योग या व्यवसायांची माहिती दिली आहे. शिक्षणाची इच्छा अपूर्ण राहिलेल्यांना काम करून शिकता यावे यासाठी मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांची माहिती दिली आहे. तसेच हुशार विद्यार्थी व पदवीधरांसाठी विविध स्पर्धा परीक्षांची सविस्तर ओळख करून देण्यात आली आहे.

असा हा सर्वसमावेशक अंक आपल्या हाती देत आहोत. त्याचा जास्तीत जास्त उपयोग होईल, ही अपेक्षा.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## -आनंदराव सूर्यवंशी

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र शासनाच्या १९८९ च्या विसाव्या कायद्यानुसार नाशिक येथे १ जुलै १९८९ रोजी स्थापन झाले. पहिले कुलगुरू म्हणून डॉ.राम ताकवले यांनी याच तारखेपासून कुलगुरू पदाची सूत्रे स्वीकारली.

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दिनांक ११-५-९० रोजी आयोजित करण्यात आलेल्या वार्तालाप कार्यक्रमात प्रा.डॉ.ताकवले यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांची तपशीलवार माहिती दिली. तसेच त्यांना विचारलेल्या प्रश्नांच्या आधारे खालील माहिती देत आहे.

या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रभर आहे. ज्ञानाची गंगा घरोघरी पोहोचवावी हे सूत्र या मुक्त विद्यापीठाने स्वीकारले आहे. आवड-सवड व गरजेनुसार अभ्यासक्रम निवडण्याच्या सुविधेमुळे २० वर्षे पूर्ण झालेल्या आणि शिक्षणाची आस असलेल्या कोणासही या विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेता येतो.

प्रत्येक क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिंच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेले अभ्यासक्रम सवडी नुसार घरच्या घरी अभ्यास करून पदविका/पदवी स्तरापर्यंतच्या शिक्षणाची सोय अत्याधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा आणि जनसंवाद माध्यमांचा वापर, अभ्यास केंद्रावर तज्ञ अनुभवी अध्यापकांचे मार्गदर्शन, ग्रंथालय, प्रात्यक्षिके आणि अभ्यासक्रमावर आधारित ध्वनिफिती व दृकश्राव्य फिती पाहण्याची सोय ही या विद्यापीठाची ठळक वैशिष्टे आहेत, असे कुलगुरू डॉ.ताकवले यांनी सांगितले.

सैध्दांतिक आणि प्रात्यक्षिक ज्ञानाची सांगड घालून दर्जामध्ये कोणतीही तडजोड न करता या विद्यापीठाने काही महत्वाचे अभ्यासक्रम तयार केले आहेत. या विद्यापीठातून बी.ए.आणि बी.कॉम. या पदवी परीक्षा देखील देण्याची सोय आहे. याशिवाय पीकवार अभ्यासक्रम योजना माध्यमिक शाळांमधील शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण, बी.एड.पदवी अभ्यासक्रम, शैक्षणिक तंत्रज्ञान आणि शैक्षणिक विकास या क्षेत्रात 'एमफिल' पदवीसाठी संशोधन अभ्यासक्रम, उपयोजित विद्युतिकी (ॲप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स) चा पदविका अभ्यासक्रम हे अभ्यासक्रमही सुरू करण्यात येतील.

ज्यांचे शिक्षण अपुरे राहिले आहे, त्यांना पदवी पाठ्यक्रमास प्रवेश घेण्यासाठी पूर्वतयारी अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. या अभ्यासक्रमासाठी फी ३००/- रूपये असून पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची फी ५००/- रूपये इतकी आहे.

पूर्वतयारी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश १जून ते ३० जून या दरम्यान आपल्या जिल्ह्यातील अभ्यास केंद्रावर आणि मुक्त विद्यापीठाच्या नाशिक कार्यालयातून मिळेल.

### पूर्वतयारी अभ्यासक्रम

या लोक-विद्यापीठात पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता यावा म्हणून पूर्वतयारी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठ अशा उमेदवारांना अभ्यास-साहित्य देते. तसेच सर्वतोपरी मार्गदर्शनाचे प्रयत्न करते.

## आर्टस अभ्यासक्रमासाठी घ्यावयाचे विषय.

१ इंग्रजी भाषा
२ सामाजिक शास्त्रे
३ गणित

## कॉमर्स अभ्यासक्रमासाठी अभ्यासायचे विषय.

१ इंग्रजी भाषा
२ वाणिज्य
३ गणित

## फी भरणेबाबत

आधी नमूद केल्याप्रमाणे पूर्वतयारी अभ्यासक्रमाचे एकूण शुल्क रू. ३००/- मनिऑर्डरने किंवा बँक ऑफ महाराष्ट्रच्या कॉलेज कँपस शाखेवरील डिमांड ड्राफ्टने पाठवावे. परीक्षा शुल्क वेगळे आहे. ते परीक्षेच्या अर्जासोबत भरावयाचे आहे.

अर्जासोबत फी भरल्यानंतर विद्यापीठातर्फे अशा उमेदवारांना सर्व विषयांची पुस्तके टपालाने घरपोच मिळतात. अभ्यास केंद्रावर तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन मिळते. अभ्यासक्रमावर आधारित ऑडिओ कॅसेटस ऐकायला आणि व्हिडिओ कॅसेटस पाहायला अभ्यास केंद्रावर मिळतील.

## अभ्यास केंद्रे खालील महाविद्यालयात कार्यरत झाली आहेत.

| | अभ्यास केंद्रे | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १ | अमरावती | : श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती. |
| २ | अहमदनगर | : अहमदनगर कॉलेज, अहमदनगर. |
| ३ | औरंगाबाद | : सरस्वतीभुवन महाविद्यालय, औरंगपुरा औरंगाबाद. |
| ४ | कराड | : सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड. |
| ५ | कल्याण | : बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, कल्याण जि. ठाणे. |
| ६ | कोल्हापूर | : श्री छत्रपती शाहू सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ बिझिनेस एज्युकेशन अँड रिसर्च, विद्यापीठ रोड, कोल्हापूर, ४१६००४. |
| ७ | जव्हार | : आर्टस अँड कॉमर्स कॉलेज, जव्हार. |
| ८ | जळगाव | : मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव,४२५००१. |
| ९ | जालना | : आर.जी,बगाडिया आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, जालना. |
| १० | ठाणे | : के.ग.जोशी कला आणि ना.गो.बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, बंदर रोड, ठाणे, ४००६०१. |
| ११ | धुळे | : जयहिंद महाविद्यालय, देवपूर, धुळे ४२४००२. |
| १२ | नागपूर | : सी.पी.अँड बेरार शिक्षण सोसायटीचे महाविद्यालय, तुळशीबाग, नागपूर-४४०००२. |
| १३ | नाशिक | : ह.प्रा.ठा.कला आणि रा.य.क्ष.विज्ञान महाविद्यालय, नाशिक ४२२००५. |
| १४ | पनवेल | : ए.एस.सी.कॉलेज पनवेल. |
| १५ | परभणी | : श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस,सायन्स अँड कॉमर्स परभणी. |
| १६ | पुणे (कँप) | : नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय, कँप, पुणे ४११००१. |

| | | |
|---|---|---|
| १७ | पुणे (शहर) | : आबासाहेब गरवारे महाविद्यालय कर्वे रस्ता पुणे ४११००४. |
| १८ | मालेगाव | : महाराजा सयाजीराव गायकवाड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मालेगाव कँप (जि. नाशिक). |
| १९ | मुंबई | : डी.जी.रूपारेल कला, वाणिज्य आणि शास्त्र महाविद्यालय माटुंगा रोड स्टेशनसमोर मुंबई ४०००१६. |
| २० | रत्नागिरी | : गोगटे कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स रत्नागिरी. |
| २१ | लातूर | : राजर्षि शाहू महाविद्यालय (क.वि.वा.) लातूर. |
| २२ | वाशी | : मॉडर्न कॉलेज वाशी (नवी मुंबई). |
| २३ | सांगली | : नवभारत शिक्षण मंडळ कॉलेज सांगली. |
| २४ | सातारा | : लालबहादूर शास्त्री महाविद्यालय सातारा. |
| २५ | सोलापूर | : संगमेश्वर महाविद्यालय पोस्ट बॉक्स नं. ५२, सोलापूर ४१३००१. |

**संपर्कासाठी पत्ता**

संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कॉलेज रोड, नाशिक, ४२२००५.

**बी.ए./बी.कॉम. पदवी कार्यक्रम**

**प्रवेश पात्रता:**

शिक्षण अपुरे राहिले असेल (१२वी पेक्षा कमी असेल) अशा २० वर्षे वय पूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी पूर्वतयारी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून पदवीच्या प्रथमवर्षाला प्रवेश द्यावा.

इयत्ता १२ वी किंवा डी.एड. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना पदवीच्या प्रथम वर्षाला सरळ प्रवेश मिळतो.

**प्रवेश कसा मिळवाल ?**

प्रवेश इच्छुकांनी प्रवेश अर्ज व माहितीपत्रक विद्यापीठ कार्यालयाकडून स्वत:चा पत्ता व पोस्टेज असलेले पाकिट आणि १५ रूपयांची पोस्टल ऑर्डर पाठवून मागवावे.

अर्ज पूर्ण भरून आवश्यक ते शुल्क रू.५०/-, रू.५०० मनिऑर्डरने किंवा बँक ऑफ महाराष्ट्राच्या कॉलेज कँपस शाखेकडील डिमांड ड्राफ्टने विद्यापीठ कार्यालयाकडे पाठवून द्यावे.

**फी-बी.ए./बी.कॉम. अभ्यासक्रमांसाठी**

पहिल्या वर्षी: प्रवेश शुल्क रू. ५०, शैक्षणिक शुल्क रू.५००.

दुसऱ्या वर्षी: शैक्षणिक शुल्क रू.५००, नोंदणी शुल्क रू. २०. शिवाय परीक्षेसाठी अर्ज भरताना परीक्षा शुल्क द्यावे लागेल. त्याचा तपशील परीक्षेपूर्वी केंद्रावर मिळू शकेल.

**विद्यापीठाकडून मिळणारी शैक्षणिक मदत**

बी.ए. किंवा बी.कॉम. पदवीसाठी जे जे विषय उमेदवारांनी निवडले असतील त्या त्या विषयांच्या अभ्यासपुस्तिका भरलेल्या शुल्कातच त्यांना मिळतील.

विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रावरच अधिक अध्ययनासाठी कॅसेटस ऐकता येतील. तसेच व्हिडिओ कॅसेटस पाहता येतील.

पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात बी.ए./बी.कॉम. साठी घ्याव्या लागणाऱ्या विषयांचा, मूल्यमापन वगैरे बाबींचा तपशील प्रवेशेच्छुंना अभ्यास केंद्रांवर मिळू शकेल.

**प्रवेशासाठी**

पूर्वतयारी अभ्यासक्रमांसाठी कार्यरत असणाऱ्या केंद्रांशी व त्याखाली दिलेल्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

# विकास योजना

## महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, ग्रामोद्योगाच्या अनेकविध योजना राबवित आहे. अशा योजनांची उपयुक्त माहिती.

### मंडळाचे उद्दीष्ट

ग्रामीण क्षेत्रातील गरजू लोकांना रोजगार, खेडयापाडयातील पारंपारिक कारागिर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगारीचे क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृद्धि, खादी ग्रामोद्योगासाठी पतपुरवठा, अनुदान, उत्पादन इत्यादी प्रकारे आर्थिक सहाय्य, त्या उद्योगाच्या विकासासाठी कच्चा माल पुरवठा, छोटी पण समुचित यांत्रिक साधनांची उपलब्धी, कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढविण्यास उत्तेजन, तयार मालाच्या विक्रीस मदत, उद्योग प्रशिक्षणाची व्यवस्था, खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक ठरेल असे शासकीय धोरण अंमलात आणण्यासाठी शासनाशी प्रभावी संपर्क, साधून खादी ग्रामोद्योगद्वारा समाज प्रबोधन आणि ग्रामीण उद्योजक कारागिरांना कार्यक्षम, अर्थक्षम व सेवाक्षम बनविणे हे मंडळाचे उद्दीष्ट आहे.

### मंडळाच्या कक्षेतील उद्योग

खादी ग्रामोद्योग आयोगाच्या कक्षेत येणाऱ्या पुढील उद्योगांसाठी मंडळाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. १) ग्रामीण तेल उद्योग २) हातकागद उद्योग ३) मधुमक्षिका पालन उद्योग ४) ग्रामीण कुंभार उद्योग ५) वाख उद्योग ६) गोंद आणि रेक्झीन उद्योग ७) औषधी वनस्पती संकलन उद्योग ८) गोबर गॅस प्लँट योजना ९) लाख उद्योग १०) वेत व बांबू उद्योग ११) कात उद्योग १२) फळ प्रक्रिया आणि परिक्षण उद्योग १३) रबर १४) वन उत्पादनाचे संकलन, प्रक्रिया आणि पॅकिंग १५) तरटी-चडद्या व हार तयार करणे १६) काजू प्रक्रिया १७) द्रोण व पत्रावळी तयार करणे १८) सूर्य व वायू उर्जेची उपकरणे तयार करणे.

### मंडळाकडून कर्ज मिळण्यासाठी कर्ज प्रकरणी आवश्यक असलेली कागदपत्रे

१) आर्थिक सहाय्य मागणीसाठी अर्ज पाठविले त्यासंबंधीचे पत्र (कव्हरींग लेटर)

२) कर्ज मदत मागणी अर्ज

३) रजिस्टर्ड संस्था/सहकारी सोसायटी असेल तर नोंदणीचे प्रमाणपत्र

४) संस्था /सोसायटी असेल तर पोटनियम प्रत

५) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र (व्यक्तीचे बाबतीत)

६) उद्योग प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (व्यक्तीचे बाबतीत)

७) नगरपालिका अथवा ग्रामपंचायत यांचा नाहरकत दाखला

८) ज्या जागेत युनिट सुरु करणार ती जागा बिगरशेती आहे त्यासंबंधीचे प्रमाणपत्र.

९) जमीन स्वत:च्या मालकीची असल्यास ७/१२ चा उतारा अथवा स्वत:च्या मालकीची नसेल आणि ती भाडयाची असेल तर किमान ३० वर्षे मुदतीचा भाडेकरार

१०) वर्कशेड, गोडाऊन इ. चे बांधकाम असेल तर प्लॅन्स व एस्टीमेटस

११) मशिनरी असेल तर दरपत्रके (कोटेशन्स)

१२) मंडळाकडून मंजूर केलेल्या रकमेपेक्षा जर जादा खर्च येणार असल्यास तो खर्च स्वत: करणार असलेबाबत संमतीपत्र व जादा येणाऱ्या खर्चासाठी निधी कसा उभारणार त्याचे स्पष्टीकरण.

१३) स्वत:ची स्थावर मालमत्ता असल्यास त्यासंबधीचे खाते उतारे. स्वत:ची स्थावर मालमत्ता नसल्यास कर्जासाठी जामीन राहाणाऱ्या व्यक्तिचे तारण संमतीपत्र व वेतनाचा दाखला किंवा स्थावर मालमत्तेचे तारण किमंतीचा दाखला खाते उतारा व संमती पत्र.

१४) कर्जदाराने चालू करावयाच्या उद्योगाकरिता जर काही सरकारी परवाने आवश्यक असतील तर ते जोडावे उदा. एफ्.पी.ओ. लायसन्स इ.

१५) उत्पादित माल विक्रीची व्यवस्था असल्यास त्याची खात्री होण्याकरिता त्यासंबंधी असलेल्या ऑर्डर्स अथवा आवश्यक ती हमीपत्रे जोडावी.

१६) जर संस्था/सोसायटी यांचा कर्ज मागणी अर्ज असेल तर अद्ययावत हिशेबी पत्रके म्हणजेच दोन वर्षाची हिशोबी पत्रके.

१७) जर भाग भांडवल कर्ज मागणी असेल तर त्यासंबधीचे कारागिर सभासदांचे अर्ज व स्टँप लावलेल्या पावत्या.

१८) आवश्यक असल्यास तांत्रिक शक्यता अहवाल

१९) कारखाना सदृश केंद्रासाठी प्रकल्प अहवाल.

## आर्थिक सहाय्य यांना दिले जाते-

१) १८६०च्या कायद्यान्वये रजिस्टर्ड झालेल्या संस्था

२) १९६०च्या सहकार कायद्यान्वये नोंदणी झालेल्या सहकारी संस्था

३) १९५०च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्याखाली नोंदणी झालेल्या संस्था

४) ग्रामीण उद्योजक

५) ग्रामीण कारागिर

मात्र उद्योग महसूली खेड्यातच सुरु करणे आवश्यक आहे व उद्योगात माणशी रु. १५,०००/- रुपयांपेक्षा अधिक भांडवली गुंतवणूक असता कामा नये.

## अर्थसहाय्याचे विविध प्रकार

१) भांडवली खर्च : खादी ग्रामोद्योग आयोगाचे आर्थिक सहाय्याचे आकृतीबंधानुसार जमीन, इमारत, गोदाम, कार्यशाळा, शेड, मशिनरी हत्यारे औजारांसाठी.

२) खेळते भांडवल : खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधाप्रमाणे.

३) भाग भांडवल कर्ज : खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधानुसार सहकारी सोसायट्या कारागिर सभासदांना भाग खरेदी करण्यासाठी.

४) भांडवल संचय कर्ज : १९६०च्या अधिनियमाखाली व सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाखाली नोंदविलेल्या संस्थांना खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधानुसार भांडवल संचय कर्ज

५) साठा कर्ज : ग्रामीण तेल उद्योग, कुंभार उद्योग, चर्मोद्योग इत्यादींसाठी सोसायट्यांस/संस्थांस कच्चा माल साठविण्याकरिता आर्थिक सहाय्य मंजूर केले

जाते.

६ ) विक्री व्यवस्था : ग्रामशिल्प, चर्मशिल्प इ. विक्री भांडारांकरिता, भांडवली खर्च, कर्ज व खेळते भांडवल खादी ग्रामोद्योग आयोगाच्या आर्थिक सहाय्याचे आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येते.

७ ) अनुदान : भांडवली कर्जाबरोबर काही युनिटना ठराविक प्रमाणात अनुदानही दिले जाते.

* वरील सर्व प्रकारच्या कर्जावर द. सा.द. शे. फक्त चार टक्के व्याज आकारले जाते. खादीसाठी दिले जाणारे कर्ज तर बिनव्याजी असते.

## मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजना खादी व ग्रामोद्योग विकास कार्यक्रम नेहमीच्या योजना

या कार्यक्रमासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाकडून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या कक्षेत येणाऱ्या विविध उद्योगांचे काम करणाऱ्या सोसायटच्या, १८६० रजिस्ट्रेशन कायद्यान्वये नोंदलेल्या संस्था उद्योजक व कारागिर यांच्यामार्फत हा कार्यक्रम राबविण्यात येतो.

## कारागिर रोजगार हमी योजना

'कारागिर रोजगार हमी योजना'ही एक खास योजना १९७२-७३ पासून मंडळाने सुरू केली. या योजनेअंतर्गत तालुका पातळीवर तालुक्यांतील बलुतेदारांची सहकारी संस्था स्थापण्याची योजना आखली व अंमलात आणली. या योजनेचा लाभ आज खालील उद्योगांतर्गतकाम करणाऱ्या ग्रामीण भागातील कारागिरांना होत आहे.

१ ) धान्य व डाळी प्रक्रिया उद्योग २ ) ग्रामीण तेल उद्योग ३ ) वेत व बांबू उद्योग ४ ) ग्रामीण चर्मोद्योग ५ ) लाख उद्योग ६ ) ग्रामीण कुंभार उद्योग ७ ) लोकर उद्योग ८ ) सुतार व लोहार उद्योग

या उद्योगातील कारागिरांना शंभर रुपयांच्या भागखरेदीसाठी त्यांना फक्त रु. १२.५० वा रु. २५/- (उद्योगानुसार) भरावे लागतात. कमिशन मंडळाच्या बाकीच्या भागाची रक्कम म्हणजेच रु. ८७.५० वा रु. ७५/-(उद्योगानुसार) भाग भांडवल कर्ज म्हणून देते व महाराष्ट्र शासन एकास दोन प्रमाणात यात भागीदारी करते.म्हणजे कारागिर सभासदाची एकूण तीनशे रुपये भाग भांडवलाची पत होते.

गट पातळीवरील सहकारी सोसायटच्यांचे सभासद कारागिरांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कॅश क्रेडीटच्या रुपाने दिलेल्या आर्थिक सहाय्यावरील व्याजासाठी बँकांच्या व्याजाचा दर आणि ४ टक्के यामधील फरकाची रक्कम खादी व ग्रामोद्योग आयोगाकडून व्याज उपदान म्हणून देण्यात येते. सदर व्याज उपदान योजनेमुळे कारागिराला बँक कर्जावर प्रत्यक्ष व्याजाचा दर दरसाल दरशेकडा ४ टक्के याप्रमाणे आकारला जातो. बलुतेदार सोसायटीच्या कारागिराला उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा आणि सवलतींबद्दल बलुतेदार सोसायटी कर्ज रकमेवर दरसाल दरशेकडा २ टक्के सेवा आकारते. अशारीतीने अंतिमत: कारागिरांना फक्त दरसाल दरशेकडा ६ टक्के याप्रमाणे कर्ज रकमेवर व्याज भरावे लागते.

## खादी आयोग व्याज उपदान योजना

खादी आयोगाच्या कक्षेत येणाऱ्या उद्योगांना खादी आयोगाच्या आकृतीबंधानुसार बँकांकडून कर्ज घेतल्यास खादी आयोगाच्या शिफारशीने संस्था/सोसायटच्यांना व्याज मिळू शकते. बँकेचा व्याज दर जास्तीत जास्त १२.५ टक्के व ४

टक्के व्याज यामधील फरक रक्कम व्याज उपदान म्हणून देण्याची योजना आहे. खादी आयोगाच्या मान्यतेने मंडळ हे उपदान पात्रतापत्र देते.

## कुटिरोद्योग

ज्यांचे कर्ज प्रकरण खादी आयोगाच्या आकृतीबंधात बसत नसेल त्यांनी बँकांकडून कर्ज घेतल्यास त्यांना बँक कर्जदार व ९ टक्के यामधील फरकाची रक्कम व्याज उपदानाच्या रुपाने सरकारी धोरणानुसार मिळू शकते.मात्र त्या उद्योगाचा भांडवली खर्च व खेळते भांडवल मिळून दोन लाख रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक नसावी व तो उद्योग एस. एस. आय. खाली नोंदविलेला असावा. ही सवलत मुंबई, पुणे औद्योगिक पट्ट्यांस लागू नाही.

## राष्ट्रीयकृत बँकांची सवलत व्याज दर योजना (डी. आर. आय.)

ज्या कुटुंबाचे शहरी भागात वार्षिक ७२००/- रु. व ग्रामीण भागात ४२००/- रु. पेक्षा जास्त उत्पन्न नाही अशा कुटुंबातील व्यक्तीस भांडवली कर्ज, खेळते भांडवल कर्ज मिळून एकुण ६५०००/- संयुक्त कर्ज ४ टक्के व्याज दराने कोणत्याही व्यवसायांसाठी राष्ट्रीयकृत बँकांमार्फत मिळवून देण्याची योजना आहे. त्या योजनेचा लाभही ग्रामोद्योगी कारागिरास घेता येईल.

## एकात्मिक ग्रामीण कार्यक्रम (ट्रायसेम)

ग्रामोद्योग सुरू करू इच्छिणारे १८ ते ४० वयोगटातील उद्योजकांसाठी ही योजना ग्रामीण विकास यंत्रणा या संस्थेच्या सहकार्याने राबविली जाते. त्यानुसार प्रशिक्षण काळात प्रशिक्षार्थ्याला रु. २००/- विद्यावेतन देण्यात येते.

प्रशिक्षणानंतर उद्योग सुरू करण्यासाठी बँकामार्फत अर्थसहाय्य मिळवून देण्याची योजना ट्रायसेम योजनेअंतर्गत प्रशिक्षण देणाऱ्यास प्रत्येकी प्रशिक्षणार्थ्यामागे रु. ५० शुल्क म्हणून देण्यात येते.

## विशेष घटक योजना

सन १९८०-८१च्या अखेरच्या काळापासून शासनाच्या या योजनेच्या अंमलबजावणीत मंडळ सहभागी झाले आहे.

अ)

१) लाभार्थी अनुसूचित जातीचा अथवा नवबौद्ध असणे आवश्यक आहे.

२) लाभार्थीचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागात रु. ३६००/- आणि शहरी भागात रु. ४२००/- पेक्षा जास्त असू नये.

३) लाभार्थी ग्रामोद्योगापैकी एखाद्या उद्योगाचे उत्पादन करणारा असावा

४) महात्मा फुले महामंडळ किंवा अन्य संस्थांकडून लाभार्थीने सदर योजनेखाली अनुदान/उपदान घेतलेले नसावे.

ब)

१) कारागीर रोजगार हमी योजने अंतर्गत येणाऱ्या आठ उद्योगातील मागासवर्गीय कारागिरांना प्रथम १ रुपये प्रवेश फी घेऊन बलुतेदार सोसायटीचे सभासद करून घेतले जाते.

२) मंडळामार्फत ५५/- रु. कर्ज व ५५/- अनुदान याप्रमाणे एकूण भाग भांडवल रु. ११०/- दिले जाते.

३) लाभार्थीच्या उद्योगाचे स्वरूप पाहून भांडवली खर्च व खेळते भांडवल याकरिता अर्थ सहाय्य सहकारी अथवा राष्ट्रीयकृत बँकेमार्फत दिले जाते.

४) कारागिरास बँकेमार्फत कर्ज दिल्यानंतर बँकेने दिलेल्या कर्ज रकमेच्या ५० टक्के म्हणजेच रु. ५०००/- मर्यादेपर्यंत अनुदान दिले जाते.

५) बलुतेदार सहकारी सोसायटयांनी त्यांच्या मागासवर्गीय कारागीर सभासदांना बँका व वित्तीय संस्था मार्फत उपलब्ध करून दिलेल्या कर्जाच्या २ टक्केप्रमाणे सोसायटीस सभासदाने द्यावयाची सेवा शुल्काची रक्कम मंडळाकडून अनुदान स्वरूपात मंजूर केली जाते.

## रेशीम उद्योग विकास कार्यक्रम

तुती रेशीम उद्योगाच्या विकासाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर मंडळाने गेल्या चार वर्षांपासून हाती घेतला आहे. राज्य योजना आणि पश्चिम घाट विकास कार्यक्रम याखाली हा कार्यक्रम अंमलात आणण्यात येतो. या दोन कार्यक्रमाखाली शेतकऱ्यांना तुतीची कलमे आणि रेशम किटक विनामूल्य पुरविण्यात येतात. तसेच तुती लागवडीचे आणि किटक संगोपनाचे तांत्रिक मार्गदर्शनही करण्यात येते. तसेच रेशीम उद्योगाचे प्रशिक्षणही शेतकऱ्यांना विद्यावेतन देऊन मंडळामार्फत दिले जाते.

## दुर्बल घटकांसाठी विशेष सवलती

राज्यांतील आदिवासी उपाययोजनेखाली तहसील व गावे शासनाने निश्चित केलेली आहेत. अशा भागातील आदिवासी व अनुसूचित जातीच्या कारागिरांना खादी आयोगाच्या आर्थिक सहाय्याच्या आकृतीबंधाप्रमाणे भांडवली खर्चाकरिता २५ टक्के कर्ज व ७५ टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. कुष्ठरोग मुक्त व्यक्तींनाही वरीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्याची तरतूद आहे.

## विक्रीकरांत सवलत

महाराष्ट्र शासनाच्या १९५९ च्या विक्री कायद्यांतील तरतुदीनुसार ग्रामाद्योगांतर्गत उत्पादित झालेल्या वस्तूंच्या विक्रीवरील करात सूट देण्याची शिफारस मंडळ करते.

## कच्चा माल पुरवठा

सिमेंट, पोलाद, कोळसा, लाकूड यासारख्या नियंत्रीत कच्चा माल इत्यादी साहित्ये मिळवण्यासाठी संबधित अधिकाऱ्यांकडे मंडळ शिफारस करते.

## प्रशिक्षण

खादी ग्रामाद्योग आयोगामार्फत खादी व ग्रामोद्योगाचे प्रशिक्षण इच्छूक उमेदवारांना दिले जाते. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यास रु. २०० प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यास रु. २००/- ते २५० विद्यावेतन याशिवाय प्रशिक्षणार्थ्यास जाण्यायेण्याचा प्रवास खर्च. प्रवास काळात दर दिवसास रु. १२/- दैनीक भत्ता दिला जातो.

अधिक माहीतीसाठी मंडळाच्या मुख्य कार्यालयाशी अथवा आपल्या जिल्ह्यातील मंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

## जिल्हा कार्यालयाचे पत्ते खालीलप्रमाणे

मुख्य कार्यालयाचा पत्ता :

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,**

१९-२१, मनोहरदास रस्ता

जनरल पोस्ट ऑफिससमोर मुंबई- ४०० ००१

दूरध्वनी : २६७६४१-४२-४३

१) लक्ष्मी विष्णू सदन, महर्षि कर्वे रोड, ठाणे.फोन : ५०६०७५

२) जिल्हा उद्योग केंद्र, ठिकरुळ नाका,मु. पो. ता. अलिबाग, जिल्हा रायगड, फोन : ९९

३) जिल्हा उद्योग केंद्र, बी. डी. ओ. कॉर्टर्समागे, जेल रोड, जिल्हा रत्नागिरी. फोन : २३७९

४) भोगटे बिल्डींग, मुबंई गोवा मार्ग

ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, फोन : २४०

५) जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी रोड, वन खात्याचे शेजारी, जिल्हा धुळे. फोन : ४०८

६) १६६७, नेहरू चौक, जिल्हा नाशिक. फोन : ८८७२५

७) जिल्हा उद्योग केंद्र, आय. टी. आय. जवळ नॅशनल हायवेसमोर, जळगाव. फोन :८८७२५

८) ७२७, सदाशिव पेठ, पुणे ३०. फोन : ४४३८२१

९) मेन रोड, ८९५, महात्मा गांधी रोड, जिल्हा सांगली. फोन : ४१३०

१०) जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट नं. १३, एम. आय. डी. सी. कंपाउंड, सातारा ४१५ ००३ फोन : २७३९

११) जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेल समोर, सोलापूर. फोन :३१२८

१२) जिल्हा उद्योग केंद्र, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर. फोन : ५२७१

१३) जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कार्यालयासमोर, स्टेशन रोड, अहमदनगर. फोन : १६१०

१४) जिल्हा उद्योग केंद्र, इंडस्ट्रीयल इस्टेट, रेल्वे स्टेशन रोड, हॉलीडे कँप समोर, औरंगाबाद. फोन : ५९६९

१५) जिल्हा उद्योग केंद्र, सेंट्रल जेल समोर, जिल्हा उस्मानाबाद. फोन :२२६

१६) जिल्हा उद्योग केंद्र, मानसराम बिल्डींग, बशीरगंज जिल्हा बीड फोन : ५१७

१७) जिल्हा उद्योग केंद्र, शिवाजी नगर औद्योगिक वसाहत, नांदेड. फोन २२३४

१८) जिल्हा उद्योग केंद्र, कोरेगांव ऑक्ट्रॉय नाक्याजवळ नं. १०, परभणी. फोन : ४१०

१९) जिल्हा उद्योग केंद्र, आय. डी. सी. प्लॉट ७, औरंगाबाद रोड, जिल्हा-जालना. फोन : ३११८

२०) जिल्हा उद्योग केंद्र, एम. आय. डी. सी. एरिया, लातूर. फोन : २८५३

२१) जिल्हा उद्योग केंद्र, अध्यापक भवन, १५ माळा, नवीन बसस्टेशन, गणेश पेठ, नागपूर. फोन : २६९९

२२) ओल्ड कॉटन मार्केट, अकोला.

२३) जिल्हा उद्योग केंद्र, कलेक्टर ऑफिसजवळ, जिल्हा वर्धा. फोन :२३८२

२४) जिल्हा उद्योग केंद्र, कलेक्टर ऑफिसजवळ, जिल्हा अमरावती. फोन : २९६२

२५) जिल्हा उद्योग केंद्र, चिखली रोड, जिल्हा बुलढाणा. फोन : ६७

२६) गोदाणी रोड, यवतमाळ. फोन : २७९१

२७) जिल्हा उद्योग केंद्र, कलेक्टर कचेरीजवळ, जिल्हा- गडचिरोली.

२८) जिल्हा उद्योग केंद्र, नॅशनल हायवे, तहसिल कचेरीचे बाजूस, उप पोलीस अधिकारी यांचे कार्यालयाजवळ, जिल्हा भंडारा. फोन : २१४२

# रोजगार हमी योजनेद्वारे फळलागवडीची महत्त्वाकांक्षी योजना

रमेश जोशी

## फलोत्पादन कार्यक्रमाची ओळख

राज्यात कोरडवाहू शेती करणाऱ्या लहान, अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी हा कार्यक्रम मुख्यत: राबविला जाणार आहे. गरीब आदिवासी आणि अनुसूचित जातीतील नवबौद्धांचा या कार्यक्रमात अग्रक्रमाने विचार केला जाणार आहे. लहान शेतकऱ्यांबरोबर मोठ्या शेतकऱ्यांनाही या कार्यक्रमांचे काम मिळणार असले तरी काही अटींवरच या शेतकऱ्यांना सोयी सुविधा आणि सहाय्य पुरविले जाईल.

राज्यातील पावसाचे प्रमाण पाहता कमी पावसावर आणि सर्व प्रकारच्या हवामानात कमी पाण्यावर येणाऱ्या फळांच्या जातींचाच या कार्यक्रमात मुख्यत: समावेश करण्यात आला आहे.

## योजनेची वैशिष्टये

फळझाडाच्या लागवडीमुळे ग्रामीण भागातील अर्धवेळ शेतीच्या कामात गुंतलेल्या शेतकऱ्यांना विशेषत: तरूण बेरोजगार शेतकऱ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे हा या फलोत्पादन विकासाच्या कार्यक्रमाचा एक मुख्य उद्देश असल्याने या योजनेची सांगड रोजगार हमी योजनेशी घालण्यात आली आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात या योजनेवर अंदाजे रू. १०० कोटी इतका संकल्पित खर्च केला जाणार आहे. १९९०-९१ मध्ये या फळ पिकांची लागवड १.२० लक्ष हेक्टर क्षेत्रात करण्याचे लक्ष्य शासनाने ठरविले आहे. फळ पिके, त्यांचे जिल्हानिहाय लागवडीचे संकल्पित क्षेत्र या लेखाच्या अखेरीस स्थूलमानाने दिलेले आहे.

१९९०-९१ पासून संपूर्ण महाराष्ट्रात सुरू होत असलेल्या या योजनेची ठळक वैशिष्टये अशी:

## योजनेचा लाभ कुणाला मिळेल

या योजनेची सांगड रोजगार हमी योजनेशी घालण्यात आलेली असली तरीही या योजनेचा लाभ मात्र सर्व वर्गातील शेतकऱ्यांना होणार आहे. परंतु त्यातही अनुसूचित जाती/जमाती, नवबौद्ध, भटक्या जमाती/विमुक्त जाती तसेच अल्प, अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांनी ( नाबार्डच्या व्याख्येनुसार ) या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जाणार आहेत.

मोठ्या शेतकऱ्यांनाही या योजनेचे लाभ घेता येऊ शकतील. योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यास आपल्या शेतजमीनीतील किमान ०.२० हेक्टर व कमाल ४ हेक्टरपर्यंत मर्यादित क्षेत्रात फळझाडाची लागवड करता येईल.

## अनुदानाचे प्रमाण

जे शेतकरी अनुसूचित जाती/जमाती, नवबौद्ध, भटक्या जमाती किंवा अल्प व अत्यल्प भूधारक

या वर्गात मोडतात त्यांना हा कार्यक्रम राबविण्यासाठी शासनातर्फे १०० टक्के अनुदान दिले जाईल. इतर शेतकऱ्यांच्या बाबतीत मात्र या अनुदानाचे प्रमाण कमी आहे. ही अनुदानाच्या बाबतीत जी काही तफावत करण्यात येणार आहे ती फक्त साहित्य सामुग्रीच्या एकूण खर्चाच्या संदर्भात असेल या अनुदानासंबंधीचे जे धोरण आखण्यात आले आहे ते पुढीलप्रमाणे असेल.

(१) अनुसूचित जाती/जमाती, नवबौद्ध भटक्या जमाती/विमुक्त जाती तसेच अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या शेतांवर हा कार्यक्रम १०० टक्के अनुदानाने राबविला जाईल. या अनुदानापैकी साहित्य सामुग्री, म्हणजेच कलमे, रोपे, खते, औषधे आदी गोष्टी शासकीय खात्यामार्फत पुरविल्या जाणार असून मंजूर झालेल्या नियत प्रमाणानुसार मजुरीपोटी होणारा खर्चसुद्धा १०० टक्के दिला जाईल.

साहित्य सामुग्रीपोटी जो एकूण खर्च होईल तो एकाचवेळी न देता तो तीन वर्षात विभागून दिला जाईल. पहिल्या वर्षी ५० टक्के अनुदान दुसऱ्या वर्षी २५ टक्के अनुदान तर तिसऱ्या वर्षी २५ टक्के या प्रमाणात एकूण खर्चावरील अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना दिला जाईल.

(ब) इतर शेतकऱ्यांच्या बाबतीत मात्र मजुरीपोटी होणारा खर्च १०० टक्के देण्यात येणार असला तरीही साहित्य सामुग्रीवर होणारा जो एकूण खर्च आहे त्याच्या ७५ टक्केच अनुदान देण्यात येईल व हे अनुदान सुद्धा तीन वर्षे क्रमाक्रमाने विभागून दिले जाईल.

पहिल्या वर्षी ५० टक्के म्हणजे एकूण खर्चाच्या ३७.५० टक्के तर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी २५ टक्के म्हणजे एकूण खर्चाच्या १८.७५ टक्के या प्रमाणात हे अनुदान दिले जाईल.

अनुदान देताना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी लागवड झालेल्या फळझाडांपैकी किती फळझाडे जिवंत राहिली आहेत हे कटाक्षाने पाहिले जाईल व जिवंत झाडांचे प्रमाण व त्यांची वाढ यावर अनुदानाचे प्रमाण अवलंबून राहील. लावलेल्या फळझाडांच्या जगण्याचे प्रमाण दुसऱ्या वर्षी ७५ टक्क्यांपेक्षा कमी असेल तर शेतकरी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी [illegible] अनुदानास अपात्र ठरेल.

अनुदान देताना अशा प्रकारचे निकष ठरविताना शेतकऱ्याने आपल्या शेतात स्वतः खपून लागवडीकडे लक्ष पुरवावे अशी अपेक्षा आहे. अन्यथा योजनेचा जो मूळ हेतू आहे तो साध्य होणार नाही व शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतीला पर्याय देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या मूळ उद्देशालाच बाधा येईल. म्हणूनच फळझाडांची लागवड केल्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी शेतकऱ्यांनी कार्यक्रमात रस घेतला नाही किंवा उदासीनता दाखविली तर लागवडीवर झालेला अनुदानाचा खर्च वसूल करण्यात येणार आहे.

## लागवडीसाठी फळझाडांची निवड

या कार्यक्रमातून राज्यातील कोरडवाहू जमीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उत्पादनातील चांगला पर्याय देण्याचा उद्देश असल्याने ज्या फळझाडांची निवड करण्यात आली आहे त्यांना ओलिताची आवश्यकता भासणार नाही याचा कटाक्षाने विचार करण्यात आला आहे. कमी पाऊस, बेताची किंवा भरड जमीन, कमी परिश्रम, हवामान आणि सोपी मशागत या गोष्टींचा विचार करून शासनाने फळझाडांच्या लागवडीसाठी पुढील फळझाडांची निवड केली आहे.

(१) आंबा, (२) काजू, (३) नारळ, (४) चिकू, (५) फणस, (६) संत्री, (७) मोसंबी, (८) पपनस, (९) पेरू, (१०) डाळिंब, (११) अंजिर, (१२) चिंच, (१३) सिताफळ, (१४) आवळा, (१५) कवठ, (१६) बोर, (१७) जांभूळ,

(१८) फालसर, (१९) कोकम, (२०) चारोळी.

फळझाडांचे वरील प्रकार पाहिल्यानंतर ही फळझाडे सर्वसाधारणपणे महाराष्ट्राच्या बहुतांशी प्रदेशात होऊ शकतात असे दिसेल.

## लागवडीसाठी मुख्य अटी

(१) लाभार्थीच्या नावे शेत जमीन असली पाहिजे.

(२) लाभार्थीने आपल्या कुटुंबियांसमवेत ही योजना आपण सक्रीय भाग घेऊन राबविणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक आहे.

(३) शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार खर्चाच्या प्रमाणापेक्षा अधिक खर्च व्यक्तिगतरित्या केल्यास तो लाभधारकाला स्वतःच्या खर्चातून करावा लागेल.

(४) जो शेतकरी या योजनेचा लाभ घेणार असेल त्यास आपण स्वतः आणि आपल्या कुटुंबातील कार्यक्षम व्यक्ती रोजगार हमी योजनेंतर्गत प्रमाणित मंजूर असल्याचे घोषित करावे लागेल व त्यांचबरोबर प्रथमतः स्वतःच्या शेतीवरील लागवडीचे काम त्याला प्रथम प्राधान्याने पार पाडावे लागेल व नंतरच इतरत्र करावयाची कामे त्यांना स्वीकारता येतील.

(५) या योजनेत अलग शेतीवर लागवड करावी लागेल. बांधावरील लागवड त्यात अभिप्रेत नाही.

(६) संपूर्ण लागवडीचा कार्यक्रम म्हणजेच खड्डे खोदणे, इतर पूर्व तयारी, झाडांची लागवड, पाणी देणे, खते घालणे, कीटक नाशकांचा फवारा मारणे, झाडांचे संरक्षण करणे आदि कार्यक्रम लाभधारक शेतकऱ्यांना स्वतःच करावयाचे आहेत.

(७) लाभार्थीला मिळणारी अनुदानाची रक्कम त्याच्या नावे बँकेत जमा होणार असल्याने त्याने राष्ट्रीयीकृत किंवा सहकारी बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे.

(८) योजना राबविण्यासाठी संमती देऊन लाभधारकाने कोणतेही सहकार्य दिले नाही तर त्याच्यासाठी योजना राबविण्याचा जो काही खर्च आला असेल तो वसूल केला जाईल. इतकेच नव्हे तर त्यास कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही.

## योजना राबविण्याची पद्धती

फळझाडांच्या लागवडीचा हा कार्यक्रम कृषि संचालनालयातर्फे राबविला जाणारा प्रशिक्षण व भेट उपक्रम तसेच मृद्संधारण विभाग आणि फलोत्पादन संचालनालय यांच्या परस्पर सहकार्याने संयुक्तरित्या राबविला जाणार आहे.

फलोत्पादन विभागामार्फत फळझाडांची कलमे, रोपे पुरविण्यात येतील तर कृषि व फलोत्पादन विभागामार्फत खते व औषधांचा पुरवठा केला जाणार आहे.

हा कार्यक्रम प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतात राबविताना पुढील प्रकारची कार्यवाही केली जाईल.

(१) फळझाडांच्या लागवडीचा कार्यक्रम राबविण्यासाठी शेतकऱ्यांची पूर्वसंमती घेतली जाईल.

(२) संमती घेतल्यानंतर संपूर्ण प्रकल्पाचा एकत्रित प्रस्ताव तयार करण्यात येइल. त्यात शेतकऱ्याचे नाव, सर्वे नंबर, ज्या फळांची लागवड करावयाची त्यांचा तपशील, एकूण लागवडीचे क्षेत्र, प्रतिवर्षी येणारा खर्च आदि तपशीलाचा समावेश असेल.

(३) कार्यक्रमासाठी लागोपाठ तीन वर्षे येणाऱ्या खर्चाला सुरुवातीलाच मंजुरी दिली जाईल.

(४) केलेल्या कामाचे मोजमाप महिन्यातून एकदा करून देय अनुदानाची रक्कम लाभार्थीच्या बँकेतील खात्यात धनादेशाद्वारे जमा करण्यात

येईल. वर्षाच्या शेवटी मात्र त्या फळझाडांच्या खर्च प्रमाणकानुसार पहिल्या वर्षासाठीच्या संपूर्ण श्रमाच्या कामाची रक्कम त्याच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

प्रमुख कृषि अधिकारी, विभागीय मृद्संधारण अधिकारी, जिल्हा फलोत्पादन उपसंचालक हे कार्यक्रमाला व खर्चाला तांत्रिक मान्यता देतील व त्यास जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता देतील.

विभागीय स्तरावरील कृषि सहसंचालक (विस्तार), अधीक्षक, कृषि अधिकारी आणि अधीक्षक फलोद्यान अधिकारी हे त्यांच्या विभागातील कार्यक्रमाच्या खर्चावर प्रशासकीय, वित्तीय आणि तांत्रिक नियंत्रण ठेवतील.

## फळझाडांची लागवड आणि रोजगार हमी योजना

ही योजना रोजगार हमी योजनेखाली राबवावयाची असल्याने या कार्यक्रमाच्या अमंलबजावणीच्या दृष्टीने रोजगार हमी योजनेतील काही तरतुदी शिथील करण्यात आल्या आहेत. या शिथील केलेल्या तरतुदी अशा:

(१) काम करीत असलेल्या लाभधारकाचा हजेरीपट ठेवण्यात येणार नाही. तथापि लाभार्थी कुटुंबातील व्यक्तींची नावे मात्र जाहीर करावी लागतील व या व्यक्ती रोजगार हमी योजनेखाली काम करणार आहेत असे समजण्यात येईल.

(२) रोहयो योजनेतील सावलीसाठी शेड उभारणे, औषधे ठेवणे आदि तरतुदी या कार्यक्रमाला लागू होणार नाहीत.

(३) या कार्यक्रमाखाली धान्यासाठी कुपन्स देण्यात येणार नाहीत.

## कार्यक्रमाचे संनियंत्रणासाठी समित्या

या योजनेंतर्गत फळझाडाच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी तसेच संनियंत्रण करण्यासाठी तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर समित्या स्थापन करण्यात येतील.

आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात राज्यात राबविल्या जाणाऱ्या या फलोत्पादन विकास कार्यक्रमाखाली १९९०-९१ या वर्षात जिल्हानिहाय लागवडीखाली आणावयाचे क्षेत्र तसेच लागवड करावयाची फळझाडे यांचे संकल्पित क्षेत्र याबद्दलची माहिती परिशिष्टात दिलेली आहे.

१९९०-९१या वर्षात या कार्यक्रमासाठी रु.४४ कोटी इतका खर्च केला जाणार असून त्यापैकी रु.३८ कोटी इतका खर्च रोजगार हमी योजनेतून भागविला जाणार आहे.

## परिशिष्ट

### फळझाडे लागवडीसाठी संकल्पित क्षेत्र

| फळझाडे | संकल्पित क्षेत्र (हेक्टरमध्ये) | फळझाडे | संकल्पित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|
| १) आंबा | २५,००० | ११) अंजीर | ५० |
| २) काजू | ६,००० | १२) चिंच | २०० |
| ३) नारळ | १०,००० | १३) सिताफळ | ५,००० |
| ४) चिकू | ३०० | १४) आवळा | ४,००० |
| ५) फणस | १,००० | १५) कवठ | ५०० |
| ६) संत्री | ६,००० | १६) बोर | १० ते १५,००० |
| ७) मोसंबी | ५,००० | १७) जांभूळ | २,००० |
| ८) पपनस | १,००० | १८) फालसर | २०० |
| ९) पेरु | १,००० | १९) कोकम | १०० |
| १०) डाळिंब | ५,००० | २०) चारोळी | ५०० |

खूप खूप दु:खं बाकी आहेत
त्यांचेशी नाती सांगणारी कलावंत मनं हवी आहेत
पापण्यांवर थरथरणाऱ्या मोत्यांचे सौंदर्य पाहू शकणारी
दु:ख गोंजारायला नव्हे
हे जग सुंदर बनवायला ती हवी आहेत
माझ्या निवत्या डोळ्यात त्या कलावंतांच्या आगमनाची आस आहे

-बाबा आमटे

कर्माच्या रिकाम्या जागा ते भरतात
पोकळ शब्दांनी
क्रियांशी त्यांचा संबंध नसतो
ते फक्त प्रतिक्रियाच व्यक्त करू शकतात

-बाबा आमटे

# कुक्कुटपालन: शेतीस पूरक व्यवसाय

## ग. शां. पंडित

### १. कोंबडी पालन: इतिहास व प्रगती

कोंबडीचे मूळ उगमस्थान भारत व आशिया खंडातील भारताशेजारील देश आहे. प्रथम ही 'तांबडी जंगली कोंबडी' या नावाने ओळखली जात होती. सुरूवातीला आपल्या देशातील समृद्धतेचा, शास्त्रीय दृष्टीकोनाचा अभाव, परंपरा, आहाराच्या सवयी इत्यादि कारणांमुळे कदाचित कोंबड्यांच्या उपयुक्ततेकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे आपल्याकडील कोंबडी अप्रगत अवस्थेत (अजूनही) दिसून येते. याउलट पाश्चात्य राष्ट्रातील इंग्लीश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज या लोकांनी कोंबड्या त्यांच्या देशात नेल्या. तेथे त्यांना पद्धतशीर खाद्य-पाणी देऊन जोपासना केली व कोंबड्यांची अनुवंशिकता व उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी सतत प्रयत्न केले, पैदास केली व त्यातूनच आजची सर्वात प्रगत, सुधारित अशी कोंबडी निर्माण झाली. आपल्याकडील कोंबडी व सुधारित कोंबडी या दोन्हींमध्ये एक महत्त्वाचा फरक असा आहे की, आपल्याकडील कोंबडी वर्षाला २० ते २४ अंडी देते, परंतु सुधारित कोंबडी वर्षाला २०० ते ३०० अंडी देतात.

जगातील सध्याचे कोंबडी पालनाचे चित्र हे गेल्या ५० वर्षाच्या सततच्या शास्त्रशुद्ध प्रयत्नाचे फळ आहे; तर आपल्या देशातील सध्याचे या व्यवसायाचे चित्र गेल्या २० ते २५ वर्षांच्या प्रयत्नांचे फळ आहे. सन १९५६ मध्ये 'व्हाइट लेग हॉर्न' व 'ऱ्होड आयलंड रेड' या जातींची एक दिवसांची ३० हजार पिल्ले (चिकस्) परदेशातून आणून या व्यवसायास मुख्यत: सुरुवात झाली. ही पिल्ले देशातील निरनिराळ्या कुक्कुटपालन केंद्रावर वाढवण्यात आली. व कुक्कुटपालकांना व शेतकऱ्यांना ती वाटण्यात आली. पिल्लांची संख्या वाढू लागल्यामुळे १९६० सालापासून खाजगी क्षेत्रात पिल्लांचे उत्पादन करून लोकांच्या मागणीप्रमाणे पिल्लांचा पुरवठा करण्यात आला. या कार्यात प्रथम बॅबकॉक, पूना पर्लस, युनी चिकस्, अरबर एकर या हॅचरीज निघाल्या. यानंतर कुक्कुटपालन व्यवसायास संलग्न व आवश्यक असे इतर उद्योग म्हणजे कोंबड्यांचे खाद्य-निर्मिती कारखाने शासकीय व महामंडळे या स्तरावर चालू करण्यात आले. या व्यवसायात आपण बरीच प्रगती केली असली तरी जगातील इतर देशांच्या तुलनेत आपण बरेच मागे आहोत.

### २. महत्त्व व फायदे:

'कोंबडी' हा भारतातील खेड्यांमध्ये घरोघर पाळला जाणारा एक महत्त्वाचा पक्षी आहे. हा पक्षी सर्वच दृष्टींनी कसा उपयुक्त आहे याची माहिती बऱ्याच लोकांना नाही. तेव्हा या पक्षाचा फायदा व महत्त्व थोडक्यात पाहू.

### १. रोजगार

भारत हा शेतीप्रधान व खेड्यांचा देश आहे व एकूण लोकसंख्येच्या सुमारे ७०% लोक हे खेड्यात राहतात. पर्यायाने शेती हाच त्यांचा पारंपरिक व्यवसाय आहे. ही शेती पारंपरिक पद्धतीनेच कसली जाते. त्यामुळे जमिनीचा कस

निघून चालला आहे. त्यात नैसर्गिक असमतोलामुळे भारतीय शेतकरी दारिद्रयात अडकून पडला आहे. अशा वळेस बरेच शेतकरी व त्यांची मुले शहराकडे धाव घेतात. परंतु शहरांकडे हा लोंढा येत असल्यामुळे शहरे सुद्धा बकाल रूप धारण करू लागली आहेत. शिवाय लोकसंख्येच्या वाढीमुळे बेरोजगारीचा प्रश्नही फारच भेडसावू लागला आहे. जे आधीपासूनच शहरात राहतात, शिकतात त्यांना अनैच्छिक का होईना नोकऱ्या मिळतात. परंतु ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी. जे थोडे-फार शिकतात त्यांना कोणता कोर्स करायचा म्हटले तरी आर्थिक अडचणी उद्भवतात. अशा वेळेस 'कुक्कुटपालन' हा व्यवसाय अतिशय फायदेशीर ठरतो. अत्यल्प खर्चात व कमी वेळेत हा कोर्स पूर्ण करून आपल्याच गावात राहून शेतीला पूरक असा हा व्यवसाय फायद्याचा ठरतो. शिवाय अलिकडे महाराष्ट्र शासनाने हा व्यवसाय करणाऱ्यांना 'बिगर शेतीच्या दाखल्याची' (N.A.) अट काढून टाकली आहे व सहकारी आणि राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्जसहाय्य मिळण्याची तरतूद केली आहे.

## २. सकस अन्न

आरोग्य चांगले राहावे यासाठी फळे, पालेभाज्या, दूध इत्यादी अन्नपदार्थांचा खाण्याच्या दैनंदिन व्यवहारात उपयोग करावा असा डॉक्टर सल्ला देतात. परंतु या वस्तू सर्वांनाच परवडतात असे नाही. अशा परिस्थितीत कोंबडीचे अंडे हे किती स्वस्त व सकस अन्न आहे याची सांगून कोणाला कल्पना येणार नाही. अंड्यामध्ये प्रथिने, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, क्षार, पाणी विपुल प्रमाणात असतात. तांदूळ, दूध, मांस यांचे तुलनेत अंडे हे अन्नाच्यादृष्टीने बरेच सरस ठरले आहे; हे खालील आकडेवारीवरून दिसते.

| अन्नघटक | तांदूळ | गाईचे दूध | कोंबडीचे अंडे | मांस |
|---|---|---|---|---|
| पाणी | १३.० | ८७.३ | ७४.० | ६६.० |
| प्रथिने | ७.० | ३.५ | १२.४ | २०.२ |
| स्निग्ध पदार्थ | १.१ | ३.५ | ११.७ | १२.२ |
| पिष्टमय पदार्थ | ७८.० | ५.० | ०.९ | — |
| चोथा | ०.७ | — | — | — |
| क्षार | ०.८ | ०.७ | १.० | १.० |
| कॅलरीज (१००ग्रॅम) | ३५९.० | ६५.० | १६३.० | २००.० |
| जीवनसत्त्वे | — | १४८ | — | १३०० |

## ३. अंडी खाण्याचे प्रमाण व वजन

ज्यावेळेस नर व मादी यांचा संकर होतो तेव्हा त्या मादीपासून मिळणाऱ्या अंड्यात जीव तयार होतो. त्या अंड्याला 'सफल अंडे' असे म्हणतात. आणि हे अंडे मासांहारी असते. परंतु नराशिवाय मिळणारे अंडे हे 'अफल' किंवा शाकाहारी असते. आपल्याकडे अंडे हे मांसाहारीच असते हा एक मोठा गैरसमज आहे. त्यामुळे श्रावणात, दसरा-दिवाळी व इतर सणांच्या दिवशी लोक अंडी नाहीत.

भारतीय माणूस वर्षाला किती अंडी खातो

हे खालील आकडेवारीवरुन स्पष्ट होईल-

| जग | अमेरिका | जपान | चीन | भारत |
|---|---|---|---|---|
| ११५ | ३५२ | ३१२ | ९४ | १८ |

वरील आकडेवारीवरून असे दिसते की, भारतीय माणूस जगाच्या व इतर देशांच्या तुलनेत वर्षाला सरासरी फक्त १८ अंडी खातो. याचा परिणाम वजनावरही कसा होतो हे खालील आकडेवारीवरून समजेल.

**वजन तक्ता:**

| वय | भारत | इग्लंड | अमेरीका |
|---|---|---|---|
| ११ | २५ | ३५ | ५२ |
| १४ | ३८ | ५१ | ५८ |
| १६ | ३९ | ५३ | ६१ |

यावरून कोंबडीचे अंडे हे इतर अन्नपदार्थांच्या तुलनेत शरीराच्या वाढीस किती पोषक आहे, हे दिसून येते. आणि म्हणूनच समतोल व पूर्ण अन्न मिळवून देणारा ' कोंबडी ' हा पक्षी मानला जातो.

### ४. उत्तम सेंद्रीय खत

सध्या बाजारपेठेत अनेक कंपन्यांचे खत विक्रीसाठी आलेले आहे. परंतु या खतांमुळे जमीन कसदार होण्याऐवजी एक पीक घेतल्यानंतर ती कसदार राहात नाही किंवा नापीक बनते. युरिया या खताने पीक बरे येत असले तरी जमिनीची उत्पादनक्षमता त्यामुळे घटते. व जमीन कडक बनते. कारण त्या खतामध्ये NPK चे ( स्फुरद नत्र, पालाश ) प्रमाण विषम असते.

कोंबडीचे खत हे अतिशय दर्जेदार, पीकाला पोषक व वर्षानुवर्षे जमिनीचा कस टिकवून ठेवणारे आहे. यात नत्र- ३, स्फुरद- २ व पालाश- २ हे सारख्या प्रमाणात असल्यामुळे जमीन भुसमुशीत राहाते व पीकही जोमदार येते. शिवाय एक कोंबडी वर्षाला सुमारे २५ किलो खत देते. महाराष्ट्राच्या पूर्वभागात कोंबडीच्या खताला खूपच मागणी आहे व त्याचे भावही वेगवेगळे आहेत. सर्वसाधारणपणे १ टनास ३०० ते ४०० रुपये मिळतात. नाशिक जिल्ह्यात तर सर्वात जास्त म्हणजे १ टनास १३०० रुपये असा भाव आहे.

### ५. कोंबडीचे मांस

कोंबडीपासून अंडी व खत मिळते; एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष कोंबडीचा सुद्धा मांसासाठी उपयोग होतो. कोंबडीच्या मांसात २०% प्रथिने

असतात त्यामुळे शरीरास पोषक म्हणून मांसाचाही चांगला उपयोग होतो. कुक्कुटपालनाचाच एक भाग म्हणजे ब्रॉयलर ( मांसल ) पक्षी वाढविणे हा आहे. ब्रॉयलर पक्षी हे खास मांसासाठी वाढविले जातात. हे पक्षी जे खाद्य खातात त्या खाद्याचे रुपांतर मांसात होते. या पक्षाचे मांस फारच चवदार व लुसलुशीत असते,व ते शिजण्यासही कमी वेळ लागतो. या पक्षांच्या वजनात रोज ३० ते ४० ग्रॅम वाढ होते त्यामुळे साधारणत: ७ ते ८ आठवड्यात हे पक्षी विक्रीसाठी बाहेर काढले जातात. हा व्यवसाय अतिशय किफायतशीर आहे कारण ब्रॉयलर पक्षांची विक्री २ महिन्यात होते, त्यामुळे दोन महिन्यात आपल्याला आर्थिक फायदा मिळू शकतो.

### ३. प्रशिक्षण केंद्रे

वरील माहितीवरून आपल्या मनात या व्यवसायाविषयी उत्सुकता निर्माण झाली असेलच. या व्यवसायाचे प्रशिक्षण खालील केंद्रावर देण्यात येते-

१ ) मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र,
पुणे-मुंबई रस्ता खडकी, पुणे-४११००३

२ ) मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र,
कोल्हापूर

३ ) कृषी विकास प्रतिष्ठान,
कार्यालय: भिगवण चौक, बारामती, जि. पुणे.

४ )पूना पर्ल्स, सोलापूर रोड,
हडपसर, पुणे- २८.

याशिवाय जिल्हा परिषदा, नगरपालिका, पंचायत समित्या, किंवा स्वयंसेवी संस्थामार्फतही ' कुक्कुटपालन वर्ग ' साधारण ७-८ दिवसांचे महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी घेतले जातात. वरीलपैकी मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र, पुणे व कोल्हापूर येथे शासनाच्या वतीने १ महिना व ६ महिने मुदतीचे अभ्यास चालविले जातात. या प्रशिक्षणास १२ रु. फी + २० रु. अॅडव्हान्स = ३२ रुपये १ महिन्याच्या कालावधीसाठी भरावे लागतात. राहण्याची सोय नसते. सहा महिने मुदतीच्या प्रशिक्षणास मात्र पूर्ण वेळ द्यावा लागतो. यासाठी १ महिना मुदतीचे प्रशिक्षण पूर्ण व दहावी उत्तीर्ण असावे लागते. एका बॅचला फक्त ५ ते ६ प्रशिक्षणार्थींनाच प्रवेश मिळतो. वसतिगृहात राहण्याची सोय असते.

कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती येथे १ महिना मुदतीचा अभ्यासक्रम असून तिथे राहण्याची सोय मोफत केली जाते. फक्त अभ्यासक्रमाची फी व जेवणाचा खर्च करावा लागतो.

### ४. प्रवेश पात्रता:

१ महिना मुदतीच्या अभ्यासक्रमासाठी शिक्षणाची अट नाही. फक्त लिहिता-वाचता यावे लागते व शेतकरी व घरी कोंबड्या असल्यास प्राधान्य मिळते. सहा महिने मुदतीच्या अभ्यासक्रमासाठी प्रत्यक्ष काम करण्याची तयारी व दहावी उत्तीर्ण + १ महिना मुदतीचे प्रशिक्षण प्रमाणपत्र असावे लागते.

### ५. अर्जाचा नमुना

मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र, पुणे व कोल्हापूर येथे प्रशिक्षणासाठी अर्ज करताना तो खाली दिलेल्या नमुन्यात करावा-

## अर्जाचा नमुना

मा. व्यवस्थापक
मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र,
पुणे / कोल्हापूर.

महाशय,

मी खाली सही करणार श्री./श्रीमती/कु. ........ कारणे विनंती अर्ज करतो / करते की, मला आपले केंद्रावर एक महिना / सहा महिने मुदतीच्या प्रशिक्षण वर्गात प्रवेश मिळण्याबद्दल विनंती आहे. प्रवेश मिळाल्यास केंद्रावरील नियमाबरहुकुम शिक्षण घेण्याची व तत्संबंधी पडणारी सर्व तऱ्हेची कामे करण्याची माझी पूर्ण तयारी आहे. मी माझी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे-

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव ( आडनाव प्रथम ):........
२. अर्जदाराची जन्मतारीख, जन्मस्थळ, वय: ........
३. कायमचा पत्ता: ..........
४. हल्लीचा पत्ता: .........
५. धर्म / जात: .......
६. शिक्षण: .......
७. व्यवसाय ( स्वत:चा अगर पालकाचा ): ........
८. शेती: ........
९. स्वत:चे अगर पालकाचे वार्षिक उत्पन्न: .......
१०. कोंबड्या पाळल्या असल्यास किती व तत्संबधीचा तपशील: ......
११. प्रशिक्षणाचा हेतु: .......
१२. वसतिगृहात प्रवेश पाहिजे काय: ..........
१३. सोबत वर्तणुकीचे दोन दाखले जोडले आहेत.

अर्जदाराची सही

स्थळ:
दिनांक:

---

वरील अर्जासोबत दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे वर्तणुकीचे दाखले ( शिफारस पत्र ) जोडावेत

# मधमाशापालन व रेशीम उद्योग

## ग. शां. पंडित

आदिवासी भाग आणि ग्रामीण भाग यात बराच फरक आहे, त्यामुळे साहजिकच आदिवासी लोकांचे प्रश्न हे इतरांपेक्षा वेगळे असणार. कारण एकतर आदिवासी डोंगराळ व जंगली भागात विखुरलेले असतात. त्यामुळे त्यांच्याकडे स्वत:ची जमीन नसते. भांडवल व शिक्षणाचा अभाव असल्यामुळे नवीन उद्योग ते करू शकत नाही. केवळ शेतमजूरी व इतर छोटे उद्योग करून आपली उपजिविका करण्यावाचून त्यांना गत्यंतर नाही. वर्षानुवर्षे दारिद्र्यात खितपत पडण्यावाचून अन्य काही जमत नाही.

अशा दारिद्र्यावर मात करण्यासाठी अत्यल्प भांडवलात व थोड्याशा प्रशिक्षणाने करता येणारे किफायतशीर उद्योग सुरू करण्यावर व त्यांना प्रोत्साहन देण्यावर शासनाने भर दिला आहे. पैकी मधमाशापालन व रेशीम उद्योग या दोन उद्योगांची ही ओळख-

### (१) मधमाशापालन:

आदिवासी क्षेत्रात मधमाशापालन हा एक चांगला उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. शिक्षित आदिवासी तरुण किंवा सुशिक्षित बेकारांना प्रशिक्षणानंतर हा व्यवसाय फारच उपयुक्त ठरणारा आहे.

मधमाशा या सांधिक जीवन जगतात, त्यामुळे त्यांचं संगोपन करण्याची जबाबदारी आपल्यावर नसते. ऊन किंवा थंडीची तीव्रता अधिक असल्यास मधमाशा मध गोळा करू शकत नाही. म्हणून त्या आधीच त्याचा पुरेसा साठा करून ठेवतात. आणि हाच मध मधपाळ पळवितात व मधमाशांना तग धरून राहण्यासाठी दरमहा साधारण किलो-अर्धाकिलो साखरेचा पाक देतात. मध आणि साखरेच्या दरातील तफावत हाच आपला नफा असतो. मध व मेणाव्यतिरिक्त मोहोळांचे उत्पादन, राणी माशांचे उत्पादन, पिके व फळबागांचे मधमाशांकरवी नियोजित परागवहन या उत्पादनाच्या बाबी आहेत. देशातल्या देशातही मधाला खूपच मागणी आहे. सातेरी व कोकणी मधमाशा विशेषत: मधासाठी पाळल्या जातात. त्यातही सातेरी सारख्या मधमाशा अतिशय मवाळ असल्यामुळे त्यांनी केलेला दंश जाणवत नाही, म्हणून गुराख्याची मुलेसुद्धा त्यांची मोहळं हाताळतात.

कोरडवाहू मैदानी किंवा डोंगरउतारावरची पिके उदा. मका, ज्वारी, बाजरी, चवळी, हुलगा, तेलबिया, कापूर, फळबागा, मसाल्याचे पदार्थ, चहा, रबर, कॉफी, कोको इत्यादी पिकांचा मधमाशांच्या मोहोळाच्या उत्पादनाशी व राणी माशीच्या पैदासीशी घनिष्ठ संबंध आहे. मधमाशापालनासाठी डोंगराळ, थंड हवेचा भाग उपयुक्त असतो.

अलीकडे सरकारने या उद्योगाला विशेष प्राधान्य दिले असल्याने राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्ज व खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत मोफत प्रशिक्षण, विद्यावेतन व भांडवली मदत दिली जाते.

अधिक माहितीसाठी:

संचालक, केंद्रीय मधुमक्षिका पालन केंद्र,

गणेशखिंड रोड, पुणे- ४११०१६. येथे संपर्क साधावा.

## (२) रेशीम उद्योग:

या उद्योगात मुख्यतः रेशीम कीटकांच्या खाद्य झाडांची लागवड करणे, त्यावर रेशीम कीटकांचे पालन करून कोष मिळवणे या प्रक्रियेचा समावेश होतो. आदिवासींचे मुख्यतः भूधारक व भूमीहीन असे दोन प्रकार आहेत. या दोन प्रकारांतल्या आदिवासींसाठी दोन योजना आहेत-

### (१) तुती रेशीम योजना-

या योजनेत भूधारक आदिवासींनी आपल्या जमिनीत तुतीची लागवड करायची असते. जून महिन्यात ही लागवड करतात. ४-५ महिन्यात वाढ पुरेशी होऊन तुतीची पाने रेशीमकीटकांना खाद्य म्हणून वापरण्यास योग्य होतात. या पानांचा उपयोग करून ३० दिवस रेशीम कीटकांचे संगोपन करावे लागते. याकामी थोडेसे कष्ट घ्यावे लागतात.

तुतीच्या झाडांची वर्षभर व्यवस्थित निगा राखणे व झाडांपासून जास्तीत जास्त पाला उपलब्ध करून देणे यावर उद्योगाचे शेकडा ६० टक्के यश अवलंबून असते. आदिवासी भागात पाऊस भरपूर असल्याने वर्षातून साधारणतः ३-४ पिके २॥ महिन्यांच्या अंतराने मिळू शकतात. वार्षिक उत्पन्न सुमारे २ ते ३ हजार रूपये एकरास प्रति वर्षास मिळते.

### (२) तसर रेशीम योजना-

ही योजना भूमीहीन आदिवासींसाठी व पूर्णपणे नैसर्गिक स्वरूपाची आहे. जंगलात ऐन, साल, ओक इ. झाडे निसर्गतः मोठ्या प्रमाणात असतात. या झाडांची दाट संख्या असणारा पट्टा निवडण्यात येतो. ऐनाच्या व्यतिरिक्त अनुपयोगी झाडे तोडली जाऊन तेथे ऐनांची लागवड केली जाते व एक सलग, ऐनाची दाट लागवड असलेला भाग तयार करण्यात येतो. आदिवासींना (निवडीनंतर) ही जमीन अल्प मोबदल्यात उपलब्ध करून दिली जाते. या जमिनीत असणाऱ्या ऐनाच्या झाडाच्या पाल्याचा उपयोग करून आदिवासींना तसर रेशीम कीटकांचे पालन करावयाचे असते. अशारीतीने पालन केलेल्या कीटकांपासून तसर रेशीम कोश तयार होतात. तसर रेशीम कीटकाचे संगोपन प्रत्यक्ष झाडावर व्हावयाचे असल्याने, हे संगोपन निसर्गावर अवलंबून असते. तसर रेशीम उद्योगातून एक कुटुंब वर्षभरात सुमारे १॥ ते २ हजार रुपये तीन पिकांमध्ये मिळवू शकते.

महाराष्ट्रात ही योजना खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविली जाते. या मंडळामार्फत खालीलप्रकारे मदत मिळते.

(१) तुतीचे बेणे पुरविते. (२) तांत्रिक मार्गदर्शन करते. (३) रेशीम कीटकांची अंडीपुंज पहिली दोन वर्षे मोफत व त्यानंतर वाजवी दराने पुरविते. (४) शेतकरी व आदिवासींना दोन महिन्यांचे मोफत प्रशिक्षण, विद्यावेतन, व मोफत निवासाची सोय. (५) तयार झालेले कोश रास्त भावाने खरेदी करते. (६) बँकेकडून रेशीम उद्योगासाठी कर्जाची मागणी केली असल्यास त्यास शिफारस देते.

अधिक माहितीसाठी भेटा/लिहा-

विकास अधिकारी, रेशीम उद्योग मध्यवर्ती कार्यालय, २४ ब, पुणे-मुंबई मार्ग, खडकी, पुणे-४११००३.

# विविध स्पर्धा परीक्षा

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध (एन. टी. एस.) परीक्षा

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा ही इयत्ता १० वीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असते. शासनमान्य शाळेत शिकणारे इयत्ता १० वीतील विद्यार्थी या परीक्षेस बसू शकतात. या परीक्षेसाठी उत्पन्नाची अथवा किमान गुणांची अट नाही. ही परीक्षा दोन स्तरांवर घेण्यात येते. राज्य स्तरावरील परीक्षा साधारणतः ऑक्टोबर/नोव्हेंबर या कालावधीत घेतली जाते. ह्या परीक्षेतून निवड झालेले विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत बसू शकतात. राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा मे महिन्यत साधारणतः घेतली जाते.

राज्यस्तरीय राष्ट्रीय प्रज्ञा परीक्षेसाठी खालील दोन प्रश्नपत्रिका असतात. त्याचे स्वरूप लेखी असते.

१) शालेय क्षमता कसोटी १०० गुण

२) सामान्य बौद्धिक क्षमता कसोटी १०० गुण

दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी प्रत्येकी दीड तासांचा कालावधी असतो. शालेय क्षमता कसोटी ही प्रश्नपत्रिका इयत्ता १० वीच्या अभ्यासक्रमावर आधारित असते. या प्रश्नपत्रिकेसाठी खालील आठ विषयापैकी कोणतेही चार विषय निवडता येतील.

१) भौतिकशास्त्र, २) रसायनशास्त्र, ३) जीवशास्त्र, ४) गणित, ५) इतिहास, ६) नागरिकशास्त्र, ७) भूगोल, ८) अर्थशास्त्र.

प्रश्नपत्रिका इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी, सिंधी, कन्नड व उर्दू या भाषांमध्ये उपलबध असतात. परंतु उत्तरपत्रिका गणकयंत्र पद्धतीच्या असतात.

ही परीक्षा प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी घेतली जाते. परीक्षेच्या आवेदनाची किंमत दोन रुपये असते. आवेदनपत्रे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद किंवा शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाकडून योग्य काळात उपलब्ध होतात. परीक्षेचे शुल्क रु, २०/- असते.

या परीक्षेसंबंधीची आवश्यक ती माहिती वर्तमानपत्र, टी.व्ही व रेडिओ माध्यमांद्वारे योग्य वेळी केली जाते.

राष्ट्रीय पातळीवरील प्रज्ञा शोध परीक्षा दरवर्षी साधारणतः मे महिन्यामध्ये एन्. सी. ई. आर टी. नवी दिल्ली संयाजित करते परीक्षेचे स्वरूप लेखी व मौखिक असते.

लेखी परीक्षेसाठी दोन प्रश्नपत्रिका असतात. त्यापैकी एक शालेय क्षमता कसोटी १०० गुणांची व दुसरी सामान्य बौद्धिक क्षमता कसोटी १०० गुणांची. दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी प्रत्येकी ९० मिनिटांचा कालावधी असतो. लेखी परीक्षेतून निवड झालेल्या उमेदवारांसाठी मौखिक परीक्षा एन्. सी. ई. आर टी. नवी दिल्ली यांच्या वतीने घेण्यात येते. अंतिम परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना खालील दराने शिष्यवृत्ती देण्यात येत.

१) दरमहा रु. १५०/- शालान्त परीक्षोत्तर दोन वर्षासाठी व दरवर्षी रु. २००/- पुस्तक अनुदान.

२) दरमहा रु. २००/- शास्त्र व सामाजिक शास्त्राच्या द्वितीय पदवीपर्यंतच्या व अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखेच्या प्रथम पदवी शिक्षणासाठी अधिक दरवर्षी रु. ३००/- पुस्तक अनुदान.

३) दरमहा रु. ४००/- अभियांत्रिकी व वैद्यकीय शाखेच्या द्वितीय पदवीपर्यंत.

४) दरमहा रु. ६००/- शास्त्र शाखा व सामाजिक शास्त्र शाखांमध्ये पीएच. डी. पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या दोन वर्षासाठी व पुढील दोन वर्षासाठी दरमहा रु. ७००/- अधिक दरवर्षी ३००/- सादिल खर्चास्तव.

ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. १०००/- पर्यंत आहे त्या विद्यार्थ्यांना वरील दराने १०० टक्के शिष्यवृत्ती मिळते. ज्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. १०००/- पेक्षा जास्त असेल त्यांना वरील दराच्या ५० टक्के शिष्यवृत्ती मिळते.

राज्यस्तरीय परीक्षेसाठी आयुक्त, शासकीय परीक्षा मंडळ, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१ व राष्ट्रीय पातळीवरील प्रज्ञा शोध परीक्षेसंबधीच्या अधिक माहितीसाठी एन्. सी. ई. आर टी. नवी दिल्ली यांच्याशी पत्रव्यवहार करावा.

## शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा

१९७६ पर्यंत खात्यातर्फे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येत होती. त्यानंतर अध्यापन पदविका प्रमाणपत्र परीक्षा हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. त्याची ही शेवटची परीक्षा एप्रिल १९८८ मध्ये घेण्यात आली. सध्या चालू असलेला शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा अभ्यासक्रम १९८३ पासून सुरू करण्यात आला आहे.

या शिक्षणाचा कालावधी एकूण दोन वर्षाचा आहे. हा शिक्षणक्रम सलगपणे पूर्ण होणे आवश्यक आहे.

या अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांची किमान शैक्षणिक पात्रता माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असली पाहिजे. ते माध्यमिक शालान्त परीक्षेसाठी गणित, इंग्रजी व विज्ञान हे विषय घेऊन उत्तीर्ण झाले असावेत.

शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार इयत्ता १ ते ७ वीच्या वर्गांना शिकविण्यासाठी पात्र शिक्षक म्हणून समजला जातो.

या पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये तात्त्विक भागांबरोबरच प्रात्यक्षिक कार्यालाही महत्त्व देण्यात आले आहे. प्रत्येक वर्षासाठी तात्त्विक भागासाठी ६ विषय ठेवण्यात आले आहेत. व त्यासाठी प्रत्येक विषयाचे १०० गुणाप्रमाणे ६०० गुण ठेवण्यात आहे आहेत. तात्त्विक विभागाची परीक्षा प्रतिवर्षी शासकीय परीक्षा मंडळामार्फत घेतली जाते. प्रात्यक्षिक भागातील विविध उपक्रमांची नोंद अंतर्गत मूल्यमापन या सदरामध्ये संबंधित अध्यापक विद्यालयांनी करावयाची आहे.

परीक्षेसाठी आवश्यकतेनुसार संपूर्ण महाराष्ट्रात केंद्रांची संख्या निश्चित केली जाते व प्रत्येक केंद्रात सोईच्या दृष्टीने संस्था जोडण्यात येतात. प्रत्येक केंद्रावर विहित कालावधीत परीक्षा घेण्यात येतात.

## पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा

शिष्यवृत्ती विभागातर्फे शालेय स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेचे संयोजन केले जाते. या सर्व परीक्षा स्पर्धात्मक स्वरूपाच्या आहेत. प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेणे, त्यांना पुढील शिक्षणाची संधी मिळवून देणे, त्यासाठी उत्तेजन व आर्थिक सहाय्य मिळवून देणे ही परीक्षेमागील उद्दिष्टे आहेत.

प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील बुद्धिमान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना पुढील

अभ्यासक्रमासाठी आर्थिक सहाय्य व उत्तेजन देणे हे या शिष्यवृत्ती परीक्षेचे उद्दिष्ट आहे.

**शिष्यवृत्तीचा दर:**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही या शिष्यवृत्ती परीक्षेचा लाभ मिळावा म्हणून ग्रामीण व शहरी भागासाठी शिष्यवृत्तीची वेगवेगळी संख्या निश्चित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील शिष्यवृत्त्यांची संख्या पूर्व माध्यमिकसाठी २३३१ व माध्यमिकसाठी २४४४ आहे. पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेत गुणवत्तेने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा अनुक्रमे रू. १०/- व रू. १५/- या दराने शिष्यवृत्ती दिली जाते. पूव्र माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा ग्रामीण विभागात प्राविण्य प्राप्त केलेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना 'राष्ट्रीय विशेष गुणवत्ता शिष्यवृत्ती' दिली जाते. या शिष्यवृत्तीचा दर अनुक्रमे रु.१५/- व रू २५/- असा आहे. जनजाती विकास क्षेत्रातही गुणवत्तेवर आधारित प्रत्येकी दोनाप्रमाणे वरील दराने शिष्यवृत्त्या दिल्या जातात. विदर्भामधील आठ जिल्ह्यातील पूर्व माध्यमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आधारित अनुक्रमे रू. १२/- व रू. २०/- अशी विद्यावेतने दिली जातात. यासाठी संबंधित पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. १२००/- किंवा त्यापेक्षा कमी असला पाहीजे.

परीक्षेचे स्वरूप:

**पात्रता:**

इयत्ता चौथीमध्ये शिकत असणारा व त्या शैक्षणिक वर्षात १ जुलैस १२ वर्षापेक्षा कमी वय असणारा विद्यार्थी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेला बसण्यासाठी पात्र असतो. तसेच इ. ७ वीत शिकणारा व १ जुलैस १५ वर्षापेक्षा कमी वय असणारा विद्यार्थी/विद्यार्थीनी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस बसण्यासाठी पात्र समजला जातो. ही परीक्षा सर्वसाधारणपणे दरवर्षी एप्रिलच्या शेवटच्या रविवारी असते.

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांना भाषा, गणित, बुद्धिमत्ता चाचणी हे तीन विषय प्रत्येकी १०० मुद्द्यांचे असतात. प्रत्येक प्रश्नपत्रिका एक तासात सोडवावयाची असते. या परीक्षा मराठी, हिंदी, गुजराथी, कन्नड, तेलगू, सिंधी या माध्यमातून घेतल्या जातात. वरील दोन्ही परीक्षांचे संचलन जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व बृहन्मुंबई शिक्षण निरीक्षक यांच्यामार्फत करण्यात येते.

**शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा**

१९६६ पासून महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांनी संधी मिळावी यासाठी राज्यात धुळे, अमरावती, औरंगाबाद व सातारा (पुसेगाव) ही चार शासकीय विद्यानिकेतने विभागवार सुरू केली. या विद्यानिकेतनात स्पर्धात्मक परीक्षेवर गुणवत्तेवर आधारित दरवर्षी इ. ५ वीमध्ये ३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. मार्च १९८२ पूर्वी या विद्यानिकेतनातील प्रवेशासाठी वेगळी परीक्षा घेण्यात येत होती. मार्च १९८२पासून ही परीक्षा पुर्व माध्यमिक परिक्षेबरोबरच घेण्यात येते. ग्रामीण भागातील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला पूर्व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परीक्षेच्याबरोबर विद्यानिकेतन प्रवेशासाठीही परीक्षा देता येते.

वरील परीक्षेचे संचलन व व्यवस्थापन शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद हे मंडळाचे प्रतिनिधी म्हणून पाहतात. एप्रिल १९८६ पासून परीक्षा संगणकाच्या सहाय्याने आयोजित केली जाते व परीक्षापूर्व आणि तपासणीसह परीक्षोत्तर कामे संगणकाच्या सहाय्याने होतात.

## आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा

विकासाचे स्रोत समाजाच्या दुर्बल घटकांपर्यंत पोहोचवावेत या दृष्टीने शासनाच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी केळापूर जिल्हा यवतमाळ येथे आदिवासी विद्यानिकेतन सप्टेंबर १९८१ पासून सुरू करण्यात आले. या विद्यानिकेतनात दरवर्षी ८० मुलांना प्रवेश मिळतो. या विद्यानिकेतनाव्यतिरिक्त राज्यात अस्तित्वात असलेल्या चार विभागावार शासकीय विद्यानिकेतनांमधून प्रत्येकी १० प्रमाणे एकूण ४० आदिवासी विद्यार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत.

विद्यानिकेतनामध्ये या विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण, निवास, भोजन इ. व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात येते. यासाठी महाराष्ट्र राज्यात स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. आदिवासी भागातील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना या प्रवेश परीक्षेसाठी बसता येते. यासाठी परीक्षा शुल्क नाही. ही परीक्षा मार्च महिन्यात घेण्यात येते. ही परीक्षा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद हे जिल्हा स्तरावर आयोजित करतात. पाल्य व पालकांना या परीक्षेस येण्या-जाण्यासाठी प्रवास-भत्ता मिळतो.

परीक्षेसाठी भाषा, गणित व सामान्यज्ञान विषयाच्या प्रत्येकी ५० गुणांच्या तीन प्रश्नपत्रिका असतात. गुणवत्तेवर आधारित विद्यार्थ्यांना शासकीय आदिवासी विद्यानिकेतनामध्ये तसेच इतर शासकीय विद्यानिकेतनामध्ये प्रवेश देण्यात येतो.

## सैनिकी शाळांतील प्रवेशासाठी परीक्षा शुल्कमाफी व शिष्यवृत्तीसाठी परीक्षा

महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये सैनिकी शिक्षणाची आवड निर्माण व्हावी हा या परीक्षेचा हेतू आहे. यासाठी दरवर्षी १००० रूपयांच्या तीन शिष्यवृत्त्या देण्यात येतात. महाराष्ट्र राज्यात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येतो.

परीक्षा पद्धती:

ही परीक्षा फक्त पुणे केंद्रावर घेतली जाते. परीक्षा सर्वसाधारणपणे एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात येते. इंग्रजी व गणित, चालू घडामोडींबाबतचे सामान्यज्ञान असे तीन विषय असतात. प्रत्येक प्रश्नपत्रिका १०० गुणांची असते. परीक्षेचे माध्यम इंग्रजी असते. लेखी परीक्षा व मुलाखत यांच्या आधारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना श्री शिवाजी मिलीटरी स्कूल, पुणे किंवा भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक या शाळांतून प्रवेश घ्यावा लागतो.

खालील अटी पूर्ण करणारे विद्यार्थी या परीक्षेसाठी बसण्यास पात्र आहेत-

१) विद्यार्थी इयत्ता ८ वीत शिकत असला पाहिजे.

२) विद्यार्थ्याचे वय ३० एप्रिलला १३ वर्षापेक्षा कमी व १४ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) शिवाजी मिलीटरी स्कूल, भोसला मिलीटरी स्कूल या संस्थांमधून अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर या विद्यार्थ्यांना केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस बसून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, खडकवासला येथील प्रवेशाबद्दल करारनामा लिहून द्यावा लागतो.

शुल्कमाफीसाठी पात्र होण्यास विद्यार्थ्यास खालील अटी पूर्ण कराव्या लागतात-

१) विद्यार्थी इयत्ता सातवीत शिकत असला पाहिजे.

२) पालकाचे वार्षिक उत्पन्न रू. ६०००/- पेक्षा कमी असावे.

३) त्याचे वय ३० एप्रिलला १२ वर्षापेक्षा कमी व १३ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

ही निवड सातारा सैनिक स्कूल परीक्षेमार्फत करण्याचा प्रस्ताव शासनाकडे निर्णयाधीन आहे.

## नॅशनल इंडियन मिलीटरी कॉलेज-डेहराडून प्रवेश परीक्षा

सैनिकी पेशाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी या हेतुने भारत सरकारच्या वतीने पुणे यथे दोन वेळा ऑगस्ट व फेब्रुवारीमध्ये परीक्षा आयोजित करण्यात येते. या परीक्षेसाठी इंग्रजी, गणित व सामान्यज्ञान या तीन प्रश्नपत्रिका असतात.

परीक्षा इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमानुसार आधारीत असते. इंग्रजी व गणित विषयांच्या प्रश्नपत्रिकांची उत्तरे इंग्रजी माध्यमातून लिहावी लागतात. सामान्यज्ञान या विषयाची उत्तरपत्रिका प्रादेशिक भाषेत लिहिता येते. लेखी परीक्षेनंतर विद्यार्थ्याची मुलाखत घेतली जाते. या परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण मिलीटरी कॉलेज, डेहराडून या सैनिकी शाळेत १२ पर्यंतच्या शिक्षणासाठी प्रवेश मिळतो.

शासनातर्फे त्यांच्या पालकांचे उत्पन्न दरमहा रु. ५००/- च्या आत असेल तर वार्षिक १५०० रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते. पालकांना पाल्याचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत कॉलेजमध्ये ठेवण्याचा करारनामा लिहून द्यावा लागतो.

ही परीक्षा पुणे केंद्रावर घेतली जाते. या परीक्षेत बसण्यापूर्वी विद्यार्थ्याचे वय ११ ते १२ या वयोगटातील असावे लागते. परीक्षेचा निकाल परस्पर कॉलेजतर्फे संबधितांना कळविला जातो.

## भारत सरकार निवासी शाळा

### शिष्यवृत्ती परीक्षा:

भारत सरकारच्या उत्तम शिक्षण देणाऱ्या निवासी शाळांमध्ये दरवर्षी स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. ११ ते १३ वयोगटातील व परीक्षेच्या वेळी इयत्ता ८वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला या परीक्षेस बसता येईल.यासाठी उत्पन्न दरमहा रु. ५००/- च्या आत असावयास पाहिजे. ही शिष्यवृत्ती परीक्षा दोन स्तरावर होते.

१. प्राथमिक चाचणी: दरवर्षी जुलैमध्ये

२. अंतिम चाचणी: सप्टेंबरमध्ये

प्राथमिक चाचणी जिल्हा स्तरावर घेतली जाते.प्राथमिक चाचणी भाषा व गणित या दोन विषयाची घेतली जाते. अंतिम चाचणी राज्यस्तरावर घेतली जाते. ही चाचणी सप्टेंबरमध्ये होते. प्राथमिक चाचणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अंतिम चाचणीस बसावे लागते. त्यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनातर्फे विकल्प दिलेल्या तीन निवासी शाळांपैकी कोणत्याही एका शाळेतून प्रवेश दिला जातो.माध्यमिक शिक्षणाचा सर्व खर्च केंद्र सरकार करते. १५ टक्के शिष्यवृत्त्या या मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत. गेल्या चार वर्षात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

### सांस्कृतिक बुद्धीमत्ता शोधन परीक्षा:

नृत्य, नाट्य, वाद्य, संगीत चित्रकला इ. कलांची आवड असणाऱ्यांचा उत्तेजनार्थ व अधिक प्रगती करण्यासाठी केंद्रशासनातर्फे आर्थिक सहाय्य दिले जाते. १० ते१४ वयोगटातील व जे परीक्षेसाठी पात्र समजले जातात. त्याप्रमाणे पालकांचे उत्पन्न दरमहा १५००/- रुपयांच्या आत असले पाहिजे. ही शिष्यवृत्ती कॉलेजच्या शेवटच्या वर्षापर्यंत किंवा वयाच्या विसाव्या

वर्षापर्यंत शिष्यवृत्तीधारकाची प्रगती समाधानकारक असल्यास चालू राहते.

**परीक्षा पद्धती:**

केंद्र शासनाने प्रत्येक राज्यासाठी शिष्यवृत्तीचे ठराविक संच मंजूर केले आहेत. विभागीय निवड मंडळे प्रत्येक राज्यातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करते. सर्व राज्यातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मध्यवर्ती निवड मंडळातर्फे मान्यता देण्यात येते. या परीक्षेचे केंद्र महाराष्ट्र राज्यासाठी मुंबई हे आहे.

**शिष्यवृत्ती दर:**

विद्यार्थ्यांना पुढील विशेष शिक्षणासाठी एखाद्या संस्थेत किंवा गुरूकडे जावे लागते. हे शालेय शिक्षणाबरोबर चालू ठेवता येते. विद्यार्थ्यांचे पुढील विशेष शिक्षण त्याच्या गावीच चालू असल्यास त्याला दरमहा रु.५०/- ची शिष्यवृत्ती देण्यात येते तो दुसऱ्या ठिकाणी विशेष शिक्षणासाठी राहिल्यास त्याला दरमहा रु. १००/- शिष्यवृत्ती मिळते. या शिष्यवृत्तीचे ठराविक कालावधीनंतर नूतनीकरण शासनांकडून करण्यात येते.

## वाणिज्य शाळा प्रमाणपत्र परीक्षा
## वाणिज्य शाळा पदविका परीक्षा

वाणिज्य शाळा प्रमाणपत्र परीक्षा व वाणिज्य पदविका परीक्षा या परीक्षांच्या संचलनासाठी शासकीय परीक्षा मंडळाकडे स्वतंत्र विभाग आहे.

**उद्देश:**

ज्यांना वाणिज्य पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करणे शक्य नाही. ज्यांना नोकरीची आवश्यकता आहे अशांना वाणिज्य शाळा प्रमाणपत्र परीक्षा परीक्षा किंवा वाणिज्य पदविका परीक्षा पास झाल्यास शासनाची कार्यालये, नगरपालिका, जिल्हा परिषद व खासगी संस्थामधून लेखानिकाची नोकरी मिळावी. हा या दोन्ही वाणिज्य परीक्षा घेण्यामागील उद्देश आहे.

**वाणिज्य शाळा प्रमाणपत्र परीक्षेचा विषय:**

वाणिज्य शाळा प्रमाणपत्र परीक्षा व पदविका परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर व एप्रिल/मे मध्ये ठरवून दिलेल्या केंद्रावर घेतल्या जातात.

खालील विषयांचा समावेश वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेसाठी करण्यात आलेला आहे.

१. इंग्रजी टंकलेखन ३०, ४०, ५०, ६० श. प्र. मि.

२. मराठी टंकलेखन ३०, ४०, श. प्र. मि.

३. हिंदी टंकलेखन ३०, ४० श. प्र. मि.

४. इंग्रजी लघुलेखन ६० ते १६० श.प्र. मि.

५. मराठी लघुलेखन ६० ते १२० श. प्र. मि.

६. हिंदी लघुलेखन ६० ते १२० श. प्र. मि.

वाणिज्य शाळा पदविका परीक्षा गेल्या ६० वर्षापासून सुरु आहेत. या परीक्षेसाठी आवश्यक विषय ५ आहेत. वैकल्पिक विषय ८ असून त्यापैकी कोणत्याही एका विषयाची निवड करावी लागते.

१. इंग्रजी
२. व्यापारी अंकगणित
३. पुस्तकपालनाची मूलतत्वे
४. व्यापारी भूगोल
५. व्यापारातील कार्यपद्धती आणि यंत्रणा

**वैकल्पित विषय:**

१. लेखाकर्म

२. भारतीय शासन पद्धती
३. भारतीय बँक व्यवसाय
४. विमा
५. चिटणीसाची कार्यपद्धती
६. विक्रयकला
७. लघुलेखन
८. टंकलेखन.

**पात्रताः**

वाणिज्य शाळा प्रमाणपत्र पपरीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्याला कोणत्याही एका मान्यताप्राप्त संस्थेत टंकलेखनाचा अगर लघुलेखनाचा ४ महिने अगर ८० घड्याळी तासाइतका सराव होणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेतून इयत्ता ९वीची परीक्षा उत्तीर्ण होणे जरूरीचे आहे. या परीक्षांना एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेमार्फत बहिस्थ म्हणून परिक्षेला बसता येते. मात्र तो परीक्षार्थी नोकरी असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत शासकीय परीक्षा मंडळाकडे नोंदणी करावी लागते एप्रिल/मे परिक्षेसाठी ३१ डिसेंबरपूर्वी व ऑक्टोबर/नोव्हेंबर परीक्षेसाठी ३० जूनपूर्वी नोंदणी होणे आवश्यक आहे.

वाणिज्य शाळा पदविका परीक्षेसाठी महाराष्ट्रात एकुण ११ केंद्रे आहेत. वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेसाठी १९८४ अखेर ११३ केंद्रे होती. मे १९८५ पासून ७ नवीन केद्रांना मान्यता देण्यात आली आहे.

१९६८ पासून १९८४ अखेर वाणिज्य शाळा प्रमाणपत्र परीक्षेला बसलेल्या परीक्षार्थींची वर्षनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.

**टी. सी. सी.:**

ही परीक्षा १९७३ पासून सुरू करण्यात आली आहे. ही परीक्षा सदर पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर घेण्यात येते. हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे.

**उद्देश:**

अँग्लो इंडियन शाळेत अध्यापकाचे काम करण्यासाठी प्रशिक्षित अध्यापक तयार करणे हा प्रमुख उद्देश आहे.

टी. टी. सी. परीक्षेचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून त्यासाठी चार ठिकाणी अशा तऱ्हेची अध्यापक विद्यालये आहेत.

१. मागरिट ट्रेनिंग कॉलेज, मुंबई
२. नॉटरे डामे ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, बँगलोर
३. सेंट मेरीज ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे
४. एकडील टिचर्स ट्रेनिग कॉलेज, गोवा.

परीक्षा मंडळाच्या वतीने टी. टी. सी. परीक्षा दरवर्षी एप्रिलमध्ये वरील चार केंद्रावर घेण्यात येते.

# केंद्रीय लोकसेवा आयोग

केंद्र लोकसेवा आयोग केंद्र पातळीवर २८ केंद्र शासनाच्या खात्यात भरती करण्यासाठी सिव्हिल सर्व्हिस एक्झामिनेशन आयोजित करते.

प्रवेशपात्रता: मान्यताप्राप्त विघापीठातील पदवीधरास प्रवेश.

वय: २१ ते २६ वर्षे ( मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिल )

परीक्षायोजना: जाहीराती विविध खात्यात भरती ( योग्य उमेदवारांची ) करण्यासाठी युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन भारतातील नेमून दिलेल्या शहरात प्रिलिमिनरी परीक्षा आयोजित करते.

१ ) प्रिलिमिनरी एक्झामिनेशन सेंटर्स:

युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन द्वारा नमूद केलेल्या सेवाभावी आणि पदांसाठी प्राथमिक स्वरूपाची परीक्षा अगरताळा, अहमदाबाद, ऐझवाल (AIZAWAL), अलाहाबाद, औरंगाबाद, बंगलोर, भोपाळ, मुंबई, कलकत्ता, चंदिगढ, कोचीन, कटक, दिल्ली, धारवार, दिजपूर ( गुवाहाठी ), गँगटॉक, हैद्राबाद, इम्फाळ, इटानगर, जयपूर, जम्मू, जोरहट, कोहिमा, मद्रास, मदुराई, नागपूर, पणजी ( गोवा ), पाटना, पोर्ट ब्लेअर, रायपूर, रांची, सम्बळपूर, शिलाँग, सिमला, श्रीनगर, तिरूपती, त्रिवेंद्रम, उदयपूर आणि विशाखापटणम्.

महाराष्ट्रात औरंगाबाद, मुंबई व नागपूर ही यू. पी. एस्. सी. ची. परीक्षा केंद्रे आहेत. रोजगार समाचार/एम्प्लॉयमेंट न्यूज या साप्ताहिकात तसेच भारतातील सर्वच प्रादेशिक वर्तमानपत्रात ह्या पूर्वपरीक्षेतील जाहिरात डिसेंबरच्या १ ल्या २ ऱ्या आठवड्यात दिली जाते. युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे अर्ज उपलब्ध होत नसल्यामूळे अशा वर्तमानपत्रांचे वाचन नीट करावे.

सिव्हिल सर्व्हिसेस एक्झामिनेशनचे भाग खालीलप्रमाणे आहेत-

१) सिव्हिल सर्व्हिसेस प्रिलिमिनरी एक्झामिनेशन वस्तुनिष्ठ स्वरूपाची ( ऑब्जेक्टिव्ह टाईप ) असते. मुख्य परीक्षेसाठी निवड होण्यासाठी या परीक्षेतील गुण पाहतात

२ ) सिव्हिल सर्व्हिसेस मेन एक्झामिनेशन ( लेखी परीक्षा व मुलाखत ) विविध नोकऱ्या व पदांसाठी नेमणूक होण्यासाठी घेतली जाते.

मुख्य परीक्षेला ( मेन ऐक्झामिनेशन ) फक्त प्रिलिमिनरी परीक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांनाच प्रवेश मिळतो. कमिशनने प्रिलिमिनरी परीक्षेचा निकाल जाहीर केल्यानंतर उमेदवारांनी त्यांना देण्यात येत असलेल्या अर्जाच्या फॉर्मवर तपशीलवार माहिती भरून कमिशनकडे पाठवावी. ( दरवर्षी प्रिलिमिनरी परीक्षा जूनमध्ये आणि मुख्य परीक्षा साधारणपणे नोव्हेंबर/डिसेंबर महिन्यात होतात. )

( अ ) प्रिलिमिनरी एक्झामिनेशन ( पूर्व चाचणी परीक्षा ):

एकूण ४५० मार्कांची असून ह्या परीक्षेमध्ये दोन पेपर्सचा समावेश असतो. १५० मार्कांचा जनरल स्टडीज् व खालील विषयांपैकी एक ( ऑप्शनल ) ३०० मार्कांचा पेपर असे दोन पेपर द्यावे लागतात. पर्यायी विषयांची यादी खाली दिली आहे-

१ ) ॲग्रीकल्चर

२ ) ॲनिमल हजबंड्री ॲट व्हेटेरिनरी सायन्स

३ ) बॉटनी

४ ) केमेस्ट्री

५ ) सिव्हिल इंजिनियरिंग
६ ) कॉमर्स
७ ) इकॉनॉमिक्स
८ ) इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग
९ ) जिऑग्राफी
१० ) जिऑलॉजी
११ ) इंडियन हिस्ट्री
१२ ) लॉ
१३ ) मॅथेमॅटिक्स
१४ ) मॅकेनिकल इंजिनिअरिंग
१५ ) फिलॉसॉफी
१६ ) फिजीक्स
१७ ) पॉलिटिकल सायन्स
१८ ) सायकॉलॉजी
१९ ) पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन
२० ) सोशिऑलॉजी
२१ ) स्टॅटीस्टिक्स
२२ ) झुऑलॉजी

टीप: १ ) दोन्ही पेपर्स ऑबजेक्टिव्ह टाईप ( बहुपर्यायी स्वरूपाचे प्रश्न ) असतात.

२ ) हिंदी व इंग्रजीतून प्रश्नपत्रिका काढतात.

३ ) पर्यायी विषयांसाठी पदवीपातळीचा अभ्यासक्रम असतो.

४ ) प्रत्येक पेपर २ तासांचा असतो.

**( ब )** **<u>मुख्य परीक्षा ( मेन एक्झामिनेशन )</u>:**

लेखी परीक्षेत खालील पेपर्सचा सामावेश असतो-

पेपर १: ३०० मार्कांची- एक भारतीय भाषा, जी भारताच्या घटनेत ८ व्या परिशिष्टात समाविष्ट आहे.

पेपर २: ३०० मार्क- इंग्रजी

पेपर ३ व ४: प्रत्येकी ३०० मार्क जनरल स्टडीज्

पेपर, ५, ६, ७ व ८: प्रत्येकी ३०० मार्क- पर्यायी विषयांच्या यादीतून निवडता येतात. ( कोणतेही २ विषय निवडावेत)

**इटंरव्ह्यू टेस्ट २५० मार्कांची असते.**

ही मौखिक व व्यक्तीमत्व परीक्षा केंद्र लोकसेवा आयागासमोर द्यावी लागते. उमेदवाराचे करिअर-रेकॉर्ड, अभिरूची, बौद्धिक पात्रता, निर्णय घेण्याची क्षमता, नेतृत्वशक्ती व नैतिकता पाहतात.

**मुख्य परीक्षेतील पर्यायी विषयांची यादी**

१) ॲग्रीकल्चर
२) ॲनिमल हजबंड्री अँड व्हेटेरिनरी सायन्स
३) ॲंथ्रॉपॉलॉजी
४) बॉटनी
५) केमिस्ट्री
६) सिव्हिल इंजिनीअरिंग
७) कॉमर्स अँन्ड अकाउंटन्सी
८) इकॉनॉमिक्स
९) इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग
१०) जिऑग्राफी
११) जिऑलॉजी
१२) हिस्ट्री
१३) लॉ
१४) खालीलपैकी कोणत्याही एका भाषेचे लिटरेचर-

ॲसामीज, बेंगाली, चायनीज, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, मराठी, मल्यालम, ओरिया, पाली, पंजाबी, संस्कृत, सिंधी, तामिळ, तेलुगु, उर्दू, अरेबिक, पर्शियन, जर्मन, फ्रेंच, रशियन आणि इंग्लिश.

१५) मॅनेजमेंट
१६) मॅथेमॅटिक्स
१७) मॅकेनीकल इंजिनीअरिंग
१८) फिलॉसॉफी
१९) फिजिक्स
२०) पॉलिटिकल सायन्स अँन्ड इंटरनल रिलेशन्स
२१) सॉयकॉलॉजी
२२) पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन
२२) सोशिऑलॉजी
२४) स्टॅटीस्टिक्स
२५) झुऑलॉजी

संपर्कः दि सेक्रटरी, युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन, ढोलपूर हाऊस, नवी दिल्ली-११००११.

**विशेष सूचनाः** विशेषत: एम्प्लॉयमेंट न्यूजमध्ये जाहिरात पाहावी व वरील पत्त्यावर संपर्क साधावा. ' ॲप्लीकेशन फॉर्म ' चा नमुना व अटेंडन्स शीट व्यवस्थित फुलस्केप पांढऱ्या पेपरवर टाईप करून पाठवावेत.

# महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशन

## ( महाराष्ट्र लोकसेवा आयोग )

नोकर भरतीसाठी अनेक मंडळे स्थापन झालेली आहेत. या मंडळांद्वारे स्पर्धा-परिक्षा घेतल्या जातात. महाराष्ट्र लोकसेवा आयोग त्यापैकीच एक आहे. साधारणपणे या सर्व मंडळांच्या स्पर्धा-परीक्षांच्या सूचना महत्त्वाच्या तसेच स्थानिक वर्तमानपत्रातून दिल्या जातात. एखाद्या पदासाठी योग्य उमेदवार निवडण्यासाठी मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचण्यांचे आयोजन एम. पी. एस. सी. मार्फत केले जाते. त्या त्या पदांसाठी काम करण्यासंबंधीची पात्रता अजमावणे हा हेतू अंतर्भूत असतो. तसेच बौद्धिक क्षमता, विषय आत्मसात करण्याची टीकात्मक शक्ती, नैतिक व सामाजिक प्रतिभा, वैयक्तीक आवडीच्या विषयाच्या विविधांगांचे सखोल ज्ञान, नेतृत्वक्षगता वगैरेंचा अंतर्भाव असतो. उमेदवारास भारतात व भारताबाहेरील जगात घडणाऱ्या घडामोडींचे ज्ञान आहे किंवा नाही हे पाहतानाच त्याचा बौद्धिक भाग पाहिला जातो. सर्वसाधारणपणे जे उमेदवार जाहिरातीत नमूद केलेली अर्हता प्राप्त करतात अशा उमेदवारांना मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणीस बोलावले जाते. परंतु जेव्हा विशिष्ट प्रकारच्या पदाच्या नेमणुकीसाठी अर्ज जास्त प्रमाणात येतात तेव्हा विशेष पात्रता आणि/अथवा अनुभव याचा निकष लावून उमेदवारांना मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणीस आयोगाकडून बोलावले जाते. उमेदवारांचे अर्ज तुलनात्मकदृष्टचा फारच मोठ्या प्रमाणात आल्यास आयोग चाचणी परीक्षा घेते व चाचणी परीक्षेत आयोगाने ठरविलेले अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवारांनाच मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणीस बोलावले जाते.

### स्पर्धा परीक्षांद्वारे भरती

१. अ. खाली दिलेल्या राजपत्रित पदांवर भरतीकरिता संयुक्त स्पर्धा परीक्षा-

१ ) महाराष्ट्र नागरीसेवा, वर्ग-१ मध्ये परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी
( वेतन रु. ६८०- १,५०० )

२ ) महाराष्ट्र सरकारी सेवा, वर्ग-१ मध्ये परिवीक्षाधीन उपनिबंधक सहकारी संस्था
( वेतन रु. ६८०-१,५०० )

३ ) महाराष्ट्र नागरी सेवा, वर्ग-१ मध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी
( वेतन रु.६८०-१,५०० )

४ ) महाराष्ट्र नागरीसेवा वर्ग-१ मध्ये मुख्य अधिकारी, नगरपालीका परिषद
( वेतन रु.६८०-१५०० )

५ ) महाराष्ट्र राज्य पोलीस सेवा, वर्ग-१ मधील संयुक्त श्रेणीतील परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त
( वेतन रु.६८०-१,२५० )

६ ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-१ ( कनिष्ठ )
( वेतन रु.६८०-१,२५० )

७ ) विक्रीकर अधिकारी, वर्ग-१
( वेतन रु.६८०-१,२५० )

८ ) महाराष्ट्र नागरी सेवा, वर्ग- २ मधील परिवीक्षाधीन तहसीलदार
( वेतन रु.६००-१,१५० )

९ ) परिवीक्षाधीन गटविकास अधिकारी ( निम्न

श्रेणी)/महसूल अधिकारी, जिल्हा परिषद, वर्ग-२
(वेतन रु. ६००-१,१५०)

१०) महाराष्ट्र नागरी सेवा, (कार्यकारी शाखा) वर्ग-२ मधील परिवीक्षाधीन जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख
(वेतन रु. ६००-१,१५०)

११) परिवीक्षाधीन अधिक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क, वर्ग-२
(वेतन रु.६००-१,१५०)

१२) महाराष्ट्र सहकारी सेवा, वर्ग-२ मधील परिवीक्षाधीन सहायक निबंधक, सहकारी संस्था
(वेतन रु.६००-१,१५०)

१३) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, वर्ग-२
(वेतन रु.६००-१,१५०)

१४) प्रादेशिक परिवहन अधिकारी
(वेतन रु.६००-१,१५०)

१५) महाराष्ट्र नागरी सेवा, वर्ग-२, मुख्य अधिकारी, नगरपालीका परिषद
(वेतन रु.६००-१,१५०)

**अर्हता:** १) प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद वगळून इतर सर्व पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी अथवा तत्सम. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी, वर्ग-१. तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख या पदांसाठी मराठीचे पुरेसे ज्ञान आवश्यक, २) परिवीक्षाधीन पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई आणि अधिक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क या पदासाठी १६५ सेंटीममीटर उंची (अनवाणी) आणि छाती ८४ सेंटीमीटर (फुगवून किमान ८९ सेंटीमीटर), ३) प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदांसाठी- (अ) भौतिक शास्त्र आणि गणित या विषयांसह शास्त्र शाखेतील पदवी किंवा अभियांत्रिकी पदवी, (ब) उत्तम शरीरप्रकृती, उंची १६३ सेंटीमीटर आणि छाती (न फुगविता) किमान ७९ सेंटीमीटर.

**वयोमर्यादा** : १९-२८ वर्षे (मागासवर्गीयांकरिता ३३ वर्षे)

**फी-** पूर्वपरीक्षा-रु २२ (रु. १० मागासवर्गीयांकरिता) मुख्य परीक्षा- रु.३४ (रु. १४ मागासवर्गीयांकरिता) फीच्या रकमेत अर्जाच्या किंमतीचा समावेश आहे.

**परीक्षा योजना-** ही परीक्षा दोन भागात घेतली जाते. (१) पूर्वपरीक्षा. यासाठी खालीलप्रमाणे दोन वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नपत्रिका असून, त्या पदवी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या पातळीच्या असतात.

**प्रश्नपत्रिका-१** :- सामान्य अध्ययन. प्रश्नपत्रिका २. खाली दिलेल्यांपैकी कोणताही एक विषय :

(१) कृषि (२) वनस्पतिशास्त्र (३) वाणिज्य (४) रसायनशास्त्र (५) अर्थशास्त्र (६) भूगोल (७) भारताचा इतिहास, (८) गणित (९) भौतिकशास्त्र (१०) राज्यशास्त्र (११) समाजशास्त्र (१२) प्राणीशास्त्र.

पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच मुख्य परीक्षेकरिता अर्ज करावयाची परवानगी दिली जाते.

<u>मुख्य परीक्षा-</u>

(अ) लेखी परीक्षा- आवश्यक विषय-

(१) इंग्रजी (२) सामान्य अध्ययन पेपर-१. (३) सामान्य अध्ययन पेपर-२ (४) मराठी.

सामान्य अध्ययन विषयाच्या प्रश्नपत्रिका भारतीय विद्यापीठाच्या पदवी पातळीवरच्या प्रश्नपत्रिकेच्या पातळीच्या असतात. इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा असतो आणि मराठीच्या

प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेचा असतो.

**ऐच्छिक विषय:** खालीलपैकी कोणतेही २ विषय (१) लेखाशास्त्र व लेखा परीक्षा, (२) कृषि, (३) पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र, (४) उपयोजित यंत्रशास्त्र, (५) बँकिंग (६) वनस्पतीशास्त्र, (७) रसायनशास्त्र, (८) अर्थशास्त्र, (९) भूगोल, (१०) भूगर्भशास्त्र, (११) इतिहास, (१२) विधी, (१३) इंग्रजी वाङ्मय, (१४) हिंदी वाङ्मय, (१५) मराठी वाङ्मय, (१६) संस्कृत वाङ्मय, (१७) उर्दू वाङ्मय, (१८) व्यवस्थापन व लोक प्रशासन, (१९) गणित, (२०) सूक्ष्म जीवशास्त्र, (२१) तत्त्वज्ञान, (२२) भौतिकशास्त्र, (२३) राजशास्त्र, (२४) मानसशास्त्र, (२५) समाजशास्त्र, (२६) संख्याशास्त्र, (२७) प्राणीशास्त्र.

ऐच्छिक विषयाच्या प्रश्नपत्रिकांचा दर्जा पदवी परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांसारखा राहील. सामान्य अध्ययन आणि ह्यूमॅनिटीजमधील प्रश्न मराठी किंवा इंग्रजीमध्ये सोडविण्याची उमेदवारांना मुभा राहील.

(ब) मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणी-

जे उमेदवार लेखी परीक्षेत आयोगाने ठरविलेल्या अर्हताप्रमाणाइतके गुण प्राप्त करतील त्यांनाच मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणीकरिता बोलविले जाते.

२. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, वर्ग-१ व वर्ग-२, तसेच महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी सेवा, वर्ग, वर्ग-१ व वर्ग-२ मधील पदांकरिता संयुक्त स्पर्धा परीक्षा.

(वेतनश्रेणी वर्ग-१ रु.६८०-१,२५०, वर्ग-२- रु.६००-१,१५०)

पात्रताविषयक अटी-

अर्हता- मान्यताप्राप्त विद्यापिठाची अभियांत्रिकी (स्थापत्य) पदवी किंवा तत्सम.

वयोमर्यादा- १९-२८ वर्षे (मागासवर्गीयांकरिता ३३ वर्षे.)

**फी-** रु. ५६ (रु.२४ मागासवर्गीयाकरिता) किंवा यात अर्जाची किंमत व टपालखर्च यांचा सामावेश नाही. परीक्षा योजना- (अ) लेखी परीक्षा- खालील विषयांची परीक्षा घेतली जाते. (ह्या योजनेत बदल होण्याची शक्यता) (१) इंग्रजी, (२) सामान्य विज्ञान, (३) सर्वसामान्य अभियांत्रिकी, (४) सिद्धांत व संकल्पचित्र संरचना, (५) भूगर्भतंत्र व द्रवगतिशास्त्र. सामान्य विज्ञान विषयाची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) पद्धतीची असते.

ऐच्छिक विषय- (कोणतेही दोन) (१) बांधकाम व व्यवस्थापन, (२) पाणी साधनसंपत्ती, अभियांत्रिकी, (४) सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी.

(ब) मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणी-

लेखी परीक्षेत आयोगाने ठरवून दिलेले अर्हता प्रमाण जे उमेदवार प्राप्त करतील त्यांनाच मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चांचणीकरिता बोलविले जाते.

३. महाराष्ट्र कृषि सेवा, वर्ग-१ व वर्ग-२ मधील पदांवर भरतीकरिता स्पर्धा परीक्षा.

(वेतनश्रेणी वर्ग-१ रु.६८०-१,५००, वर्ग-२: रु. ६००-१,५००)

पात्रताविषयक अटी-

**अर्हता-** कृषिशास्त्र किंवा कृषि अभियांत्रिकीमधील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.

**वयोमर्यादा-** १९-२८ वर्षे (मागासवर्गी-

यांकरीता ३३ वर्षे).

**फी:** रु. ५६ (रु. २४ मागासवर्गीय उमेदवारांसाठी) यात अर्जाची किंमत आणि टपाल खर्च यांचा समावेश नाही.

परीक्षा योजना:

(अ) लेखी परीक्षा- खालील विषयांची परीक्षा घेतली जाते.

पेपर-१... इंग्लिश व मराठी
पेपर-२ ...सामान्य अध्ययन
पेपर-३ ...कृषि विज्ञान-१
पेपर-४... कृषि विज्ञान-२
पेपर-५... कृषि विज्ञान-३

सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) पद्धतीच्या असतील.

मराठीव्यतिरिक्त इतर विषयातील प्रश्नपत्रिका पदवी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या दर्जाच्या असतात. मराठीतील प्रश्नपत्रिकेचा दर्जा एस. एस. सी.च्या मराठी (द्वितीय भाषा) च्या प्रश्नपत्रिकेसारखा असतो.

(ब) मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणी: लेखी परीक्षेत आयोगाने ठरवून दिलेले आयोगाप्रमाणे जे उमेदवार प्राप्त करतील त्यांनाच मौखिक परीक्षा व व्यक्तीमत्व चाचणीकरिता बोलाविले जाते.

**४. मंत्रालयीन विभाग व लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील सहाय्यकाच्या पदावरील भरतीकरिता तसेच विक्रीकर सेवा, वर्ग-३ मधील विक्रीकर निरीक्षक या पदांवर भरतीकरता संयुक्त स्पर्धा परीक्षा.**

(वेतनश्रेणी रू. ३६५-७६०)

**पात्रताविषयक अटी:**

अर्हता: मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा तत्सम.

वयोमर्यादा:१९-२८ वर्षे (मागासवर्गीयांकरिता ३३ वर्षे)

फी: रू. २० (रू.१२ मागासवर्गीय उमेदवारांकरिता) यात अर्जाच्या नमुन्याची किंमत व टपाल-खर्च यांचा समावेश नाही.

परीक्षा योजना:

(अ) खाली दिलेल्या विषयावर लेखी परीक्षा घेतली जाते.

पेपर-१:इंग्लीश व मराठी दोन्ही प्रश्नपत्रिका
पेपर-२:सामान्य अध्ययन व वस्तुनिष्ठ
बुद्धीमापन चाचणी (बहुपर्यायी)
स्वरूपाच्या असतात.

इंग्लिश, सामान्य अध्ययन व बुद्धीमापन चाचणी या पेपरांकरीता भारतीय विद्यापीठाच्या पदवी परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचा दर्जा राहील. मराठी करिता एस.एस.सी. (द्वितीय भाषा) मराठीच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा असेल.

५. वनसेवेतील पदांसाठी परीक्षा (निवड, चाचणी किंवा अन्य निकषावर फॉरेस्ट कॉलेजमध्ये प्रशिक्षणासाठी)

अ) परिविक्षाधीन सहाय्यक वनसंरक्षक

पात्रताविषयक अटी:

अर्हता: प्राकृतिक शास्त्राचे, गणित, संख्याशास्त्र, स्थापत्य अभियांत्रिकी, शेतकी व अर्थशास्त्र यापैकी एका विषयातील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम.

शुद्ध गणित, संख्याशास्त्र व अर्थशास्त्र या विषयातील पदवी धारण करणारांनी एस. एस. सी. परीक्षेला पदार्थ विज्ञानशास्त्र किंवा जीवशास्त्र हा विषय घेतला असला पाहिजे.

शरीरबांधणी: उंची- १६३ सेंटीमीटर, छाती- फुगवून ८४ सेंटीमीटर (न फुगवता ७९ सेंटीमीटर). छाती फुगविण्याची क्षमता कमीतकमी ५ सें.मी. असावी.

वयोमर्यादा: १८-२८ वर्षे (३३ वर्षे

मागासवर्गीयांकरिता )

फी: रु. ५६ ( रु. २४ मागासवर्गीयांकरिता ) यात अर्जाची किंमत व टपालखर्च यांचा समावेश नाही.

**परीक्षा योजना:**

**परीक्षेचे विषय:** ( १ ) लेखी परीक्षा: आवश्यक विषय: १ ) इंग्रजी निबंध, २ ) सामान्य ज्ञान, ३ ) गणित ( शालान्त परीक्षेचा दर्जा )

**वैकल्पिक विषय:** ( कोणतेही दोन ) वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, भूस्तरशास्त्र, यंत्र अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, रसायन अभियांत्रिकी, कृषिशास्त्र, संख्याशास्त्र, अर्थशास्त्र, कृषि अभियांत्रिकी.

इंग्रजी प्रश्नपत्रिकेव्यतिरिक्त इतर सर्व प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ ( बहुपर्यायी ) पद्धतीच्या असतात.

( २ ) **मौखिक परीक्षा आणि व्यक्तिमत्त्व चाचणी:** आवश्यक गणित हा विषय वगळता इतर सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिकांचा दर्जा भारतीय विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाचा असतो. लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच मौखिक परीक्षेसाठी बोलाविण्यात येते. निवड झालेल्या उमेदवारांना ४ तासांत २५ किलोमीटर्स चालण्याच्या परीक्षेसह शारीरिक क्षमतेची चाचणी द्यावी लागते.

परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार द्वितीय श्रेणीतील स्नातक अथवा प्रवीण पदवी धारण करणाऱ्या आणि शारीरिक क्षमता व वयोमर्यादेच्या अटीप्रमाणे पात्र असणाऱ्या उमेदवारांची फक्त मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणी घेऊनही निवड करण्यात येते. ( जेथे श्रेणी दिल्या नसतील तेथे एकूण गुणांच्या निदान ४५ टक्के इतके गुण असले पाहिजेत. )

**वन क्षेत्रपाल पदावरील भरतीसाठी स्पर्धा परीक्षा**

( वेतन श्रेणी रु. ५००-९०० )

**पात्रताविषयक अटी:**

अर्हता: एक वर्षाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाकरिता मान्यताप्राप्त विद्यापीठांची बी. एस. सी. किंवा बी. एस. सी. कृषी ) किंवा तत्सम पदवी.

**दोन वर्षाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाकरीता:**

१ ) विज्ञान शाखेतील इंटर किंवा बारावी इयत्ता उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा.

२ ) उच्च माध्यमिक किंवा प्रथम वर्ष पदवी परीक्षा उत्तीर्ण व तदनंतर पूर्व व्यावसायिक/ पूर्व तांत्रिक अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा

३ ) स्थापत्य, यांत्रिकी वा रासायनिक अभियांत्रिकीमधील पदविका उत्तीर्ण ( एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षेनंतरचा दोन वर्षाचा अभ्यासक्रम )

वरील १ आणि २ मधील अर्हता खालीलपैकी दोन किंवा अधिक विषयातील असणे आवश्यक आहे. गणित, वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र भूगर्भशास्त्र

वयोमर्यादा: १८ ते २८ वर्षे ( मागासवर्गीयांकरीता ३३ वर्षे )

उंची: किमान १६३ सें.मी., ( अनवाणी ) ( अनुसूचित जमातीकरिता १५२.५ सें.मी. )

छाती: न फुगविता किमान ७९ सें.मी., फुगविण्याची किमान क्षमता ५ सें.मी.

दृष्टी: दुरुस्तीनंतर दृष्टीतीक्ष्णता ६/६ + ४ ओडी ( वाङ्म नेत्राची संक्रामक अवस्था किंवा तिरळेपणा नसावा. )

अ ) **लेखी परीक्षा:**

**आवश्यक विषय:** ( १ ) इंग्रजी, ( २ ) सामान्य ज्ञान ( यात भौतिक, रसायन, सामान्य विज्ञान, इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल व चालू

घडामोडी, ) (३) गणित (अंकगणित, अंकपद्धती, नैसर्गिक अंक, पूर्णांक, बुद्धीसंमत आणि वास्तव अंक, अंशराशीकरण, सहयोगी व वितरक कायदे.

ऐच्छिक विषय: खालीलपैकी एक

१) वनस्पतीशास्त्र, २) प्राणीशास्त्र, ३) गणित ४) रसायनशास्त्र, ५) भौतिकशास्त्र, ६) भूगर्भशास्त्र.

सर्व प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) स्वरूपाच्या असतात.

सामान्यज्ञान, इंग्रजी व गणित या विषयातील प्रश्नपत्रिकांचा दर्जा एस्. एस्. सी.च्या प्रश्नपत्रिकांच्या पातळीचा असतो. वैकल्पिक विषयांच्या प्रश्नपीत्रका माध्यमिक किंवा तत्सम परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या दर्जाच्या असतात.

(ब) मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणी: जे उमेदवार लेखी परीक्षेत आयोगाने ठरवून दिलेले अर्हता प्रमाण प्राप्त करतील त्यांनाच मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणीकरिता बोलविले जाते. निवड झालेल्या उमेदवारांना चार तासात २६/२५ किलोमीटर चालण्याची शारीरिक क्षमतेची चाचणी द्यावी लागते.

६. पोलीस उपनिरीक्षक (नि:शस्त्र) या पदावर

भरतीसाठी स्पर्धा परीक्षा

(वेतनश्रेणी रु.३६५-७६०)

पात्रविषयक अटी:

अर्हता: मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा तत्सम

शरीर बांधणी: उंची १६५ सें.मी. (अनवाणी)

छाती: फुगवून ८४ सें.मी., किमान ५ सें.मी. फुगवणे आवश्यक

वयोमर्यादा: १९ ते २८ वर्षे (मागासवर्गीयांसाठी ३३ वर्षे)

संबंधीत विभागात नोकरीस असणाऱ्यांकरिता वयाची सूट २ वर्षे.

फी: रु. १२ (रु. ७ मागासवर्गीयांसाठी) यात अर्जाची किंमत व टपालखर्च याचा समावेश नाही.

परीक्षा योजना:

(अ) खाली दिलेल्या विषयांवर लेखी परीक्षा घेतली जाते.

पेपर- १: इंग्लिश आणि मराठी: सोपी शब्दरचना व वाक्य रचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा उपयोग व अर्थ व उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

पेपर- २: सामान्य अध्ययन आणि बुद्धिमत्ता चाचणी: दोन्ही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) पद्धतीच्या असतात. सामान्य अध्ययन, बुद्धिमत्ता चाचणी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिका भारतीय विद्यापीठाच्या पदवी पातळीच्या प्रश्नपत्रिकांच्या पातळीच्या असतात. मराठीच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा एस्. एस्. सी. ला मराठी विषय घेऊन बसलेल्या उमेदवारांकडून अपेक्षित असतो.

(ब) शारीरिक बांधणी: लेखी परीक्षेत अर्हता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना/ उमेदवारांना शारीरिक चाचणी पूर्ण करावी लागते.

तीत खालील गोष्टींचा समावेश असतो-

१) गोळा फेक (वजन ७.२५० किलोग्रॅम)

२) पुल अप्स (आठ)

३) लांब उडी (आठ फुटापेक्षा जास्त)

व

४) धावणे ६०० मीटर.

(क) मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व

चाचणी: लेखी परीक्षेत आयोगाने ठरवुन दिलेले अर्हताप्रमाण प्राप्त करणाऱ्या व शारीरिक चाचणीत बोलवले जाते. उमेदवारांची अंतिम निवड लेखी परीक्षेतील गुण व मौखिक गुणांच्या बेरजेवर आधारित असते.

७. मोटार वाहन विभागातील सहायक निरीक्षक, मोटार वाहने या पदावर भरतीसाठी स्पर्धा परीक्षा

पात्रताविषयक अटी खालीलप्रमाणे आहेत-

अर्हता: १) ॲटोमोबाईल इंजिनिअरिंग किंवा मॅकेनिकल इंजिनिअरिंगमधील शासनमान्य डिप्लोमा, किंवा २) सायन्सच्या पदवी अभ्यासक्रमातील दुसरी (इंटर) परीक्षा उत्तीर्ण असावा, ३) सुधारित अभ्यासक्रमातील (१०+२+३), सायन्स विभागातील नवीन उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (बारावी अखेरीस घेतली जाणारी) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, किंवा एस्. एस्. सी. परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून मिळविलेले मोटर वाहन तंत्रज्ञानाचे प्रमाणपत्र किंवा (ब) ॲप्रेन्टिसशिप ॲक्ट, १९६१ अन्वये देण्यात येणारे मोटर वाहन तांत्रिक मधील नॅशनल ॲप्रेन्टिसशिप प्रमाणपत्र (अभ्यासक्रमात बदल होण्याची शक्यता आहे.)

शरीर बांधणी: १) उंची १६३ सें.मी., २) छाती फुगवून ८४ सें.मी. (न फुगविता ७९ से.मी.), ३) सुदृढ दृष्टी चष्म्याशिवाय आणि रातआंधळेपणा नसावा

वयोमर्यादा: १८- २८ वर्षे (मागासवर्गी-यांकरिता ३३ वर्षे), मोटार वाहने विभागातून आधीपासून नोकरीत असणाऱ्यांकरिता वयोमर्यादेत सूट ५ वर्षे.

फी- रु. २० ( रु. १२ मागासवर्गीयांक-रिता व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील उमेदवारांकरिता). यात अर्जाची किंमत व टपालखर्च यांचा समावेश नाही.

परीक्षा योजना- (अ) खालील विषयांची परीक्षा घेतली जाते. (१) बुद्धिमापन, (२) सामान्यविज्ञान व गणित. दोन्ही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) स्वरूपाच्या असतात.

बुद्धिमापन चाचणीद्वारा उमेदवार किती जलद व अचूक विचार करू शकतो याची परीक्षा घेतली जाते. सामान्यविज्ञानाच्या पेपरमध्ये भौतिक, रसायन व गणित यासंबंधीचे प्रश्न घातलेले असतात. दोनही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) पद्धतीच्या असतात. दोन्ही प्रश्नपत्रिकांचा दर्जा १०वी शालांत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या दर्जासारखा असतो.

(ब) मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणी- लेखी परीक्षेत आयोगाने ठरवून दिलेले अर्हता प्रमाण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांनाच मौखिक परीक्षा व व्यक्तिमत्त्व चाचणीकरिता बोलविले जाते.

उमेदवारांची अंतिम निवड लेखी परीक्षेतील गुण व मौखिक परीक्षतील गुणांच्या बेरजेवर आधारित असते.

८. मुंबईतील शासनाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक- टंकलेखक (इंग्रजी), टंकलेखक मराठी या पदाकरिता संयुक्त स्पर्धा परीक्षा

पात्रताविषयक अटी- खालीलप्रमाणे आहेत.

अर्हता- एस्. एस्. सी. किंवा तत्सम.
वयोमर्यादा- १८- २८ वर्षे (३३ वर्षे मागासवर्गीयांकरिता)

फी- रु १२ (रु. ५ मागासवर्गीय व

आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील उमेदवारांकरिता) यात अर्जाची किंमत व टपालखर्च याचा समावेश नाही.

(अ) परीक्षा योजना- सर्व उमेदवारांकरिता खालील विषयातील'आवश्यक पेपर्स.

(१) इंग्लिश, (२) मराठी, (३) सामान्य अध्ययन

(ब) लिपिकाच्या पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अंकगणित याविषयावरील ज्यादा पेपर द्यावा लागतो.

(क) लिपिक- टंकलेखक या पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना खालील दोन विषयातील ज्यादा पेपर द्यावे लागतात.

(४) अंकगणित व (५) टंकलेखन (मराठी)

(ड) टंकलेखक (इंग्रजी) या पदाकरिता खालील परीक्षा जादा द्यावी लागते.

(६) टंकलेखन (इंग्रजी)

(इ) टंकलेखन (मराठी) या पदाकरिता खालील परीक्षा जादा द्यावी लागते.

(७) टंकलेखन (मराठी)

सामान्य अध्ययन व गणित हे दोन पेपर मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत असतात. सर्व पेपर वस्तूनिष्ठ (बहुपर्यायी) पद्धतीचे असतात. प्रश्न पुढील नमूद केलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत असतात.

(१) (इंग्लिश)- शब्दांचे स्पेलिंग, व्याकरण, सोपी व अचूक वाक्यरचना, सामान्य शब्दसंग्रह.

(२) मराठी- व्याकरण, सोपी पण अचूक वाक्यरचना आणि सामान्य शब्दसंग्रह.

(३) सामान्य अध्ययन- प्रश्नपत्रिका दोन भागात सामान्य विज्ञानावरील प्रश्न असतात चालू घडामोडी, नित्य निरीक्षणातील घटना, या बरोबरच धर्म, साहित्य, राजकारण, शास्त्र, सामाजिक व औद्योगिक सुधारणा, क्रिडा, ऐतिहासिक, सांस्कृतिक यासंबधातील मान्यताप्राप्त व्यक्ती व त्यांची कामगिरी आणि सामान्यपणे भारताचा भूगोल व विशेषकरून महाराष्ट्राचा भूगोल यावर प्रश्न अधारित असतात. बुद्धिमापनावरील प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करू शकतो हे जाणण्याच्या दृष्टिकोनातून काढलेले असतात.

(४) अंकगणित- साध्या आकडेमोडीवर आधारित गणितावरील मूळ क्रिया. उदा. बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार. यावरील प्रश्न तसेच काही प्रश्न अपूर्णांक, सरासरी व टक्केवारी यावर आधारित असतात.

(५) टंकलेखन (इंग्रजी)- उमेदवारांना एक वर्णनात्मक इंग्रजी उतारा दिला जातो. तो त्यांना प्रतिमिनीट ४० शब्द या किमान वेगाने टंकलिखीत करावा लागतो. टंकलेखनात टापटीप व अचूकपणा असला पाहिजे. समास सोडणे, दोन शब्दात अंतर ठेवणे, स्पर्श, समता व नीटनेटकेपणा यासाठी गुण राखून ठेवलेले असतात.

(६) टंकलेखन (मराठी)- एक वर्णनात्मक मराठी उतारा प्रतिमिनीट ३० शब्द या किमान वेगाने टंकलिखीत करावयास दिला जातो. टंकलेखनात टापटीप व अचूकपणा असला पाहिजे. समास सोडणे, दोन शब्दात सारखे अंतर ठेवणे, स्पर्श समता व निटनेटकेपणा यासाठी काही गुण राखून ठेवलेले असतात.

लघुलेखन चाचणीद्वारा लघुलेखकांच्या पदावर भरती,

बृहन्मुंबईतल्या महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयामध्ये मराठी व इंग्रजीतून लघुलेखनाची पुढील पदे भरण्याकरिता लघुलेखन चाचणी घेतली जाते-

पद क्रमांक १: लघुलेखक (उच्चश्रेणी) वेतनश्रेणी- रु. ६००-९५०

पद क्रमांक २: लघुलेखक (निम्नश्रेणी)

वेतनश्रणी- रु. ३९५-८००

पद क्रमांक ३: लघुलेखक वेतनश्रेणी रु. ३३५-६८०

अर्हता- (१) एस्. एस्. सी. उत्तीर्ण किंवा तत्सम.

(२) टंकलेखन वेग ४० शब्द प्रतिमिनीट (इंग्रजीकरिता) ३० शब्द प्रतिमिनीट (मराठीकरिता)

(३) लघुलेखन वेग- पद क्रमांक १ करिता १२० शब्द प्रतिमिनीट.

पदक्रमांक २ करिता १०० शब्द प्रतिमिनीट, पदक्रमांक ३ करिता ८० शब्द प्रतिमिनीट

वयोमर्यादा- १८-३० वर्षे (मागासवर्गीयाकरिता ३५ वर्षे)

फी- रु.१५ (रु.७ मागासवर्गीय उमेदवारांकरिता) यात अर्जाची किंमत व टपाल खर्च यांचा सामावेश नाही.

परीक्षा योजना- (अ) उमेदवारांची त्या त्या पदाकरिता आवश्यक वेग तपासण्याकरिता लघुलेखन व टंकलेखन चाचणी घेतली जाते. उमेदवारांना लघुलिखीत परिच्छेद टंकलिखीत करावा लागतो.

(ब) लघुलेखन चाचणी उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना बोलाविले जाते.

टीप- ''समान गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना गुणक्रमांक आयोगाकडून वेगवेगळी ठरविण्यात येणाऱ्या त्या संबधीच्या तत्त्वाप्रमाणे लावण्यात येतो.''

आजच डोळे बांधून
इतिहासात थांबलेल्यांना
वर्तमान घडविता येत नाही
भविष्याची स्वप्न पाहता येत नाही
अन् त्यांना इतिहासही कळलेला नसतो.

-बाबा आमटे

माणसांना माणसांची दुःखं असावी,
जनावरांची नसावी
भूक हे जनावराच्या पातळीवरचं दुःख आहे

-बाबा आमटे

---

मोती उधळताना सोबतीला आले त्यांना विसरणे शक्य आहे
अश्रू गाळताना साथीला होते त्यांना कसे विसरायचे ?
पाण्याहून रक्ताचे नाते दाट असेल
पण अश्रूंचे नाते त्याहून घनदाट आहे.

-बाबा आमटे

# सेनादलातील नोकऱ्या

## मदन दामले

सेनादलामध्ये भरती होण्याची स्वप्ने अनेक जण बाळगीत असले तरी योग्य मार्गदर्शनाअभावी आणि अयोग्य माहितीमुळे ती पूर्ण करणे शक्य होत नाही.
२६ जानेवारी किंवा १५ ऑगस्ट या दिवशी सेनादलाच्या विविध करामती पाहिल्यावर गणवेषाचे आकर्षण वाटू लागते, ज्या महाराष्ट्राने छत्रपती शिवाजी महाराज, दर्यासरखेल कान्होजी आंग्रे, बाजीराव पेशवे आणि त्यानंतर सेवानिवृत्त नौदल प्रमुख व्हाईस ॲडमिरल भास्कर सोमण, जी. जी. बेवूर, एअर चीफ मार्शल ऋषिकेश मुळगावकर, जनरल अरूणकुमार वैद्य असे सेनानी दिले. त्या महाराष्ट्रीय तरूणांचे सेनादलातील भरतीचे प्रमाण आवश्यकतेपेक्षाही कमी आहे. तिन्ही दलांमध्ये विविध शाखांच्या सर्व प्रकारच्या नोकरीसंबधातील माहिती सादर करीत आहोत.

सेनादलाच्या भूदल, नौदल, हवाईदल आणि तटरक्षक दल, या चार प्रमुख शाखा आहेत. या चारही शाखांमध्ये अधिकारी आणि कर्मचारी म्हणून नोकरीमध्ये जाण्याची संधी सर्व भारतीय तरूणांना उपलब्ध असतात.

मात्र या नोकऱ्यांसाठी नुसतीच शैक्षणिक पात्रता असून चालत नाही तर शारीरिक पात्रता आणि वैद्यकीयदृष्ट्याही आवश्यक ते गुण असणे आवश्यक असते.

भूदल, नौदल, हवाईदलामध्येही विविध विभाग आहेत. त्यामुळे सर्वसाधारणपणे शैक्षणिक आणि शारीरिक पात्रता एकच असली तरी ती विशेष विभागांच्या आवश्यकतेनुसार बदलण्यात येते.

### भूदल

भूदलामध्ये अधिकारी होण्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी), भारतीय सेनादल प्रबोधिनी (इंडियन मिलिटरी ॲकॅडमी) अधिकारी प्रशिक्षण प्रबोधिनी (ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी) आणि अल्पकालीन सेवा अधिकारी (शॉर्ट सर्व्हिस कमिशन) या चार मार्गांमधून कोणत्याही एका मार्गाने जाता यते.

या सर्वांची जाहिरात देशातील महत्त्वाच्या वृत्तपत्रामधून प्रसिद्ध करण्यात येते. आणि त्यामध्ये भरतीची पद्धत, परीक्षेसंबधी माहिती, अर्ज कुठे आणि कसा करायचा यासंबधी विस्तृत माहिती दिलेली असते.

या सर्वांची माहिती पुढील तक्त्यामध्ये दिली आहे.

| भरतीचा प्रकार | वय | शैक्षणिक पात्रता | निवडीची पद्धत | अर्ज कोठे करायचा? |
|---|---|---|---|---|
| १. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, खडकवासला | १६॥ ते १९ | १२ वी (१०+२) किंवा तत्सम परीक्षा | संघ लोकसेवा आयोग परीक्षा घेते आणि त्यानंतर सेनादल निवड मंडळ मुलाखत घेते. | दरवर्षी मे-जून किंवा नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात जाहिरात येते. |
| २. इंडियन मिलिटरी ॲकेडमी, डेहराडून अ) नागरिकांसाठी खुला प्रवेश (काही जागा एन. सी. सी. मधील सी प्रमाणपत्र असलेल्या छात्रांसाठी राखीव) | १९ ते २४ | कोणत्याही शाखेची पदवी | संघ लोकसेवा आयोग परीक्षा घेते ती कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झॅम (सीडीएसई) असते आणि त्यानंतर सेनादल निवड मंडळ मुलाखत घेते. | दरवर्षी एप्रिल- मे किंवा ऑक्टोबर- नोव्हेंबर या महिन्यात जाहिरात येते. |
| ब) अभियांत्रिकी पदवीधर | २० ते २७ | अभियांत्रिकी पदवी | फक्त सेनादल निवड मंडळ मुलाखत घेते. | दरवर्षी जाहिरात. वर उल्लेख केल्याप्रमाणे. |
| क) पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले आर्मी एज्युकेशन कोअर आणि आर्मी ऑर्डिनन्स कोअर. | २३ ते २७ | पदव्युत्तर शिक्षण, विशेष विभागाच्या आवश्यकतेनुसार | वरीलप्रमाणेच | दरवर्षी जाहिरात वर उल्लेख केल्याप्रमाणे |
| ३. ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकेडमी, मद्रास | | | | |
| अ) अल्पकालीन सेवा अधिकारी (अतांत्रिक) | १९ ते २५ | कोणत्याही शाखेची पदवी | सी.डी.एस.ई. आणि त्यानंतर सेनादल निवड मंडळ मुलाखत. | दरवर्षी जाहिरात वर उल्लेख केल्याप्रमाणेच |
| ब) कायदा पदवीधर- (सेनादलाच्या न्यायविभागासाठी) | २१ ते २५ | कायद्याची व्यावसायिक पदवी (५० टक्के गुणांसह) | न्यायविभाग मार्च महिन्यात लेखी परीक्षा घेते आणि त्यानंतर जुलैमध्ये सेनादल निवड मंडळ मुलाखत. | दरवर्षी नोव्हेंबरमध्ये जाहिरात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. अल्पकालीन सेवा अधिकारी ( रिमाऊंट आणि व्हेटर्नरी कोअर ) | २१ ते ३२ | व्हेटर्नरी शास्त्रशाखेची पदवी | फक्त सेनादल निवड मंडळ मुलाखत. | दरवर्षी एकदाच जाहिरात |

भूदलातील अधिकाऱ्यांशिवाय इतर कर्मचारी किंवा जवान म्हणूनही सेवेत दाखल होण्याच्याही अनेक संधी उपलब्ध असतात. जवानांमध्ये सुरूवातीला शिपाई हा हुद्दा मिळतो. त्यानंतर नायक, हवालदार, नायब सुभेदार, सुभेदार आणि सुभेदार मेजर अशा बढतीच्या संधी असतात.

अतिशय निवडक आणि होतकरू जवानांना योग्य ती प्रगती केल्यानंतर अधिकारी होण्याची संधीही दिली जाते. अधिकारी होण्यासाठी त्यांना आर्मी कॅडेट कॉलेजमध्ये दाखल व्हावे लागते. यासाठी किमान पाच वर्षे जवान म्हणून सेवा आणि बारावी उत्तीर्ण ही पात्रता आवश्यक असते. २२ ते २७ वर्षे ही वयोमर्यादा असते आणि त्यासाठी मिलिटरी ट्रेनिंग डायरेक्टोरेटची परीक्षा आणि त्यानंतर सेनादल निवड मंडळाची मुलाखत या गोष्टी पूर्ण कराव्या लागतात.

अर्थात सुभेदार मेजर झालेल्या निवडक जवानांनाही राष्ट्रपतींकडून सन्माननीय कमिशन ( ऑनररी ) दिले जाते.

जवानांची भरती ही प्रत्येक राज्यामध्ये असलेल्या विभागीय भरती किंवा उपविभागीय केंद्राद्वारे होत असते. याशिवाय प्रत्येक जिल्ह्याच्या ( किंवा काही तालुक्यांच्या ) ठिकाणीही जाऊन भरती केली जाते.

यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा याची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| | नॉर्मल एन्ट्री रेट कॅटेगरीज ( एन. इ. आर. ) | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | निवडीची पध्दत |
|---|---|---|---|---|
| अ | १ ) पायदळातील ( इन्फंट्री ) जवान २ ) तोफखाना ( आर्टिलरी ) दलातील जवान ( गनर ) ३ ) वाहनचालक ( एम. टी. ड्रायव्हर ) ४ ) भांडार कर्मचारी ( स्टोअर हॅण्ड ) ५ ) सर्वसामान्य ( जनरल ड्यूटी ) | दहावी उत्तीर्ण | १६ ते २१ वर्षे | १ ) वजन, उंची, छाती इत्यादी गोष्टी ( सर्व गोष्टी आवश्यक ) २ ) वैद्यकीय पात्रता परीक्षा ३ ) शैक्षणिक प्रमाणपत्रांची तपासणी ४ ) धावणे, उड्या मारणे ५ ) लेखी परीक्षा |
| ब | सुतार, लोहार, शिंपी, स्वैंपाकी | दहावीपर्यंतचे शिक्षण | १६ते २५ वर्षे | वरीलप्रमाणेच |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | लेखनिक ( क्लार्क ) आणि भांडारपाल ( स्टोअरकिपर ) तांत्रिक | दहावी उत्तीर्ण आणि इंग्लिश, अंकगणित, बुककिपिंग आणि अकाऊंटस् हे विषय | १६ ते २३ वर्षे | ,, |
| ड | आर्मी मेडिकल कोअरमध्ये वैद्यकीय सहाय्यक ( मेडिकल असिस्टंट ) नर्सिंग | दहावी उत्तीर्ण इंग्लिश, गणित, शास्त्र हे विषय आवश्यक | १६ते २३ वर्षे | ,, |
| इ | सिग्नल रेजिमेंटमध्ये रेडिओ ऑपरेटर | वरीलप्रमाणेच | १६ ते २३ वर्षे | ,, |
| फ | इलेक्ट्रीकल ॲण्ड मेकॅनिकल इंजिनीयरिंग ( इ. एम. इ. ) मध्ये वाहन दुरूस्त करणारा वगैरे | वरीलप्रमाणेच | ,, | ,, |

**या जवानांना मिळणारे वेतन असे असते:**

| रॅन्क | ग्रुप अ | ब | क | ड | ई |
|---|---|---|---|---|---|
| शिपाई | ११०० ते १३२० | ९५० ते ११७० | ९२० ते ११४० | ९०० ते ११२० | ८७० ते १०९० |
| नायक | ११६० ते १४९५ | १०२० ते १३६५ | ९८० ते १३१५ | ९६०ते १२९५ | ९३० ते १२६५ |
| हवालदार | १३०० ते १७०० | ११३० ते १५३० | १०७० ते १४७० | १०५० ते १४५० | १०२० ते १४२० |
| नायब सुभेदार | १६२० - २४०० | १५०० - २२५० | १४५० - २१९० | १४२० - २१५० | १३८० - २१०० |
| सुभेदार | १८७० - २७७० | १७५० - २६०० | १७०० - २५४० | १६७० - २५०० | १६३० - २४६० |
| सुभेदार मेजर | २२०० ते ३१७५ | २०५० ते २९८० | २०५० ते २९८० | २०५० ते २९८० | २००० ते २९१५ |

* याशिवाय ७५ हजार रूपयापर्यंतचे विमा संरक्षण.

* दरवर्षी ६० दिवस वार्षिक आणि ३० दिवस नैमित्तिक भरपगारी रजा.

* स्वत:साठी आणि कुटुंबासाठी नोकरीच्या ठिकाणापासून ते घरापर्यंत रेल्वेचा मोफत प्रवास.

* मोफत अन्नधान्य, गणवेश, निवासस्थान, वैद्यकीय सेवा आणि विक्रीकर न घेता सर्व वस्तू.

महाराष्ट्रात पुणे येथे विभागीय भरती केंद्र आहे आणि त्याशिवाय औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, नागपूर येथे उपविभागीय भरती केंद्रे आहेत.

## आता नौदलाविषयी

नौदलाचे मुख्य काम देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करणे हे आहे. पण नौदलातील सेवांमध्येही अनेक विभाग, उपविभाग आहेत.

नौदलातील अधिकारी आणि नाविक यांना नौदलांच्या जहाजांप्रमाणेच नौदलाच्या किनाऱ्यांवर असलेल्या विविध कार्यालयांमध्येही काम करायचे असते.

नौदलाच्या नोकरीचे एक विशेष म्हणजे ज्यावेळी नौदलाचे जहाज शुभेच्छा-भेटीसाठी ( गुडविल व्हिजिट ) परदेशात जाते तेव्हा जहाजावरील सर्व अधिकाऱ्यांप्रमाणेच नाविकांनाही परदेशगमनाची संधी दिली जाते.

नौदलामध्येही कार्यकारी ( एक्झिक्युटिव्ह ), अभियांत्रिकी ( नेवल आर्किटेक्टर ) आणि विद्युत या शाखा आहेत. त्याशिवाय शिक्षण ( एज्युकेशन ) ही अत्यंत मानाची समजली जाणारी शाखा आहे.

कार्यकारी शाखेमध्ये सामान्य सेवा, हवाई सेवा आणि पाणबुडी या उपशाखा आहेत.

नौदलाचे जहाज जेव्हा समुद्रावर कार्यरत असते तेव्हा तिचा मुख्य अधिकारी हा कार्यकारी शाखेतीलच ( किंवा उपशाखेतील ) असतो.

नौदलामध्ये अधिकारी म्हणून दाखल होण्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत.

| भरतीचा प्रकार | शाखा | वय | शैक्षणिक पात्रता | अर्ज कसा/कुठे करायचा |
|---|---|---|---|---|
| कॅडेट १०+२ कॅडेट एन्ट्री नेव्हल ॲकेडमी | कार्यकारी | १६।। ते १९ | बारावी उत्तीर्ण ( फिजिक्स, केमेस्ट्री आणि गणित या विषयांसह ) | संघ लोकसेवा आयोगाची जाहिरात |
| राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी | कार्यकारी अभियांत्रिकी विद्युत | १६।। ते १९ | बारावी उत्तीर्ण | ,, |
| पदवीधर ( विशेष भरती ) | कार्यकारी हवाई | १९ते २२ | शास्त्र ( फिजिक्स, मॅथेमॅटिक्ससह ) किंवा अभियांत्रिकी पदवी | ,, |
| एन, सी. सी. ( स्पेशल एन्ट्री ) | कार्यकारी हवाई | १९ ते २२ | शास्त्र किंवा अभियांत्रिकी पदवी आणि एन.सी. सी. चे सी प्रमाणपत्र | डायरेक्टर जनरल, एन. सी. सी. वेस्ट ब्लॉक, आरके पूरम, नवी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०+२ कॅडेट एन्ट्री तांत्रिक | अभियांत्रिकी विद्युत अभियांत्रिकी ( नौदल स्थापत्य ) | १६॥ ते १९ | बारावी परीक्षा ( ७० टक्के गुणांसह फिजिक्स, मॅथेमॅटिक्स, केमिस्ट्री या विषयांसह ) | दिल्ली वृत्तपत्रांमध्ये जाहिरात |
| थेट अल्पकालीन सेवा अधिकारी किंवा पूर्णकालीन सेवा अधिकारी | अभियांत्रिकी विद्युत | १९॥ ते २५ | मेकॅनिकल, मरीन, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, टेलकॉम, एअरॉनाटिकल, कंट्रोल, प्रॉडक्शन, मेटलर्जीकल इंजिनीयरिंग पदवी | वृत्तपत्रांमध्ये जाहिरात |
| | नौदल स्थापत्य | २१ ते २५ | ६० टक्के गुणांसह नौदल स्थापत्य पदवी | ,, |
| | शिक्षण | २१ ते २५ | वरील विषयातील पदवी किंवा शास्त्र शाखेतील पदव्युत्तर पात्रता | ,, |
| | नौदल दारूगोळा तपासणी | १९॥ ते २५ | वरीलप्रमाणे | ,, |
| **विद्यापीठातून थेट प्रवेश** या काळात पूर्णकालिन सेवेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाच्या अंतिम वर्षात दरमहा २३०० रुपये तर अल्पकालिन सेवेत जाणाऱ्यांना ११५० रुपये विद्यावेतनं दिले जाते. | अभियांत्रिकी विद्युत | १८॥ ते २३॥ ( अंतिम वर्षापूर्वी ) १९ ते २४ ( अंतिम वर्ष ) | अंतिम वर्षापूर्वीचे किंवा अंतिम वर्षातील मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल, टेलिकॉम, मरिन, एअरॉनॉटिकल, कंट्रोल, प्रॉडक्शन, मेटलर्जीकल इलेट्रॉनिक्स इंजिनीयरिंगचे विद्यार्थी | नौदलाची पथके दरवर्षी ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर या महिन्यांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयांना आणि तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांना भेटी देऊन निवड करतात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नौदल पुरस्कृत योजना (महाविद्यालयातील पहिल्या तीन वर्षाची फी अधिक दरमहा सातशे रुपये विद्यावेतन आणि त्यानंतर म्हणजे अंतिम वर्षात ॲक्टींग सबलेफ्टनंट ही रँक आणि २३०० रुपये विद्यावेतन.) | अभियांत्रिकी (कोअर ऑफ नेव्हल कन्स्ट्रक्शनसाठी) | १७ ते २० | आय. आय. टी. मधील. पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाचे विद्यार्थी आणि नौदल स्थापत्य विषय शिकविणारी अभियांत्रिकी महाविद्यालये. | वरीलप्रमाणे |

याशिवाय नौदलामध्ये नाविक म्हणून दाखल होण्याच्या अनेक संधी असतात. नाविक म्हणून इलेक्ट्रीक, नॉन-इलेक्ट्रीक, जनरल सर्व्हिस पाणबुडी शाखा आणि हवाई शाखा यामध्ये कार्य करण्याची संधी मिळेल.

तसेच कम्युनिकेशन, मेडिकल, इंजिनीयरिंग, रायटर, भांडार सहाय्यक या शाखांमध्यही दहावी उत्तीर्ण असणाऱ्यांना संधी मिळते.

दहावी अनुत्तीर्ण असणाऱ्यांना वाद्य-वादक, स्वैंपाकी, सफाई कामगार, वाढपी इत्यादी जागांवर काम करता येते.

ती माहिती अशी आहे :

| भरतीचा प्रकार | शाखा | वय | शैक्षणिक पात्रता | पद्धत |
|---|---|---|---|---|
| अर्टिफिसर | सर्वसाधारण सेवा, पाणबुडी, हवाई | १५ ते १८ | दहावी उत्तीर्ण | दरवर्षी एप्रिल आणि ऑक्टोबर या महिन्यात शास्त्र, गणित आणि इंग्लिश या विषयांतील लेखी परीक्षा (जाहिरात वृत्तपत्रांमध्ये येते.) |
| ॲप्रेंटिस | (एव्हिएशन) विद्युत, अ-विद्युत | १८ ते २२ | इलेक्ट्रकल, रेडिओ | |
| आर्टिफिसर | | | मेकॅनिकल | |
| (डिप्लोमा होल्डर) | | | एअरॉनॅटिकल, ऑटोमोबाईल इंजिनीयरिंग डिप्लोमा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| थेट भर्ती | इलेक्ट्रीकल, मेडिकल, इंजिनीयरिंग, रायटर, कम्युनिकेशन, स्टोअर असिस्टंट, नेव्हल एव्हिएशन | १७ ते २० | दहावी उत्तीर्ण | वर्षातून दोनदा, वृत्तपत्रांमधून जाहिरात |
| थेट भर्ती | म्युझिशियन, स्टुअर्ड, कूक | १७ ते २० | दहावी अनुत्तीर्ण | वर्षातून मार्च, जुलाई आणि नोव्हेंबरमध्ये भाषाज्ञान, विज्ञान, आणि गणित या विषयात लेखी परीक्षा. |
| | टोपस | १७ ते २० | काही नाही | तिनदा भरती, कोणतीही परीक्षा नाही. |

नौदलातील या नाविकांना दरवर्षी अकरा हजार ते तेहतीस हजारपर्यंतचे वेतन आणि भत्ते मिळतात. त्याशिवाय मोफत अन्नधान्य, गणवेश, निवासस्थान, स्वत:साठी आणि कुटुंबासाठी मोफत वैद्यकीय सेवा विक्रीकरमुक्त सर्व वस्तू मिळतात. दरवर्षी ६० दिवस वार्षीक आणि ३० दिवस नैमित्तिक भरपगारी रजा. सुट्टीमध्ये नोकरीच्या ठिकाणापासून घरी जाण्यासाठी रेल्वेच्या मोफत प्रवासाची सुविधा.

तीनही दलांमध्ये हवाई दलाला जास्त मान देण्यात येतो. मात्र हवाई दलात वैमानिकांशिवाय इतरही अनेक गोष्टी करायच्या असतात आणि त्यासाठीही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जरूरी असते. हवाई दलातील कर्मचारी हवाई सैनिक किंवा एअरमन म्हणून ओळखले जातात.

हवाई दलामध्ये अधिकाऱ्यांसाठी किमान सात ते दहा विभाग आहेत. त्यात वैमानिकांसाठीचे दोन उपविभागही आहेत. लढाऊ आणि बॉम्बफेकी विमानांच्या वैमानिकांना 'फायटर्स पायलट' असे म्हणतात तर हवाई वाहतूक करणाऱ्या विमानांचे सारथ्य करणाऱ्यांना 'ट्रान्सपोर्ट पायलट' म्हणतात. याशिवाय हेलिकॉप्टर चालविणारे पायलटही असतात. त्यांना चॉपर पायलट म्हणतात. या तीनही उड्डाण शाखेच्या उपशाखा आहेत. त्यांना प्रशासन, हिशेब, रसद पुरवठा, शिक्षण, वित्त, तांत्रिक, हवामान, वैद्यकीय, नेव्हीगेटर, विमानांची देखभाल करणाऱ्या या शाखा आहेत.

यापैकी उड्डाण शाखेच्या अधिकाऱ्यांना इतर अधिकाऱ्यांच्या वेतनापेक्षा 'उड्डाण भत्ता' (फ्लाइंग अलाऊन्स) अतिरिक्त देण्यात येतो. या अधिकाऱ्यांपैकी तांत्रिक शाखेच्या अधिकाऱ्यांना हवाई दल आपल्या खर्चाने उच्च शिक्षणासाठी देशातील आणि काही बाबतीत देशाबाहेरील

तंत्रज्ञान संस्थामध्ये अभ्यासक्रमासाठी पाठवते. हवाई दलातील कर्मचारी किंवा एअरबेनचे दोन विभागात वर्गीकरण करण्यात आले आहे. ते टेक्निकल ट्रेड आणि नॉन टक्निकल ट्रेड असे आहे. टेक्निकल ट्रेडसाठी साठ टक्के गुणांसह दहावी उत्तीर्ण अशी पात्रता असून त्याशिवाय उमेदवाराने शास्त्र आणि गणित हे विषय घेतले असले पाहिजेत. काही बाबतीत इंटरमिजिएट परिक्षा गणित किंवा फिजिक्स हा विषय घेऊन तर तीन वर्षांचा मेकॅनिकल इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंगमधील पदविका घेतलेल्या उमेदवारांनाच प्रधान्य देण्यात येते.

नॉन टेक्निकल ट्रेडसाठी दहावी परीक्षा उत्तीर्ण लागते. म्युझिशियन्सना वाद्ये वाजविता येणे आवश्यक असतेच, पण किमान लिहीता-वाचता येणेही आवश्यक असते याशिवाय एज्युकेशन इन्स्ट्रक्टर्सना थेट भरती केले जाते. त्याशिवाय बी. ए. किंवा बी. एस्सी. ही पदवी आणि अध्यापनातील पदवी किंवा पदविका आवश्यक असते.तसेच किमान एक वर्ष मान्यवर संस्थेत शिकविण्याचा अनुभव असावा लागतो. विज्ञान-पदवीधरांनी गणित, विज्ञान व रसायनशास्त्राचा अभ्यास केलेला असावा.

टेक्निकल ट्रेडसाठी १६ ते २० ही वयोमर्यादा असून ( पदविका असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत ही अट तीन वर्षांनी शिथील करण्यात येते. ) नॉन टेक्निकल ट्रेडसाठीही हीच वयोमर्यादा आहे.

एज्युकेशन इन्स्ट्रक्टरसाठी २० ते २५ अशी वयोमर्यादा असून ती पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या उमेदवारांच्या बाबतीत तीन वर्षांनी शिथील करण्यात येते. म्युझिशियन्सना १७॥ ते ३५ वयोमर्यादा आहे. शारीरिक पात्रता ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. उंची किमान १५२.५ सेंटिमीटर्स लागते आणि वजन हे उंचीच्या प्रमाणात आवश्क असते. छाती किमान ७५ से. मी. असावी लेफ्टनंट आणि ती पाच सें.मी. फुगवता यावी लागते. हवाई दलातील एअरमेनची भरती ही विविध राज्यांमध्ये असणाऱ्या निवड केंद्रांद्वारे होत असते. महाराष्ट्रात मुंबई, पुणे आणि नागपूर येथे ही केंद्रे आहेत.

प्रत्येक वेळेला वृत्तपत्रांमध्ये जाहिरात दिली जाते. त्यानंतर आलेल्या अर्जांवर विचार करण्यात येऊन निवडक उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी बोलावले जाते. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर मुलाखत घेतली जाते आणि त्यानंतर वैद्यकिय परीक्षा असते. यामध्ये उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच दाखल करून घेण्यात येते.

भूदल आणि नौदलाप्रमाणेच एअरमेनना वेतनाव्यतिरिक्त मोफत अन्नधान्य, गणवेश, निवासस्थान, स्वत:साठी आणि कुटुंबासाठी वैद्यकिय सुविधा त्याशिवाय ६० दिवस वार्षिक आणि ३० दिवस नैमित्तिक भरपगारी रजा देण्यात येतात.

रजेच्या काळात कामाच्या ठिकाणापासून घरी जाण्यासाठी कुटंबियांसह रेल्वेचा गोफत प्रवासही असतो. एअरमेनना कामानिमित्त विमानप्रवास करण्याची संधीही वेळेला मिळते. हवाई दलाच्याच विमानातून काही अटींवर त्यांना प्रवास करता येतो.

## तिन्ही दलातील अधिकारी वर्ग

| भूदल | नौदल | हवाईदल |
|---|---|---|
| सेकंड लेफ्टनंट | ॲक्टिंग सब लेफ्टनंट | पायलट ऑफिसर |
| लेफ्टनंट | सब लेफ्टनंट | फ्लाईंग आफिसर |
| कॅप्टन | लेफ्टनंट | फ्लाईट लेफ्टनंट |
| मेजर | लेफ्टनंट कमांडर | स्कॉड्रन लिडर |

| | | |
|---|---|---|
| कर्नल | कमांडर | विंग कमांडर |
| कर्नल | कॅप्टन | ग्रुप कॅप्टन |
| ब्रिगेडियर | कॉमोडोर | एअर कमोडोर |
| मेजर जनरल | रिअर ॲडमिरल | एअर व्हाईस मार्शल |
| लेफ्टनंट जनरल | व्हाईस ॲडमिरल | एअर मार्शल |
| जनरल | ॲडमिरल | एअर चिफ मार्शल |
| फिल्ड मार्शल | ॲडमिरल ऑफ द फ्लिट | मार्शल ऑफ द एअर फोर्स |

( आपल्या देशात फिल्ड मार्शल हे पद फक्त सॅम माणेक शा आणि करिअप्पा या द्रोघांना देण्यात आले असून ते कायमस्वरूपी आहे तर फिल्ड मार्शलच्या समक्ष असणारी नौदल आणि हवाई दलातील पदे कोणालाही देण्यात आलेली नाहीत. )

**तिन्ही दलातील कर्मचारी वर्ग**

| भूदल | नौदल | हवाईदल |
|---|---|---|
| शिपाई | सी-मेन- टू | एअरमन |
| लान्स नायक | सी-मेन- वन | लिडिंग एअर क्राप्टस्मन |
| नायक | | कॉर्पोरेल |
| हवालदार | लिडिंग सी मेन | सार्जंट |
| नायब सुभेदार | पेटी ऑफिसर | ज्युनियर वारंट ऑफिसर |
| सुभेदार | चीफ पेटी ऑफिसर | वारंट ऑफिसर |
| सुभेदार मेजर | मास्टर चीफ पेटी ऑफिसर | मास्टर वारंट ऑफिसर |

**आधिकाऱ्यांचे वेतन**

| | |
|---|---|
| पायलट ऑफिसर ते एअर कमोडोर<br>सेकंड लेफ्टनंट ते ब्रिगेडियर<br>ॲक्टिंग सब लेफ्टनंट ते कॉमोडोर | २३०० ते ५१०० रु. दरमहा |
| एअर व्हाईस मार्शल<br>रिअर ॲडमिरल<br>मेजर जनरल | ५९०० ते ६७०० रू. दरमहा |
| एअर मार्शल<br>व्हाईस ॲडमिरल<br>लेफ्टनंट जनरल | ७३००ते ७६०० रू. दरमहा |
| भूदल, नौदल, हवाईदल, उपप्रमुख ( व्हाईस चीफ ) आणि कमांडर्स ( भूदल, नौदल, हवाईदल ) | ८००० रूपये दरमहा |
| एअर चीफ मार्शल<br>ॲडमिरल<br>जनरल | ९००० रूपये दरमहा |

( या लेखासाठी संरक्षण मंत्रालयाच्या जनसंपर्क विभागातील कर्नल प्राणनाथ खेरा विशिष्ट सेवा पदक, लेफ्टनंट कमांडर थॉमस कोशी आणि विंग कमांडर प्रफुल्ल बक्षी यांचे साहाय्य मिळाले आहे )

# सैन्यात नोकरी कशी मिळते ?

## मेजर विनायक तांबेकर

**सैन्यातली नोकरी म्हणजे लढण्याच्या संदर्भातली नोकरी एवढीच ढोबळ कल्पना आपल्या डोळ्यासमोर असते. पण खरं म्हणजे सैन्यदलात अनेक नोकऱ्यांसाठी केवढी संधी आहे त्याची आपल्याला माहिती नसते. ती माहिती देणारा लेख**

महाराष्ट्रीय युवक सैन्यदलात कमी संख्येने का याची चर्चा मधूनमधून आपल्याकडे होते. आणि त्यापलीकडे काही घडत नाही. महाराष्ट्रीय युवक सैन्यदलामध्ये कमी का ? हा जरी चर्चेचा एक स्वतंत्र विषय असला तरी सर्वांना मान्य असलेले एक कारण म्हणजे मराठी युवकाला सैन्यदलात काय संधी आहेत याची माहितीच नसते. तो स्वतः माहिती करून घेण्याचा प्रयत्न करीत नाही आणि जेव्हा त्याला माहिती मिळते तेव्हा त्याचे वय मर्यादेच्या बाहेर गेलेले असते. दुसरे कारण म्हणजे सैन्यदलातील नोकरीबाबत युवकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या चुकीच्या कल्पना, उदाहरणार्थ सैन्यदलात भरती होण्यासाठी उंच, धिप्पाड अक्राळ विक्राळ दिसणारा माणूस लागतो, भरती झाल्यानंतर प्रशिक्षणाच्या वेळी फार त्रास देतात, मटण आणि दारू घ्यावीच लागते. हुकूम न ऐकल्यास गोळी घालून मारतात. इ. इ. हे सर्व समज अत्यंत चुकीचे आणि मूर्खपणाचे आहेत. सैन्यदलातील निवडीसाठी वजन, उंची आणि छाती यांचे विभागवार निकष ठरवून दिलेले आहेत. उंचीनुसार वजन किती असावे याचे कोष्टक दिलेले असते आणि त्यानुसार भरती होत असते त्यामुळे धिप्पाड, उंच पेहलवान पाहिजे हे सपशेल चूक.

सैन्यदलात ठराविक शैक्षणिक पात्रतेचा सुदृढ युवक लागतो. त्या खेड्यातील युवकाला प्रशिक्षण देऊन उत्कृष्ट शिपाई किंवा जवान करण्याची तरतूद सैन्यदलात आहे. याचा अर्थ कोणी जास्त प्रशिक्षित म्हणजे पदवीधर किंवा पदव्युत्तर असेल त्याला सैन्यदलात वाव कमी असा नव्हे. निरनिराळ्या शैक्षणिक पात्रतेचा आणि वयोमर्यादा असलेल्या युवकांसाठी सैन्यदलामध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत. परंतु युवक प्रथमपासून त्याचा पाठपुरावा करीत नाहीत म्हणून त्या संधी त्यांच्या हातून निघून जातात. प्रस्तुत लेखकाला त्या वेळी १९५७/५८ मध्ये तो एस. एस. सी. उत्तीर्ण झाला त्या वेळी पुण्याच्या संरक्षण प्रबोधिनीची परीक्षा इत्यादिंची माहितीच नव्हती म्हणून तिकडे अर्जच केला नाही ! एस. एस. सी. पास झाल्यानंतर लगेचच सैन्यदलाचे दरवाजे ठोठावण्यास सुरवात केली आणि चिकाटीने प्रयत्न केले तर सैन्यात तुमच्या लायकीप्रमाणे नोकरी मिळू शकते.

सैन्यदलातील प्रवेश फार अवघड वगैरे काही नाही फक्त हवा निश्चय आणि प्रयत्न ? आणि नेमका तोच आमच्या युवकांकडे नाही म्हणून महाराष्ट्रीयन सैन्यातच काय परंतु इतर केंद्र सरकारी नोकऱ्यांतही कमी आहे.

आणखी एक त्रुटी म्हणजे महाराष्ट्राच्या तर सोडूनच द्या जिल्ह्याबाहेर जाण्यासही आपले युवक आणि त्यांचे पालक तयार नसतात. मुलाला नाव घेण्याजोगी, उच्च दर्जाची नोकरी हवी असेल तर ती सुद्धा केंद्र सरकारचीच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे आणि केंद्र

सरकारच्या नोकऱ्या या देशभर कोठेही असतात. परंतु चार पैसे कमी मिळाले तरी चालेल, स्टेटस् किंवा हुद्दा नसला तरी चालेल ''तू बाबा पुणे सोडू नकोस'' हा आपला दृष्टीकोन नडतो.

सैन्यदल याचा अर्थ आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्स म्हणजे लष्कर, नौदल आणि वायुदल. याशिवाय केंद्र सरकारच्या अखत्यारीतील निमलष्करी दले म्हणजे बॉर्डर सिक्युरिटी फोर्स (बी. एस. एफ) केंद्रीय रिझर्व्ह पोलिस (सी. आर. पी. एफ.) आणि इंडो तिबेट बॉर्डर पोलिस (आय. टी. बी. पी.) यामध्येही दोन प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. एक जवान म्हणून तर दुसरी एकदम अधिकारी म्हणून या दोन्हींसाठी भरतीच्या पद्धती आणि शैक्षणिक पात्रता आणि वयोमर्यादा भिन्न आहेत. त्या कोणत्या हे माहित करून घेण्यापूर्वी सैन्यदलातील नोकरी ही आकर्षक आहे का, याची माहिती करून घेऊ.

सैन्यदलातील व्यक्तिंना, जे भरती होतात त्यांना प्रशिक्षणानंतर दरमहा रुपये ८७० ते ११०० मिळतात. याशिवाय जेवण, कपडे, वैद्यकिय काळजी मोफत ! तसेच दरवर्षी २ महिने पगारी रजा ८५ हजार रुपयांचा विमा, अपंगत्व आल्यास निवृत्ती वेतन, निवृत्तीनंतर वेतन तीस हजार रुपयांचा विमा इत्यादि अनेक फायदे त्याला मिळतात. याशिवाय साबण, टूथपेस्ट इत्यादि रोज संसारात लागणाऱ्या वस्तू कॅन्टीनमधून स्वस्तात मिळतात. थोडक्यात, जवानाला मिळणारा पगार हा सर्वच्या सर्व शिल्लक राहू शकतो. पदोन्नतीबाबत जवान त्याच्या परीक्षा उत्तीर्ण होत राहिला तर नाईक, हवालदार आणि जे. सी. ओ. होऊ शकतो. काही जवान पात्रता असलेले, स्पर्धा-परीक्षा उत्तीर्ण होणारे जवानाचे अधिकारी होऊ शकतात आणि ते लेफ्टनंट जनरलच्या हुद्यापर्यंत पोचले आहेत.

शैक्षणिक पात्रता आणि वय यानुसार युवक लष्करामध्ये काय म्हणून घेतले जाऊ शकतात हे पुढील तक्त्यावरून कळून येईल.

| | प्रकार | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | इतर माहिती |
|---|---|---|---|---|
| १. | नार्मल एंट्री रेट ( घ्दह ) | शालांत परीक्षा उत्तीर्ण | १६ ते २१ | |
| २. | मॅट्रीक एंट्री रेट ( ब्द्दह )<br>( अ ) ( कारकून/स्टोअर कीपर ) | शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>( गणित आणि इंग्रजी हवे ) | १६ ते २३ | लेखी परीक्षा द्यावी लागते |
| | ( ब ) एम. ई. आर. ( टेक्निकल ) | ( गणित, इंग्रजी, विज्ञान हवे ) | १६ ते २३ | लेखी परीक्षा |
| ३. | पदवीधर हवालदार कारकून | बी. ए., बी. एससी., बी. कॉम. | २० ते २५ | लेखी परीक्षा |
| ४. | थेट हवालदार ( शैक्षणिक विभागात ) | पदव्युत्तर ( बी. एड. ) | १६ ते २५ | लेखी परीक्षा |
| ५. | थेट हवालदार ( शैक्षणिक विभागात ) | पदवीधर | १६ ते २३ | लेखी परीक्षा |
| ६. | कारागिर असणारे | शालांत उत्तीर्ण/अनुत्तीर्ण चालतील | १६ ते २५ | सुतार वेल्डर गवंडी इ. प्रमाणपत्र हवे. |

कोष्टकावरून हे लक्षात येईल गणित, इंग्रजी आणि विज्ञान घेऊन शालान्त परीक्षा पास झालेल्या १६ ते २३ वयाच्या तरूणांना लष्करात खूपच वाव आहे. वरील सर्व प्रकारची भरती अव्याहतपणे लष्कराच्या भरती केंद्रामार्फत चालू असते. त्याची सूचना वेळोवेळी वृत्तपत्रातून आणि आकाशवाणीवरून देण्यात येते.

महाराष्ट्रात ही भरती केंद्रे मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, आणि पुणे या ठिकाणी आहेत. आता सर्व भरती अर्जाद्वारे होते. ठराविक नमुन्यातील अर्ज शालान्त परीक्षा उत्तीर्णाचे प्रमाणपत्र, वयाचा दाखला, कारागिर असल्यास आय. टी. आय. किंवा तत्सम प्रमाणपत्र यांच्या झेरॉक्स प्रती आणि मागे नाव लिहीलेले २ फोटो यांसह '' **ब्रँच रिक्रुटींग ऑफिसर पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर आणि नागपूर** जे केंद्र त्या भागातील उमेदवारांना जवळ आहे. तिकडे पाठवावेत. या अर्जासमवेत स्वत:चा पत्ता लिहिलेले आणि तिकिटे लावलेले पाकिट पाठविण्यास विसरू नये. हे पाकीट न पाठविल्यास भरतीसाठी बोलविणे येण्याची शक्यता कमी. याशिवाय भरती अधिकारी जिल्हयाच्या ठिकाणी जाऊन भरती करतात. त्यामुळे उमेदवाराला पुणे, मुंबई इ. लांब जाण्याची गरज नाही. जिल्हयामध्ये भरती केव्हा आहे याची माहिती **जिल्हा सैनिक कल्याण मंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय** यांच्याकडे अगोदर उपलब्ध असते. स्थानिक वृत्तपत्रांकडे याचे निवेदन दिले जाते. जागरूक तरूणाने लक्ष ठेवल्यास तो जिल्हयाच्या ठिकाणीच जाऊन पात्र असल्यास भरती होऊ शकतो.त्याला पुणे किंवा मुंबईला जाण्याची गरज नाही. मात्र उमेदवाराने आपल्या सोबत प्रमाणपत्रे, झेरॉक्स कॉपीज् फोटो इ. नेले पाहिजे.

**शारीरिक क्षमता**

जवानांच्या भरतीसाठी महाराष्ट्र मध्य विभागात येतो. त्यासाठी उमेदवारांची उंची १६४ सें.मी., छाती ७७ सें.मी. ( ५ सें.मी. फुगवून ) आणि वजन ५० किलोग्रॅम, छाती आणि उंची याबाबत कोणतीही सवलत देण्यात येत नाही. वजनामध्ये उंचीप्रमाणे थोडीशी सवलत देण्यात येते. गोरखा भरतीसाठी उंची १५४ सेंटीमीटर चालते. यावरून भरती निकषाची कल्पना येते. पुढील प्रशिक्षण अवघड जाऊ नये म्हणून ज्या युवकांना सैन्यात जायचे आहे त्यांनी रोज पळण्याच्या व्यायामाचा सराव ठेवावा. खेळात नैपुण्य असल्याचे प्रमाणपत्र असेल तर उमेदवारास प्राधान्य मिळते. माजी सैनिकांच्या मुलांनाही अग्रक्रम मिळतो. भरती केंद्राजवळ आमची ओळख आहे, आम्ही भरती करून देतो, असे सांगून पैसे घेणारे बरेच भेटतात. उमेदवारांनी अशा व्यक्तींपासून सावध राहिले पाहिजे. भरती केवळ अधिकारीच करू शकतात. त्या ठिकाणी पात्रता हाच निकष असतो.

# लष्करी सेवा
# म्हणजे होतकरू तरुणांसाठी उज्ज्वल भवितव्य

## सर्वसामान्य

आपण जर तरुण, बलवान आणि उज्ज्वल तसेच अभिमानास्पद भवितव्याबद्दल विचार करीत असाल तर आपण स्वतःच लष्करी सेवेची निवड करायला हवी. लष्करामधील सेवा म्हणजे केवळ नोकरी नाही पण आपल्या मातृभूमीचा गौरव आणि अखंडत्व याचं रक्षण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणं. आज सैनिक केवळ तरवारीनं लढत नसतात पण अत्याधुनिक शस्त्र आणि दारूगोळ्यानिशी युद्ध करतात. शरीरानं सक्षम असणाऱ्यांचीच केवळ आम्हाला आवश्यकता नाही पण सुविद्यआरि तल्लख बुद्धीच्या तरुणांची आवश्यकता आहे. लष्कराची एक परंपरा आहे ती एक संस्था आहे. आपल्या देशाची एक गौरवशाली संघटना आहे. या सेवेत रुजू व्हा, आपलं पाउल माघारी पडणार नाही.

आपण आपल्या देशातील कुठल्याही समाजातले असा किंवा कोणत्याही जाती धर्माचे असा लष्कर सेवा सर्वांसाठी खुली आहे.

## सेवेमधील फायदे

## वेतन आणि भत्ते

शिपायाचं प्राथमिक वेतन रु. ८७०/- ते ११००/- पर्यंत असतं याशिवाय तो कुठल्या वर्गातला आहे यावर महागाई भत्ता आणि इतर भत्ते अवलंबून असतात. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या सेवकांना लागू असलेल्या भत्यांप्रमाणेच हे भत्ते असतात. शिपाई कुठल्या श्रेणीमध्ये मोडतो यावर त्याचं वेतन अवलंबून असते.

## आर्थिक लाभ

अ) रु. ५०,०००/- पर्यंत आयुर्विमा

ब) अधुत्व आल्यास लाभ- १०० टक्के अधु झाल्यास नियमाप्रमाणे ५० टक्के विम्याची रक्कम.

क) व्याजासह मुदतपूर्ण झाल्यावर मिळणारे लाभ- एकूण जमा केलेले पैसे अधिक व्याज.

ड) १५ वर्षाकरिता किंवा वयाच्या ७० वर्षापर्यंत जे कुठले आधी असेल त्याप्रमाणे केवळ रुपये ५८०/- जमा करून अधिकृत श्रेण्यांमध्ये येणाऱ्या अधिकाऱ्यांना निवृत्तीनंतर रु. ५०,०००/- विमा मिळेल.

इ) निवृत्तीनंतर प्रॉव्हिडंट फंड नि ग्रॅच्युइटी आणि न घेतलेल्या वार्षीक रजेपैकी १८० दिवसांच्या सुटीचे पैसे मिळतील.

## सुटीः

६० दिवसांची वार्षिक आणि ३० दिवसांची आकस्मिक सुटी. त्यासोबतच स्वतःसाठी, कुटुंबियांसाठी आणि अवलंबितांसाठी (आईवडील, अविवाहित भाऊ, बहिणी) प्रवासखर्च सवलत याशिवाय आजारपणाची/ वैद्यकिय सुटी.

## इतर लाभः

मोफत रेशन, कपडे, घर आणि इतर सेवा, स्वतःसाठी आणि कुटुंबियासाठी वैद्यकिय सेवा, सामूहिक घरबांधणी योजनेचे लाभ, घरबांधणीकरिता कर्ज, कँटीनची सोय इत्यादि.

## बढतीची संधी

शिपायाच्या पदावर असलेल्यानां काही अटी पूर्ण केल्यावर कमिशन्ड ऑफिसरपर्यंत बढती मिळू शकते. भावी बढती आणि पेन्शनचा लाभ मिळावा यासाठी NCO/DCO ची अनेक पदे वाढवण्यात आली आहेत.

## सन्मान आणि पारितोषिकं

अलौकिक शौर्याबद्दल परमवीर चक्र, वीर चक्र आणि अशाप्रकारे अनेक सन्मानजनक पारितोषिकं दिली जातात. लायक सैनिकांसाठी सन्मान्य अधिकारी किंवा पदावर नेमणूक केली जाते. त्यामध्ये भरपूर आर्थिक लाभही होतो.

## पुनर्वसनः

संरक्षण सुरक्षा पोलिस दलात/सरकारी आणि निमसरकारी संस्थामध्ये, राष्ट्रीयीकृत बँकामध्ये पुनर्भरती केली जाते लष्करातील नोकरी संपण्यापूर्वी व्यवसाय प्रशिक्षण, माजी सैनिकांच्या कल्याण योजना वगैरे आहेतच.

पहा आपण योग्य आहात का ?या अलौकिक जीवनात पदार्पण करण्याकरिता पहिलं पाऊल तर उचला.

## पात्रतेकरिता अटीः

## वय आणि शिक्षण

खाली नमूद केल्या आहेत विविध श्रेण्या आणि आवश्यक शिक्षण तसंच वयोमर्यादा :

| श्रेणी | शिक्षण | वय |
|---|---|---|
| क ) सैनिक सामान्य सेवा | एस.एस.एल.सी/मॅट्रीक | १६ ते २१ वर्षे |
| ब ) सैनिक तांत्रिक | एस.एस.एल.सी./मॅट्रीक | १६ ते २३ वर्षे |
| ग ) सैनिक कारकून स्टोअरकिपर तांत्रिक | एस.एस.एल.सी./मॅट्रीक (इंग्रजी व गणित) | १६ ते २३ वर्षे |
| घ ) सैनिक नर्सिंग सहाय्यक | एस.एस.एल.सी./मॅट्रीक (इंग्रजी/ गणित आणि बायोलॉजी सह) | १६ ते २३ वर्षे |
| त ) सैनिक ट्रेडसमन | | |
| अ )सामान्य | नॉनमॅट्रीक | १६ते २० वर्षे |
| ब )विशिष्ट | नॉनमॅट्रीक | १६ ते २५ वर्षे |
| थ ) हवालदार कारकून | बीए /बी.एससी./. बी.कॉम. (इंग्रजी व गणितासह मॅट्रीक) | २० ते २५ वर्षे |
| द ) हवालदार शिक्षक | | |
| वर्ग ‘अ’ | पदवी उत्तर/प्रशिक्षित पदवीधर | २० ते २५ वर्षे |
| वर्ग ‘ब’ | बीए/ बी. एससी. इंग्रजी व गणितासह मॅट्रिक) | २० ते २५ वर्षे |

## अर्ज कसा करावा

अ) सैनिक सामान्य सेवा, सैनिक तांत्रिक, सैनिक कारकून/स्टोअरकिपर टेक्निकल, सैनिक नर्सिंग सहाय्यक, सैनिक ट्रेडसमन याकरिता

अर्जाद्वारा भरती होते. कोरे अर्ज ब्रँच रिक्रुटिंग ऑफिसच्या स्थानिक कचेरीत, झोनल रिक्रुटिंग ऑफिस, जिल्हा अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, रोजगार विनिमय केंद्र इत्यादि ठिकाणी विनामूल्य मिळतील. आपले अर्ज नमुना अर्जाबरहुकूम हस्तरेखित/टंकलिखित करूनही पाठविण्याची उमेदवारांना मुभा आहे. संपूर्ण भरलेला अर्ज उमेदवारांना आपल्या राज्याच्या झोनल रिक्रुटिंग ऑफिसकडे पाठवावा सोबत स्वत:चा पत्ता आणि तिकिट लावलेलं पाकिटही पाठवावं. ॲडिशनल डायरेक्टर जनरल (रिक्रुटिंग) यांच्याकडून पाठवलेल्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही. अर्जाची पोच दिली जाईल, त्यानंतर शैक्षणिक पात्रता, वय, उंची, एन. सी. सी./आय. टी. आय. सर्टिफिकेट, क्रिडा या निकषावर अर्जाची भरती विभागाच्या मुख्यालयात छाननी केली जाईल. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना छाननीकरिता, वैद्यकिय आणि शारीरिक योग्यता चाचणीकरिता, लेखी परीक्षा आणि अंतिम निवडीसाठी बोलवण्यात येईल. दिनांक आणि वेळ पत्रामध्ये नमूद केलेली असेल, विविध राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात असलेल्या झोनल रिक्रूटिंग ऑफिसेसची यादी शेवटी जोडण्यात आलेली आहे. आजी/माजी सैनिकांच्या मुलांच्या अर्जाला प्राधान्य देऊन ती न फेटाळता अशा सर्व मुलांना चाचणीकरिता बोलावलं जाईल.

## APPLICATION FORM FOR ENROLMENT IN THE ARMY

Name of Zone ---
(Candidates eligible to apply to the above ZRO should be Permanent Resident of ---(Jurisdiction by Distt or State as applicable).

**PART I: CHOICE OF ENTRY**

1. Tick off ( ) only one category (each category requires separate application form)

   Soldier General Duty
   Soldier Techical
   Soldier Clerk/Store Keeper Techinical
   Soldier Nursing Assistant
   Soldier Tradesman

**PART II: PERSONAL DATA (FILL IN BLOCK LETTERS)**

2. Name in Full ...
3. Father's Name...
   (Give Rank and unit of father if son of service/Ex-servicemen
4. Permanent Home Address
   village... PO...Tehsil/taluka....
   Distt....State.....pin...
5. Caste/ Tribe...
6. Date of birth...(Attach CTC or Zerox copy of Matriculation Certificate)
7. Height in Cms/inches...

**PART III: QUALIFICATION**

8. Educatiom
   Exams passed Marks obtained/Overall percentage
   1
   2
   3

**Note:** (1) CTC/Zerox copy of the certificate /Marks Sheet must be enclosed (2) Also attach CTC or Zerox copy of the following, if

applicable :
( a ) certificate polytectenic/ITI
( b ) NCC Certificate obtained ( A/B/C/ )
( c ) Driving Licence
( d ) Typing/Stenography Certificate

**PART IV :**

9. I Certify that :
( a ) the above information is true to the best of my knowledge and belief. I am liable to disqualified if incorrect/incomplete/false.
( b ) I am fully aware that recruitment is a FREE service and no money is required to be paid to any agency ( if at any stage it is discovered that I have paid any money to get recruited. I am liable to be disqualified discharged from service ). ( c ) will not claim any compensation for any sustained by me during screening and selection process.

Signature.

**क्षेत्रिय शारीरिक मापदंड**

उमेदवार ज्या क्षेत्रातील आहेत त्या अनुसार आवश्यक असा कमीत कमी शारीरिक मापदंड ठरविण्यात आला आहे.

| क्षेत्र | प्रदेश | कमीत कमी शारीरिक मापदंड | | |
|---|---|---|---|---|
| | | उंची सेंमी. | छाती सेंमी. | वजन किग्रॅ. |
| केंद्रीय क्षेत्र | मध्य प्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र, दादरा नगर हवेली, दमण, दीव. | १६४ | ७७ | ५० |

खास वर्गासाठी / रेजिमेंट / जमाती आणि गटासाठी असलेला विशिष्ट शारीरिक मापदंड खाली नमूद केल्याप्रमाणे.

| वर्ग/जमाती/श्रेणी | किमान शारीरिक मापदंड | | |
|---|---|---|---|
| | उंची सेंमी. | छाती (सेंमी.) | वजन किग्रॅ. |
| वर नमूद केल्याप्रमाणे कमी असलेल्या मान्यताप्राप्त आदिवासी क्षेत्रातले आदिवासी. | १५९ | ७७ | ४८ |
| **पदकार्यानुसार शारीरिकमापदंड** | | | |
| कॉर्प्स ऑफ मिल्टी पोलीस /ब्रिगेड ऑफ द गार्डस | १७० | ७७ | ५० |
| मिडीयम आर्टिलरी | १६७ | ७७ | ५० |
| CLK/GD आणि कॉर्प्स अँड SKT | १५९ | ७७ | ५० |
| सूट- | | | |
| ( अ ) १६ ते १८ वर्ष वयोगटा दरम्यान. | १ | १ | २ |
| ( ब ) राष्ट्रिय /राज्य पातळीवर चमकलेला क्रीडापटू. | २ | ३ | ५ |
| ( क ) सध्या सेवेत असलेल्या किंवा माजी सैनिकाचा एक पुत्र. | २ | १ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| (ड) व्यावसायिक (स्वैंपाकी, न्हावी, धोबी इत्यादी). | २ | १ | २ |

झोनल व शाखा भरती कार्यालये

| ZRO | अंतर्भूत राज्ये/ केंद्रशासित प्रदेश |
|---|---|
| पुणे<br>ZROपुणे<br>HQ रिक्रुटिंग झोन<br>क्रं.३ राजेंद्र सिंगजी रोड,<br>पुणे-४११ ००१ | महाराष्ट्र आणि गुजराथ |

BROs
अहमदाबाद, औरंगाबाद, मुंबई, जामनगर, कोल्हापूर, नागपूर आणि पुणे.



महत्त्वाची सूचना-

दिल्ली कॅन्टमध्ये, एका स्वतंत्र रिक्रूटिंग कचेरी व्यतिरिक्त, देशाचं १२ रिक्रूटिंग झोनमध्ये विभाजन करण्यात आलं आहे. प्रत्येक क्षेत्रात, वर दिल्याप्रमाणे शाखा भरती कचेऱ्या आहेत. भरती आणि मोफत सेवा, निवड योग्य आणि यथार्थ आहे. कुठल्याही शिफारसीची आवश्यकता नाही. फक्त आपली पात्रता आवश्यक आहे. कुठल्याही गैरमार्गानं प्रवेश केलेल्या व्यक्तींना सेवेच्या कुठल्याही टप्प्यात लष्करी कायद्याखाली शिक्षा होऊ शकते. इतर माहितीसाठी निकटच्या भरती कार्यालयाशी संपर्क साधा. ही सूचना केवळ आपल्या माहितीसाठी आहे. त्याचा अधिकृत उल्लेख करू नये.




# विविध अभ्यासक्रमांची माहिती

## संकलन: ग.शां.पंडित

| अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता | वयोमर्यादा | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षण केंद्र | फायदे/सवलती |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ग्रामीण शेती कला (माध्यम: मराठी) | सातवी उत्तीर्ण | १८ ते २२ | १ वर्ष | i) ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर मांजरी फार्म, मांजरी पुणे, ii) चंद्रपूर | i) सुतारकाम व अवजारे तयार करता येतात. ii) स्वत:चा व्यवसाय करता येतो. |
| २) | पोलीस भरती | कमीत कमी ८वी उत्तीर्ण. उंची: १६५ सें.मी., छाती: ७९ सें.मी., फुगवून: ८४ सें.मी. | १८ ते २८ मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम | साधारण १ वर्ष | ज्यावेळी भरती करायची असेल त्यावेळी निश्चित जागा एंप्लॉयमेंट एक्स्चेंज, समाज कल्याण, आदिवासी कल्याण संस्था यांना सांगितल्या जातात व त्यांच्या तर्फेच त्या ठिकाणी नाव नोंदणी केली असेल तर | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उमेदवारांना बोलावले जाते. | सरकारी नोकरी. |
| ३ ) | रेशीम उद्योग ( पूर्ण वेळ ) | शेतकरी असणे जरूरीचे व तुतीची झाडे असावीत. | अट नाही. | दोन महिने | १ )रेशीम उद्योग केंद्र २४ब,पुणे-मुंबई रस्ता,दुग्ध केंद्रासमोर, पुणे.२ )कोल्हापूर ३ ) नाशिक ४ )औरंगाबाद ५ )परभणी ६ )यवतमाळ | विद्यावेतन: २०० रू.द.म. हॉस्टेल मध्ये राहण्याची सोय. स्वयंरोजगारासाठी उपयुक्त. |
| ४ ) | कर्तन व शिवणशास्त्र | १०वी अनुत्तीर्ण | १५ ते २५ मा.व.२८ पर्यंत शिथिलक्षम | १ वर्ष | औंध प्रशिक्षण संस्था औंध पुणे- ७. याशिवाय प्रत्येक जिल्ह्याच्या ITIमध्ये. | नोकरी व विशेषत: स्वत:चा व्यवसाय काढता येतो. |
| ५ ) | सुतारकाम | १०वी अनुत्तीर्ण | १५ ते २५,मा.व.२८ पर्यंत | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्था औंध पुणे-७. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यातील आय टी आय संस्थांमध्ये | कॉंट्रॅक्टर, प्रमोटर्स, बिल्डर्स कडे नोकरी मिळते. इंटरियर डेकोरेशनचे ( सांगितल्या प्रमाणे ) काम करता येते. स्वत:चा व्यवसाय. |
| ६ ) | गव्हर्मेंट कमर्शिअल डिप्लोमा (G.C.D.) | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | माध्यमः मराठी/इंग्रजी | दहावी उत्तीर्ण | अट नाही. | १ वर्ष | १) डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, जिजामाता बागेजवळ, पुणे-२, २) मुंबई, ३) कोल्हापूर | शासकीय निमशासकीय सहकारी बँका, खाजगी संस्थांमध्ये नोकरी. ही परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी आय सी डब्ल्यु ए, डी.बी.एम., सी.ए.ची प्रवेश परीक्षा इ. परीक्षा देता येतात. कपडे बनवण्याचा उद्योग करणाऱ्या लहान मोठ्या कंपन्यात, टेलरकडे नोकरी मिळू शकते. स्वतंत्र व्यवसाय. |
| ७) | ड्रेस मेकिंग अँड डिझायनिंग | दहावी उत्तीर्ण | -- | -- | हेगडे टेलरिंग इन्स्टिट्यूट पुणे, २) प्रेमलीला विठ्ठलदास पॉलिटेक्निक जुहू मुंबई, ३) सोफिया कॉलेज वसंतकुमार सोमाणी पॉलिटेक्निक मुंबई. | |
| ८) | ट्रॅक्टर दुरूस्ती | आठवी उत्तीर्ण | अट नाही. | १वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्था जळगाव, कराड, सातारा, नागपूर, चंद्रपूर, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, खामगाव, अकोले | |
| ९) | कुक्कुट पालन | १) साक्षर असणे | अट नाही | १ महिना, | १) मध्यवर्ती अंडी | स्वतंत्र व्यवसाय, |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (दोन कोर्स) | महत्त्वाचे, २ )दहावी उत्तीर्ण | १८ वर्षे पूर्ण | ६ महिने | उबवणूक केंद्र. खडकी पुणे, कोल्हापूर २ ) बारामती, सातारा, इत्यादी खाजगी संस्थांमध्ये सुध्दा प्रशिक्षण दिले जाते | पोल्ट्रीफार्म मध्ये नोकरी. |
| १० ) | ट्रॅव्हल एजन्सी | दहावी उत्तीर्ण., इंग्रजी, हिंदी भाषेवर प्रभुत्व, परदेशी भाषा येणाऱ्यांना प्राधान्य | ३० वर्षे | -- | वसंतकुमार सोमाणी पॉलिटेक्निक मुंबई. | नोकरी |
| ११ ) | पशुधन पर्यवेक्षक | दहावी उत्तीर्ण | अट नाही. | १ वर्ष | महात्मा फुले कृषी विद्यापीठा तर्फे धुळे, कोल्हापूर, मांजरी ( पुणे ) येथे चालवला जातो. | विद्यावेतन दिले जाते. पशूवैद्यक खात्यात नोकरी, खाजगी पशूवैद्यक डॉक्टर म्हणून मान्यता., दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांना सल्ला देता येतो. |
| १२ ) | गवंडी ( बांधकाम कारागीर ) | दहावी किंवा तुल्य परीक्षा अनुत्तीर्ण | -- | १ वर्ष | ITI औंध पुणे | घर, बिल्डिंग बांधकाम करता येते. |
| १३ ) | आरेखक ( स्थापत्य ) | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५, | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ( सिव्हिल ड्राफ्ट्समन ) | मा.व.२८ पर्यंत | | संस्था पुणे, मुंबई, नाशिक | बांधकाम, खाते, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, धुळे. | नगरपालिका बिल्डर्सकडे, आर्किटेक्टकडे नोकरी मिळू शकते. |
| १४ ) | आरेखक ( यांत्रिकी ) ( मेकॅनिकल ड्राफ्ट्समन ) | दहावी उत्तीर्ण | १६ते२५, मा.व.२८ पर्यंत | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे. | कारखान्यात ड्राफ्ट्समन म्हणून नोकरी मिळू शकते. |
| १५ ) | यंत्रकारागीर ( घर्षक ) ( ग्राइंडर ) | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५ | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे | कारखान्यात ग्राइंडर म्हणून नोकरी मिळू शकते. |
| १६ ) | इलेक्ट्रॉनिक्स | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५, मा.व.२८पर्यंत | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे. | स्वतंत्र व्यवसाय नोकरी मिळू शकते. |
| १७ ) | मेकॅनिक ( रेडिओ, | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ मा.व. | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | टी.व्ही.) | | २८पर्यंत | | संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे | स्वतंत्र व्यवसायनोकरी मिळू शकते.. |
| १८) | मेकॅनिक ( मोटरगाडी ) | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५,मा.व.२८पर्यंत | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे. | स्वनंत्र व्यवसाय नोकरी मिळू शकते. |
| १९) | जोडारी ( फिटर ) | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५ मा.व.२८पर्यंत | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे. | स्वतंत्र व्यवसाय नोकरी मिळू शकते. |
| २०) | कातारी ( टर्नर ) | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५ मा.व.२८पर्यंत | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे. | स्वतंत्र व्यवसाय नोकरी मिळू शकते. |
| २१) | पत्रे कारागीर | दहावी उत्तीर्ण | १६ ते २५ मा.व.२८पर्यंत | १ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण ,संस्था पुणे, मुंबई | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती, धुळे | स्वतंत्र व्यवसाय नोकरी मिळू शकते. |
| २२) | मार्केटिंग ॲन्ड सेल्समनशिप | दहावी उत्तीर्ण | अट नाही | २ वर्षे | पुणे, मंगळवेढा, पंढरपूर, वर्धा, नागपूर, सांगली कोल्हापूर | सेल्समन म्हणून नोकरी मिळते. |
| २३) | क्रश ॲन्ड प्री स्कूल मॅनेजमेन्ट ( पाळणाघर व पूर्व शालेय व्यवस्थापन ) ( फक्त मुलींसाठी ) | दहावी उत्तीर्ण | अट नाही | २ वर्षे | १ )कॅम्प एज्युकेशन सोसायटी, पुणे, २ )देवपूर ( धुळे ) ३ )कोल्हापूर ४ )मुंबई | स्वत:चे पाळणाघर काढता येते. नोकरी मिळते. |
| २४) | इन्स्टिटयूशनल हाऊसकीपिंग ( माध्यम मराठी ) | दहावी उत्तीर्ण | अट नाही | २ वर्षे | १ )कॅम्प एज्यूकेशन, पुणे. २ )औरंगाबाद ३ )चांदूर रेल्वे ४ )नागपूर | स्वतंत्र व्यवसाय किंवा हॉटेलमध्ये चांगली नोकरी, कोर्स पूर्ण झाल्यावर अप्रेंटिस म्हणून काम रू.४०० द.म. मिळते. |
| २५) | कार्यालयीन व्यवस्थापन | दहावी उत्तीर्ण | अट नाही | २ वर्षे | १ ) एस. एन. डी. टी.पुणे २ )नाशिक ३ )सटाणा ४ )सिन्नर ५ )जालना ६ )बीड | नोकरी मिळू शकते. |
| २६) | वेल्डर ( गॅस, वीज ) | दहावी अनुत्तीर्ण | १६ते२५ | १ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण. | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती. | व्यवसाय, नोकरी |
| २७ ) | नळ कारागीर ( प्लंबर ) | दहावी अनुत्तीर्ण | १६ते२५ | १ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती | व्यवसाय, नोकरी |
| २८ ) | वायरमन | दहावी अनुत्तीर्ण | १६ते२५ | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती. | व्यवसाय, नोकरी |
| २९ ) | रंगारी ( जनरल ) | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती. | व्यवसाय, नोकरी |
| ३० ) | लघुलेखन ( इंग्रजी ) ( मराठी ) | दहावी उत्तीर्ण | १ वर्षे | | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती. | स्टेनोग्राफर म्हणून नोकरी मिळते |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ ) | फोर्जर ॲन्ड हिट ट्रीटर | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ | १ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती. | व्यवसाय, नोकरी. |
| ३२ ) | मेकॅनिक ( डिझेल ) | दहावी अनुत्तीर्ण | १६ते२५ | १ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती. | व्यवसाय, नोकरी |
| ३३ ) | डिप्लोमा इन एज्यूकेशन ( डी.एड्) | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ | २ वर्षे | महाराष्ट्रातील पुणे, सातारा, रायगड, नाशिक, जव्हार ( ठाणे ), धुळे, उद्गीर ( लातूर ), अकोला, अमरावती, बुलढाणा, नागापूर, भंडारा, चंद्रपूर इत्यादि अध्यापक विद्यालये | प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी मिळते. |
| ३४ ) | ग्रामसेवक / सेविका | दहावी उत्तीर्ण | १८ नंतर पुढे | १ वर्षे | १ )ग्रामसेवक / सेविका प्रशिक्षण केंद्र, मांजरी फार्म, पुणे २ )परभणी | ग्रामीण भागात ग्रामसेवक / सेविका म्हणून नोकरी मिळते |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ ) | मेकॅनिक ( रेफ्रिजरेशन ॲन्ड एअरकंडिशनींग ) | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ | २ वर्षे | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुणे, धुळे, जळगांव, मुंबई, रत्नागिरी, नाशिक, | व्यवसाय नोकरी |
| ३६ ) | कुकरी ( माध्यम: मराठी, इंग्रजी ) | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ | अल्प मुदत | १ )श्रीमती सी.बी. शहा महाविद्यालय, सांगली. २ )न्यू इंग्लीश ज्यू. कॉलेज वर्धा. ३ )मुंबई नगर, कोल्हापूर, वर्धा, बुलढाणा इ. | नोकरी |
| ३७ ) | हॉर्टिकल्चर ( माध्यम: मराठी, इंग्रजी ) | दहावी उत्तीर्ण | १६ते२५ | अल्प मुदत | १ )सोनोपंत दांडेकर आर्टस ॲन्ड सायन्स कॉलेज ( ज्यू. ) पालघर २ )कणकवली ३ )सी.टी.बोरा. पुणे. ४ ) आर. डी. एम. पी.ज्यू कॉलेज धुळे | नोकरी |
| ३८ ) | फिल्डमन ( माध्यम: मराठी ) | दहावी उत्तीर्ण | १८ ते ३५ | ३ महिने | मधुमक्षिका पालन उद्योग, खादी ग्रामोद्योग मंडळ, विद्यापीठ मार्ग, पुणे-५. | नोकरी, व्यवसाय विद्यावेतन २५०द.म. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३९ ) | बी.एस्सी. ॲग्रीकल्चर | बारावी ( शास्त्र ) उत्तीर्ण | १८चे पुढे | ३ वर्षे | ॲग्रीकल्चर कॉलेज, पुणे, कोल्हापूर, धुळे, नागपूर, परभणी, दापोली. | ॲग्रीकल्चर ऑफीसर, कृषी रसायन कंपन्या शेतीविषयक कार्यालये इ.मध्ये नोकरी. |
| ४० ) | डिप्लोमा कोर्स जनरल नर्सिंग ॲन्ड फिडवाईफ्री ( माध्यम:मराठी व इंग्रजी ) विशेषत: मुलींसाठी व संपूर्ण महाराष्ट्रात फक्त १० मुलांना प्रवेश. | बारावी उत्तीर्ण ( कोणत्याही शाखेचा ) | १७ते३० | ३ वर्षे | १ ) ससून हॉस्पिटल, पुणे. २ ) जे. जे. मुंबई. ३ ) मेडिकल कॉलेज, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, अकोला, कऱ्हाड, नाशिक, जळगाव, धुळे, सातारा, ठाणे, नगर. | हॉस्पिटल्स व आरोग्य केंद्रामध्ये नोकरी मिळते. विद्यावेतन मिळते. |
| ४१ ) | हातमाग उद्योग प्रशिक्षण ( माध्यम:इंग्रजी, हिंदी ) | बारावी उत्तीर्ण ( शास्त्र शाखा ) | १८ते२५ | १ वर्षे | अर्ज करण्याचा पत्ता: संचालक, हातकागद उद्योग, खादी ग्रामोद्योग आयोग विलेपार्ले ( प. ) ३, इर्ला रस्ता, मुंबई ४०००५६. | स्वत:चा व्यवसाय सुरू करता येतो. विद्यावेतन २५० रूपये द.म. मिळते. |
| ४२ ) | बी.ए.एम.एस. ( आयुर्वेदाचार्य ) | बारावी ( फिजिक्स, | १८चे पुढे | ४ वर्षे त्यानंतर | आयुर्वेद महाविद्यालय पुणे, . | विद्यावेतन रू.५००/- दरमहा मिळते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केमिस्ट्री, बायोलॉजी विषय घेऊन ) उत्तीर्ण फी रू.९०० | | एका वर्षाचे प्रशिक्षण घ्यावे लागते. | नगर, नाशिक, शिरपूर, नागपूर, अकोला, नांदेड, उस्मानाबाद, मुंबई ( धुळे ), सातारा, सांगली | |
| ४३ ) | वृत्तपत्र- विद्यापदविका | बारावी उत्तीर्ण फी रू,५५०/- | अट नाही. | ६ महिने | रानडे इंस्टिटयूट, पुणे-४. औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, मुंबई, नागपूर. | वृत्तपत्रात नोकरी मिळते. |

**अल्प मुदतीचे**
**अभ्यासक्रम**

| | अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता | वयोमर्यादा | कालावधी | प्रशिक्षण केंद्र | सवलती / फायदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | डिप्लोमा कोर्स इन व्हॅक्सिनेशन | दहावी उत्तीर्ण | -- | ३ महिने | १)सुपरिटेडेन्ट ऑफ व्हॅक्सिनेशन, बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन पटेल-एल्फिन्स्टन मार्ग, मुंबई-१२ | नोकरी लवकर मिळू शकते. |
| २) | एक्स-रे टेक्निशियन | दहावी उत्तीर्ण | -- | ६ ते ९ महिने | १)बी.जे.मेडिकल कॉलेज, पुणे. २) मिरज मेडिकल कॉलेज, मिरज.३) मेडिकल कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नागपूर.४) ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई. | नोकरी, व्यवसाय |
| ३) | लेप्रसी टेक्निशियन | दहावी उत्तीर्ण | -- | ६ महिने | १)लेप्रसी ट्रेनिंग सेंटर, वैराग, सोलापूर.२)लेप्रसी ट्रेनिंग सेंटर,गोंदिया, भंडारा. | -- |
| ४) | वनरक्षक | सातवी पास | १८ते२५ | ६ महिने | वनप्रशिक्षण | नोकरी व रु. १००/- द.म. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विद्यालय, भंडारा<br>रोड,४४१९०५, जि.<br>भंडारा | शिष्यवृत्ती दिली जाते. |
| ५) | वनपाल | दहावी उत्तीर्ण | १७ते२५ | ६ महिने | वनप्रशिक्षण विद्यालय,<br>भंडारा रोड,<br>४४१९०५,जि. भंडारा | नोकरी व रु.१००/-द.म.<br>शिष्यवृत्ती दिली जाते. |
| ६) | वनमापक | दहावी उत्तीर्ण | १८ते२५ | ४ महिने | वनप्रशिक्षण विद्यालय,<br>भंडारा रोड,<br>४४१९०५,जि, भंडारा. | नोकरी व रू.१००/- द. म. |
| ७) | वनपरिक्षेत्र लिपिक | दहावी उत्तीर्ण | १८ते२५ | २महिने | वनप्रशिक्षण विद्यालय<br>,जि.भंडारा,<br>भंडारा रोड, ४४१९०५, | शिष्यवृत्ती दिली जाते.<br>नोकरी व रू.१००<br>. म.शिष्यवृत्ती<br>दिली जाते. |

# स्वयंस्फूर्त संस्था चालकांच्या सभेचे इतिवृत्त

## जनार्दन पोहऱ्या वळवी.

दिनांक ३१.८.१९८७ रोजी या आदिवासी विकास, म. र. नाशिक, महोदयांच्या उपस्थितीत स्वयंस्फूर्त संस्था चालकांची सभा आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीमध्ये खालील मुद्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली होती.

१) **निर्वाह भत्ता:-** प्रचलीत नियमानुसार स्वयंस्फूर्त संस्था चालकांना निर्वाह भत्त्यापोटी मुला मागे ९५/- रूपये व मुली मागे रू १००/- असा निर्वाह भत्ता दिला जातो. मात्र हा निर्वाह भत्ता सध्याची महागाई लक्षांत घेता व किंमतीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे हे दर कमी पडतात असे संस्था प्रमुखांनी चर्चेमध्ये नमूद केले असता संचालक महोदयांनी असे स्पष्ट केले की, किती टक्के आर्थिक बोजा संस्था प्रमुख पेलवू शकतात व किती टक्के खर्च शासनाने सोसावा. याबाबत चर्चा केली असता असा निष्कर्ष काढला की, शासनाने सर्व अनुज्ञेय बाबींपोटी ९० टक्के खर्च संस्था चालकांना देण्यात यावा. व १० टक्के खर्च संबंधीत संस्थेने सोसावा. असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

२) **अनुदानीत आश्रम शाळा व पोस्ट बेसिक आश्रम शाळा वसतिगृहातील व बाहेरील डे-स्कॉलर मुला-मुलींचे संख्येत वाढ करणे बाबत:-** सदर मुद्या बाबत संचालक महोदयांनी स्पष्ट केले की, ज्या प्रमाणे शासकीय आश्रम शाळेमध्ये प्रत्येक वर्गात ३६+५ या मानकानुसार संख्या असते त्याप्रमाणे प्रत्येक वर्गामध्ये जागांची क्षमता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देणेबाबतचा प्रस्तव शासनास सादर करण्यात येईल असे नमुद केले असता या मुद्यास सर्व संस्था चालकांनी मान्यता दिली.

३) **नवीन इमारत अनुदान व इमारत दुरूस्ती बाबत:-** सदर मुद्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्वसाधारणपणे एखादी नवीन इमारत बांधावयाची असल्यास बांधकामासाठी रु ९ते १० लाख पर्यंत खर्च येतो. यामध्ये प्राथमिक व माध्यमिक दोन्ही शाळांचा अंतर्भाव आहे. ह्या रकमेचे अंदाजपत्रक व आराखडा हे कार्यकारी अभियंता यांचेकडून मंजूर करून घेउन ते सादर करावे. ह्या पैकी २० टक्के रक्कम संस्थेने सोसावी व ८० टक्के रक्कम ही संस्थेला शासनामार्फत मिळणे विषयी सर्व संस्था प्रमुखांनी मागणी केली व तशी शिफारस शासनास केली जाईल असे संचालक महोदयांनी स्पष्ट केले.

इमारतीच्या विशेष दुरूस्ती बाबत शासनाच्या नॉर्मस् प्रमाणे संस्था प्रमुखांना रक्कम देण्याची कार्यवाही केली जाईल.

४) **अधीक्षकांच्या नेमणूका वेतन व भविष्य निधी बाबत:-** प्राथमिक व पोस्ट बेसिक आश्रम शाळेसाठी ७५ विद्यार्थी संख्या वाढल्यास दोन अधीक्षकांची पदे अनुज्ञेय आहेत. सदर मुद्याबाबत संस्था प्रमुखांशी विचारविनिमय करण्यांत आला असता या पूर्वी प्राथमिक शाळेस व पोस्ट बेसिक आश्रम शाळेस १ अशी दोन

अधीक्षकांची पदे असावीत असा सूर सर्व संस्था चालकांचा होता. या बाबत शासनाचे स्पष्ट आदेश घेऊन त्यानंतर सर्व संस्था प्रमुखांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात येईल असे ठरविण्यांत आले.

५ ) **५ वी ते ७ वी पर्वंतचे वर्ग माध्यमिक विभागास कायम स्वरूपी जोडणे बाबत:** प्रचलीत नियमानुसार १ ली ते ७वी इयत्ता पर्यंत १२० विद्यार्थी व ८ वी ते ९ वी पर्येत १२० विद्यार्थी असे एकूण २४० विद्यार्थ्यांवर अनुदान देण्यात येते. ५ वी ते ७ वी पर्यंतचे वर्ग शैक्षणिक बाबींसाठी पोस्ट बेसिक आश्रम शाळेस जोडणे संयुक्तिक आहे व त्या नुसार सर्व संस्था चालकांना कळविण्यात आले. मात्र इयत्ता १ ते ४ पर्यंत आश्रम शाळेस १२० विद्यार्थी पोटी अनुदान अनुज्ञेय नाही. याची कल्पना देण्यात आली. वसतिगृहातील अनुदानाच्या सोयीसाठी १ ते ७ हे प्रमाण योग्य आहे व ८,९,१० या वर्गाच्या वसतिगृहातील मान्य संख्या १२० राहील.

६ ) **पोस्ट बेसिक आश्रम शाळांना स्वच्छतागृहे, स्नानगृहे व मुताऱ्या इत्यादी सुविधा पुरविणे बाबत:-** सदर सुविधा उपलब्ध करणे बाबत रूपये ४०० अनुदान देण्यात येते. या मध्ये वाढ करण्याचा संकलीत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल. मात्र या बाबींची सुविधा प्रत्येक संस्था प्रमुखांनी करावी. विशेष करून मुलींचे स्नानगृह, मुतारी इत्यादी सुविधा तात्पुरत्या स्वरूपात का होईना पण त्या सुविधा त्वरीत करण्यांत याव्यात असे सर्वानुमते ठरले.

७ ) **पोस्ट बेसिक आश्रम शाळेस कनिष्ठ महाविद्यालय उघडणे बाबत:-**( इयत्ता ११वी व१२ वी ):-आश्रम शाळेमध्ये कनिष्ठ महाविद्यालय उघडण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे. कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याचे शासनाचे धोरण आहे. या धोरणानुसार शासनाचे आदेश आल्यानंतरच ही योजना कार्यान्वित होईल असे संचालक महोदयांनी प्रतिपादन पेले.

८ ) **संस्थेचे ऑडीटेड स्टेटमेंट नियमीत पाठविणे बाबत:-** या बाबत सर्व संस्था प्रमुखांनी ऑडीटेड स्टेटमेंट वेळेवर पाठविण्यात येईल असे मान्य केले. तसेच कार्यकारी मंडळाची वार्षिक सभेचे वृत्तांत व वार्षिक अहवाल सादर करणे बाबत संस्था प्रमुखांनी मान्य केले व या बाबत कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही.

९ )**शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी बाबत:-** शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधी बाबत विचार करण्यांत आला असता ठाणे,गडचिरोली या ठिकाणी पे-युनिट जिल्हा परिषदेमार्फत भविष्य निर्वाह निधीच्या नोंदी ठेवल्या जात नाही असे नमुद केले असता या बाबत संचालनालयामार्फत त्वरीत कार्यवाही करण्यात येईल व संबंधीत जिल्हा शिक्षण आधिकारी, माध्यमिक विभाग,पे-युनिट यांना कळविण्यात येईल. तसेच प्राथमिक विभागाच्या शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीच्या नोंदी व्यवस्थित ठेवणे बाबत आदिवासी विकास आधिकारी यांना कळविण्यात टेईल.

१० ) **पिण्याच्या पाण्या बाबत:-** काही आश्रम शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. ही टंचाई दूर होण्यासाठी पिण्याच्या पाण्याची योजना ही जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते.

ही योजना शासकीय आश्रम शाळेत व अनुदानीत आश्रम शाळांना लागू करणेबाबत व त्या जिल्ह्यामधील शासकीय व अनुदानीत आश्रम शाळांचा समावेश करणेसाठी संबंधीत मुख्य कार्यकारी आधिकारी यांना अर्थ शासकीय पत्राने कळविण्यात येईल, असे संचालक महोदयांनी सांगितले.

११) **शिक्षकांच्या पगाराबाबत:-** शिक्षकांच्या पगाराबाबत एकसूत्रीपणा होणे बाबत विचारविनिमय करण्यात आला असता अनुदानीत आश्रम शाळा गोटेघरवाफा येथे सर्व शिक्षकांचा पगार कॅशने देण्यात येतो. ही पध्दत बंद करण्यास संबंधीत आदिवासी विकास आधिकाऱ्यांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात येईल.

१२) **प्रवेशाबाबत:-** प्रवेशाबाबत अनुदानीत आश्रम शाळांमध्ये मुलांना प्रवेश देणे बाबत सदर बैठकीमध्ये विचारविनिमय करण्यात आला. संचालक महोदयांनी खालील बाबी स्पष्ट केल्या.

१) गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

२) आदिवासी जमातीत शिक्षणाचे मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अल्प असल्यामुळे मुलींच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी मुलींना प्रथम शाळेमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य देण्यात यावे.

३)काही जमातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे. उदा. कातकरी, कालोम, माडीया, गोंड या अतीमागास आदिवासी विद्यार्थ्यांना विशेष करून व त्यांचे पालकांना काही प्रोत्साहनपर देणगी देऊन त्यांचे मुलांना शैक्षणिक गोडी निर्माण करण्यासाठी उत्तेजीत करावे व प्राधान्याने प्रवेश द्यावा.

१३) **सन १९८७-८८ मधील एस.एस.सी. चा निकाल उंचविणे बाबत:-** मा. संचालकांनी शिक्षण हे आदिवासी जमातीचे उन्नतीचे व उत्कर्षाचे प्रमुख साधन आहे, याची जाणीव संस्था प्रमुखांनी करून दिली. जो पर्यंत शैक्षणिक विकास खऱ्या अर्थाने होणार नाही तो पर्यंत आदिवासी जमात ही जीवनामध्ये प्रगती करू शकणार नाही. या बाबत शासकीय आश्रम शाळांना निकाल उंचविण्यासाठी जी पावले उचलली आहेत त्याचा प्रामुख्याने उल्लेख करून असे प्रतिपादन केले की, एस.एस.सी. परिक्षेला बसणारे ,एकूण मुले-मुली त्यामधे निश्चित पास होणारे मुले-मुली, खास प्रयत्न करून पास होणारी मुले-मुली असे ३ प्रकारे वर्गीकरण करून मुलांची शैक्षणिक गुणवत्ता दर्जा लक्षात घेऊन त्यांचे निकालाचे प्रमाण किती टक्के होऊ शकेल याचा आढावे घेतला. अशाच प्रकारचा प्रयत्न जर अनुदानीत आश्रम शाळांमध्ये करण्यात आला तर शिक्षकांना व मुख्याध्यापकांना एक दिशा मिळेल व ते त्याचे कार्यक्षेत्रात चांगले काम करून दाखवितील व एस.एस. सी. परिक्षेचा निकाल वाढवितील.

१४) ज्या विद्यार्थ्यांची वार्षिक उपस्थिती ही ७५ टक्के पेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना परिक्षेस बसू न देणे व त्या अनुषंगाने त्यांचे पालकांना समज देणे गरजेचे आहे. काही विद्यार्थी हे इंग्रजीमध्ये कच्चे आहेत असे दिसून आले असता या बाबत शिक्षकांनी परिश्रम घेतले तर विद्यार्थ्यांना ३५ टक्के मार्क मिळणे अवघड बाब आहे असे वाटत नाही.

१५) जर एखाद्या शिक्षकाचा निकाल २० टक्के पेक्षा कमी लागला असेल तर संस्था प्रमुखांनी शिस्तभंगाची कार्यवाही करून त्याला कमी करण्यांत येऊ नये अशी कारवाई करावी. त्याचा निकाल ६० टक्केचे वर असेल त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्याची योजनाही घेणे योग्य आहे. आवश्यक मुद्याविषयी प्रस्ताव सादर केला जाईल.

# पुस्तक परीक्षणः-

## " वैदर्भीय आदिवासीः जीवन आणि संस्कृति "

### जॉन गायकवाड

डॉ.सौ.शैलजा देवगांवकर (वरोरा, जि.चंद्रपूर) यांच्या " वैदर्भीय आदिवासी जीवन आणि संस्कृति " या पुस्तकात, त्यांच्या वेळोवेळी प्रसिध्द झालेल्या आदिम जीवनावरील विविध लेखांचे संकलन आढळते.

या पुस्तकात प्रामुख्याने- (१) माडिया गोंड, परधान, कोरकू, कोरवा, गोंड-गोवारी, माना, हलबा या जमातींबद्दल थोडक्यात वर्णन केलेले आढळते.

(२) वरील जमातींच्या वर्णना व्यतिरिक्त माडिया गोंड, परधान, कोरकू व कोरवा जमातींमधील लोकगीते, नृत्यगीते, विवाह समयीची गीते,लोककथा (विशेषतः मानव निर्मिती बाबतच्या) विशिष्ट उत्सव प्रसंगी गाण्यात येणारी गीते, वैशिष्टयपूर्ण नृत्ये, वैशिष्टयपूर्ण वाद्ये या संदर्भातील माहिती देण्यात आली आहे.

(३) आदिवासींमधील कला, शिकार याबाबत माहिती देण्यात आली आहे.

(४) युवागृहे व विवाहाचे प्रकार या संदर्भातही या पुस्तकात वर्णन आढळते.

(५) आदिवासींमधील दैवते, धार्मिक विधी, विवाह विधी, वैशिष्टयपूर्ण पूजा, अंत्यसंस्कार, जादू विद्या व भगत या भरपूर जिज्ञासा असलेल्या विषयावरही या पुस्तकात विवेचन करण्यात आले आहे.

(६) वरील विषयांव्यतिरिक्त-

माडिया जमातीतील स्त्रियांची जीवनपध्दती व वैशिष्टये

आदिवासी स्त्रियांची आभुषणे.

आदिवासींतील वेठबिगार

आदिवासी विकास आणि नवी आव्हाने

- या विषयांवरही या पुस्तकात लेख आहेत.

(७) बंजारा या भटक्या जमातीचे वर्णन एका लेखाद्वारे करण्यात आले आहे.

गोवारी, गोंड-गोवारी व माना या वादग्रस्त जाती/जमाती बाबतचे लेख या पुस्तकात घेताना मात्र लेखिकेने काही खबरदारी घेणे आवश्यक होते. या जमाती संदर्भातील सद्य स्थिती आदिवासी जमाती व बिगर आदिवासी जाती मधील पूर्ण/अंशतः वादग्रस्त नामसादृश्य लेखिकेने स्पष्टपणे नमूद करणे नितांत आवश्यक होते. केवळ काही सांस्कृतिक बाबींमधील साधर्म्यावरून गोवारी व गोंड-गोवारी यांच्यात वांशिक साधर्म्य आहे, असे म्हणणे निश्चितच अयोग्य आहे. तसेच गोवारी, गोंड-गोवारी व माना यांचे वर्णन करतांना लेखिकेने मनुष्य देहमिती विषयी मापने (anthropometric measurements) दिली आहेत ,केवळ त्यावरून या जाती/जमातींचे इतरांशी/आपापसातील वांशिक साधर्म्य सिध्द होऊ शकत नाही. लेखिकेने या संदर्भात जी मापने (aathropometric measurements)दिली आहेत ती अत्यंत मोघम स्वरूपात व अशास्त्रीय पध्दतीने दिली असल्याने वांशिक साधर्म्य ठरविण्यास ती निश्चितच निर्णायक नाहीत. गोवारींची सांस्कृतिक वाटचाल या लेखात

तर गोंड गोवारी (आदिवासी) व गोवारी जात (बिगर आदिवासी) यांचे वर्णन एकत्रित देऊन एक भ्रामक गुंतागुंत झाल्याचे दिसून येते.

विदर्भात गोंड-गोवारी व्यतिरीक्त गोवारी नावाची जात (बिगर आदिवासी) आहे व या जातीत गाय गोवारी, दूध गोवारी, इंगा गोवारी, गवारी इ. उपजाती आहेत. अर्थात गोवारी जातीचा (गाय गोवारी, इंगा गोवारी, दूध गोवारी, गयारी- या उपजातींसह) गोंड गोवारी बरोबर कसल्याही प्रकारे सामाजिक, सांस्कृतिक व आप्तसंबंध (Socio cultural affinity and ethnic linkage) नाहीत याची नोंद घेणे नितांत आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे विदर्भात गोंड जमातीतील माना या उपजमाती व्यतिरीक्त माना नावाची एक स्वतंत्र जात (बिगर आदिवासी) आहे ही वस्तुस्थिती सर्वोच्च न्यायालयातही सिध्द झालेली आहे. माना या जातीचा (माने, मानी, माना-कुणबी, रवद माना, बडकई माना- या उपजातींसह) गोंड जमाती अंतर्गत असलेल्या माना या उपजमातीबरोबर कसल्याही प्रकारे सामाजिक सांस्कृतिक व आप्तसंबंध(Social cultural affinity and ethnic linkage)नाहीत याची नोंद घेणे नितांत आवश्यक आहे.)

अर्थात हलबा आणि हलबा कोष्टी बाबतच्या लेखात मात्र योग्य ती खबरदारी घेण्यात आली आहे व ही बाब निश्चितच प्रशंसनीय आहे.

अर्थात लेखिकेने या संदर्भात जे वर्णन केले आहे त्यावरून हे स्पष्ट होते की, त्यांनी या जमाती संदर्भात सखोल अशी प्रत्यक्ष पाहणी केलेली नाही.

आदिवासी विकास आणि नवी आव्हाने- हा लेख निश्चितच चांगला असून भरती (recruitment)बाबत जी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे ती अगदी रास्त व योग्य असून, हे एक निर्विवाद सत्य आहे. त्याचप्रमाणे विकास प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचे विवेचनही या लेखात करण्यात आले आहे.

या पुस्तकात लेखिकेने संदर्भ ग्रंथ सूची दिली असती तर ते निश्चितच चांगले झाले असते.

तसेच सर्व तीस लेखांचे संकलन आहे तसे न देता, पुस्तकांचा बहुतांशी भाग म्हणजे आदिवासींची लोकगीते, लोक नृत्ये, लोककथा इत्यादी बाबत सर्व माहिती विषय निहाय व जमात निहाय देऊन हे पुस्तक अधिक सुसुत्र करण्यास निश्चितच वाव होता असे वाटते.

पुणे विद्यापीठातील मानवशास्त्र विभागाचे प्राध्यापक रा.के.मुटाटकर यांचा पुरस्कार या पुस्तकास लाभला आहे. प्रा.मुटाटकर यांनी खोट्या आदिवासींचा आवर्जून उल्लेख केला आहे, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. आदिवासी विकास विषयक विविध क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी व त्याचप्रमाणे आदिम जीवनाची व संस्कृतिची माहिती करून घेऊ ईच्छिणाऱ्या अभ्यासू व जिज्ञासू वाचकासही हे पुस्तक निश्चितच उपयुक्त आहे.

हे पुस्तक नागपूर येथील श्री.मंगेश प्रकाशन या संस्थेमार्फत १९८९ मध्ये प्रकाशित झाले आहे.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची
## इतिहासावरील प्रकाशने

| अ.क्र. | प्रकाशनाचे नाव | लेखक/अनुवादक | किंमत रू. |
| --- | --- | --- | --- |
| १) | महाराष्ट्रातील दप्तरखाने ( सुधारीत द्वितीय आवृत्ती ) | डॉ.वि.गो.खोबरेकर | ५२/- |
| २) | महाराष्ट्रातील पुरातत्त्व | श्री.ह.धी.सांकलीया | १८/- |
| ३) | सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख | म.म.वा.वि.मिराशी | ५५/- |
| ४) | History & Inscriptions of the Satvahanas and the Western Kshatrapas. | म.म.वा.वि.मिराशी | ७८/- |
| ५) | Studies in Ancient Indian History | म.म.वा.वि.मिराशी | २८/- |
| ६) | Portuguese Maharashtra Relations( डॉ.पी.एस.पिसुर्लेकर लिखित "पोर्तुगीज मराठे संबंध" या पुस्तकाचा अनुवाद ) | श्री.त्र्यं.वि.पर्वते | ४३/ |
| ७) | असे होते मोगल (निकोलाय मनुची लिखित "Storia-Do-Mogor"चा अनुवाद. ) | श्री.ज.स.चौबळ | ४५/- |
| ८) | उत्तरकालीन मोगल खंड-१ ( डब्ल्यु.आयर्विन लिखित "Latter Mughals" चा अनुवाद. ) | श्री.प्र.गो.ठोंबरे | २८/- |
| ९) | दुसरे महायुध्द ( सर विन्स्टन चर्चिल लिखित "The Second World War" चा अनुवाद ) | श्री.वि.वा.कुवाडेकर | ७१/- |
| १०) | French Records Vol.I to IX[ मूळ फ्रेंच कागदपत्रांचे मराठी भाषांतर ) | डॉ.वि.ग.हटाळकर | ३१८/- [ ९ खंडांची किंमत ] |

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रांवर मिळतील:-

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग, चर्नी रोड, मुंबई-४००००४.

व्यवस्थापक,
शासन लेखन सामग्री आणि ग्रंथागार, शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद- ४३१००१

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स,
नागपूर- ४४०००१.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार, बडवे बिल्डिंग, पी.वाय.सी.जिमखाना,
पुणे-४११००४

# संवाद

माननीय श्री.रा.के.मुटाटकर,

आम्ही ठाणे जिल्ह्यातील आदिवासी तरूणांनी दि. ९ जानेवारी १९८९ रोजी डहाणू येथे खालील उद्देशांच्या पूर्ततेसाठी 'आदिवासी समाज संघर्ष परिषद' या मानवतावादी संघटनेची स्थापना करून कार्य चालविले आहे. आमच्या संघटनेची ध्येय-धोरणे खालील प्रमाणे आहेत. ह्या विषमतामय भारतात समता, स्वातंत्र्य व बंधुत्व निर्माण करण्यासाठी आदिवासी समाजात लक्ष्यप्रेरीत, लक्ष्यभेदी जागृती निर्माण करून ह्या दिशाहीन समाजाला योग्य दिशा दाखवून शोषणकर्त्या समाजव्यवस्थेला बळी पडलेल्या व देशातील दीड हजार आदिवासी जाति मुक्त करून, राष्ट्रीय एकात्मतेकडे नेण्यासाठी समाजात प्रभावी नेतृत्व तयार करणे व त्या नेतृत्वाचा समाजाचे हितासाठी वापर करावयास लावणे.

प्रतिगामी घातक चळवळींपासून आदिवासींना वाचविणे व त्यांच्यात आमूलाग्र जागृती निर्माण करणे.

आदिवासी समाजात आत्मसन्मान निर्माण करणे, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पेरियार रामस्वामी, डॉ.लोहीया, शाहू महाराज यांचे क्रांतिकारी विचार आदिवासी समाजात रूजविणे.

आदिवासी समाजातील जुन्या काळांतील ऐतिहासिक व्यक्तिंचा शोध घेऊन त्यांचा आदर्श समाजापुढे ठेवणे.

अन्याय, अत्याचार व शोषण या विरूध्द लढा देणे.

सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व धार्मिक विषमते विरूध्द लढा देणे, आणि शैक्षणिक प्रचार, प्रसार करणे.

शासकीय विकास योजनांचा आदिवासींना लाभ मिळवून देणे, आदिवासी संस्कृती व लोककलांचे जतन करणे.

आदिवासी समाजाला दारूसारख्या व्यसनापासून मुक्त करणे व समाजाला वाईट रूढी व परंपरेपासून वाचविणे.

सुशिक्षित तरूणांना सरकारी अथवा निमसरकारी क्षेत्रात नोकऱ्या मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

आदिवासी समाजातील अंधश्रध्दांचे निर्मुलन करून आदिवासी समाज विज्ञानवादी बनविण्याचा प्रयत्न करणे.

वरील उद्देशांच्या पूर्ततेसाठी आमची संघटना प्रयत्न करीत आहे. या संघटनेचे जिल्ह्यातील तीन हजार सुशिक्षित तरूण सभासद झाले आहेत. आम्ही नव्वद सालापर्यंत ठाणे जिल्ह्यात निदान तरी २५ हजार सभासद करण्याचा संकल्प सोडला आहे. आम्ही या कार्यासाठी आपल्या मानव विज्ञान परिषदेचे सर्वच बाबतीत मार्गदर्शनाची अपेक्षा करीत आहोत. तरी कृपया योग्य ते मार्गदर्शन करण्याची कृपा करावी ही विनंती.

धन्यवाद !

आपला विश्वासू,<br>
अनंत ठाकरे<br>
सेक्रेटरी<br>
आदिवासी समाज संघर्ष परिषद.

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी-मार्च | १९८०- जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८०- आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८०- आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८०- आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१- दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१- आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१- वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१- रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८२- उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२- धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२- जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३- आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३- आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३- प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३- आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून | १९८४- आदिवासीमधील स्वंयसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४- आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४- आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५- आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५- जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५- आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५- आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६- जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६- आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६- आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६- आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७- भटक्याविमुक्त जमातीचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७- आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७- राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८- सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८- आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८- आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जाने-जून | १९८९ डॉ.वेरिअर एल्विन |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २५० रूपये |
| परिषद वार्षिक सभासद | २५ रूपये |

परिषद सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट किंवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर फॉर्म मागे कृपया आपले पूर्ण नाव, पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा.के.मुटाटकर सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४,आनंद पार्क, औन्ध, पुणे ४११००७

**आपल्या क्रियाशील सहकार्यांची अपेक्षा आहे.**